CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | मंगळवार, १६ जून २०२६ । वर्ष ४ थे अंक ९९ । पाने १२ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपला समाज जर सुरक्षित असेल तर आपण स्वतःही सुरक्षित राहतो. समाज सुखी व समृद्ध असेल तर आपल्यालाही समाधान लाभेल. जर समाजजीवन दुःखी, पददलित असेल तर आपल्याला एकट्याला सुख मिळणे अशक्य आहे. म्हणूनच आपण समाजाच्या सुख-दुःखाचे वाटेकरी आहोत, या जाणिवेने जगण्यातच शहाणपणा आहे.

**- स्व. एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# संघर्ष संपला, जगाला दिलासा

## अमेरिका-इराणमध्ये शुक्रवारी शांतता करार

**इस्लामाबाद, १५ जून**

**अमेरिका आणि इराणमध्ये शांतता करार झाला असून, १९ जून रोजी स्वित्झर्लंडमधील एका समारंभात दोन्ही देश त्यावर अधिकृतपणे स्वाक्षरी करतील, अशी जगाला दिलासा देणारी घोषणा पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी सोमवारी केली. सखोल चर्चेनंतर अमेरिका आणि इस्लामिक प्रजासत्ताक इराण यांच्यात शांतता करार झाला असल्याचे आम्ही आनंदाने जाहीर करीत आहोत, अशी पोस्ट शाहबाज शरीफ यांनी सोमवारी पहाटे केली.**




दोन्ही बाजूंनी लेबनॉनसह सर्व आघाड्यांवरील लष्करी कारवाया त्वरित आणि कायमस्वरूपी थांबवण्याची घोषणा केली. याबाबतचा अधिकृत स्वाक्षरी समारंभ शुक्रवारी स्वित्झर्लंडमध्ये होईल, असे शरीफ यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

संघर्षावर राजनैतिक तोडगा काढण्याच्या आपल्या कटिबद्धतेबद्दल शरीफ यांनी अमेरिका आणि इराणचे आभार मानले तसेच या करारापर्यंत पोहोचण्यासाठी दिलेल्या पाठिंब्याबद्दल त्यांनी कतारच्या नेतृत्वाप्रतीही शरीफ यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यासंदर्भात सौदी अरबचे राजे आणि तुर्की प्रजासत्ताक यांच्या दूरदर्शी नेतृत्वाने दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दलही मी विशेष आभार मानतो, असे त्यांनी नमूद केले.

आता करार अस्तित्वात आल्यामुळे मध्यस्थ



या आठवड्यात बैठकांच्या मालिकेचे आयोजन करतील. अंमलबजावणीपूर्वी होणाऱ्या या चर्चा तांत्रिक वाटाघाटी आणि अधिकृत स्वाक्षरी समारंभासाठी पाया रचतील, असे शरीफ यांनी सांगितले. शरीफ यांनी ही पोस्ट अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स, इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान आणि परराष्ट्र मंत्री सईद अब्बास अराघची यांना पोस्ट केली.

डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी सायंकाळी 'ट्रूथ सोशल'वर ही घोषणा केली. यामुळे जागतिक ऊर्जा बाजारांवरील ताण काहीसा हलका झाला. या शांतता करारावर १९ जून रोजी स्वाक्षरी केली जाईल, असे अमेरिकी अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, कराराचा तपशील त्वरित उपलब्ध झाला नाही. अमेरिका-इराण वाटाघाटींमध्ये पाकिस्तान हा एक प्रमुख मध्यस्थ म्हणून उदयास आला आहे. हा देश अमेरिका आणि इराण यांच्यातील संपर्क सुलभ करीत आहे आणि संघर्ष संपवण्याच्या उद्देशाने राजनैतिक प्रयत्न करीत आहे. (वृत्तसंस्था)

> इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणसोबतचा करार पूर्ण झाला, सर्वांचे अभिनंदन. यामुळे शुक्रवारपासून होर्मुझची सामुद्रधुनी खुली होईल आणि इराणच्या बंदरांवरील अमेरिकेची नौदल नाकेबंदी संपुष्टात येईल. होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यास अमेरिकी नौदल नाकेबंदी उठवण्यास अधिकृत मंजुरी देत आहे. जगातील जहाजांनो इंजिन सुरू करा. तेलाचा प्रवाह सुरू होऊ द्या!
>
> **- डोनाल्ड ट्रम्प**
> अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष

### कराराच्या वृत्ताला इराणचा दुजोरा; मात्र...

दरम्यान, इराणचे उप-परराष्ट्र मंत्री काझेम घरीबाबादी यांनी सरकारी दूरचित्रवाणीवर या कराराला दुजोरा दिला. परंतु, शुक्रवारी त्यावर स्वाक्षरी होईपर्यंत इराण त्याची अंमलबजावणी सुरू करणार नाही, असे स्पष्ट केले.

### १४ कलमी सामंजस्य करारातील मुद्दे

१। इराण-लेबनॉन आणि इतर सर्व आघाड्यांरील युद्ध तत्काळ थांबेल.
२। अमेरिका-इस्त्रायल पुन्हा कोणतेही युद्ध सुरू न करण्याची हमी देतील.
३। अमेरिका इस्त्रायलच्या वतीने सुरक्षेची हमी देईल.
४। होर्मुझमधील अमेरिकेची नौदल नाकेबंदी उठवली जाईल.
५। इराणी जहाजे आणि सागरी व्यापारावरील निर्बंध उठतील.
६। ३० दिवसांच्या आत सागरी व्यापार पूर्ववत होईल.
७। सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यात येईल.
८। इराणचा गोठवलेला अब्जावधी डॉलर्सचा निधी सोडण्यात येईल.
९। सुरुवातीच्या टप्प्यात गोठवलेल्या निधीपैकी निम्मा निधी वितरित केला जाईल.
१०। इराणवरील निर्बंध हटवण्याची प्रक्रिया सुरू होईल.
११। अमेरिका प्राथमिक आणि दुय्यम असे दोन्ही निर्बंध हटवण्यासाठी वाटाघाटी करेल.
१२। अमेरिका येत्या ३० दिवसांत इराणच्या आसपासच्या भागांमधील आपली उपस्थिती कमी करेल.
१३। इराण अण्वस्त्रे विकसित न करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा विचार करेल. ६० टक्के संवर्धित युरेनियमच्या मुद्यावर पुढील चर्चा केली जाईल.
१४। अंतिम ६० दिवसांच्या चर्चेत अणुकार्यक्रम, निर्बंधांमधील सूट आणि युद्धोत्तर पुनर्रचना यासारख्या मुद्यांवर एकमत घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

# तलवारी म्यान; बाजारांत तेजी



**मुंबई, १५ जून**

अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता करार झाल्याची घोषणा झाल्यानंतर भू-राजकीय तणाव लक्षणीयरीत्या कमी झाला. या घडामोडीमुळे सोमवारी भारतीय शेअर बाजारासह जागतिक स्तरावरील जोखीमयुक्त मालमत्तांना मोठी गती मिळाली. तब्बल चार महिने चाललेला हा संघर्ष संपुष्टात आल्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेसाठी कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली तातडीची घसरण दलाल स्ट्रीटवरील तेजीला पूरक ठरली.

या पृष्ठभूमीवर, बीएसईचा निर्देशांक सेन्सेक्स ७३६ अंकांनी म्हणजेच ०.९७ टक्क्यांनी वधारून ७६,२६४ अंकांवर बंद झाला. व्यवहारादरम्यान सेन्सेक्सने ७६,८२१.०७ अंकांचा उच्चांक गाठला होता. गेल्या अवघ्या दोन सत्रांमध्ये सेन्सेक्स तब्बल २४३० पेक्षा जास्त अंकांनी वाढला आहे. दुसरीकडे, निफ्टी ५० निर्देशांक २३१ अंकांनी म्हणजेच ०.९८ टक्क्यांनी वाढून २३,८५४ अंकांवर बंद झाला. दिवसभरातील व्यवहारांमध्ये निफ्टीने २४,००० चा टप्पा देखील ओलांडला होता. (तभा वृत्तसेवा)

# उबाठा गटात फूट ? राऊतांनी गाठली दिल्ली

**मुंबई, १५ जून**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार स्वतंत्र गट स्थापन करण्याच्या विचारात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरू लागली आहे. या खासदारांकडून लोकसभा अध्यक्षांना पत्र देण्याचीही तयारी सुरू असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. मात्र खासदार संजय राऊत यांनी या वृत्ताला ठामपणे नकार देत सर्व खासदार पक्षासोबत असल्याचे स्पष्ट केले आहे.

दोन दिवसापूर्वी उबाठा गटाच्या खासदारांची बैठक बोलाविण्यात आली होती.मात्र या बैठकीत पाच खासदार अनुपस्थितीत असल्याने राजकीय वर्तुळात उबाठा फुटणार असल्याच्या चर्चेला जोर आला होता. या मुद्द्यावर उबाठा कडून पुन्हा भाजपला लक्ष करायला सुरुवात झाली आहे. संजय राऊत दिल्लीला गेल्याने उबाठा पुन्हा फुटणार असल्याच्या चर्चा आहेत.

## महत्त्वाचे

### घाऊक महागाईने गाठली विक्रमी पातळी

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील युद्धामुळे निर्माण झालेल्या ऊर्जा-पुरवठ्यातील व्यत्ययामुळे मे महिन्यात घाऊक महागाईचा दर एप्रिलमधील ८.२६ टक्क्यांवरून वाढून ९.६८ टक्क्यांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला. सध्याच्या मालिकेतील मे महिन्यातील घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईचा दर सर्वाधिक आहे.

### अश्लील मेसेज पाठवून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**सोलापूर, दि.१५ जून-**

मोबाईलवर अश्लील मेसेज पाठवून, सतत पाठलाग करुन आणि चारित्र्यावर संशय घेऊन एका १६ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी अनुराग महेश मोरे (रा. फॉरेस्ट, सोलापूर) याच्या विरोधात फौजदार चावडी पोलिस ठाण्यात पॉक्सो २०१२ च्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पिडीतेच्या वडिलाने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, यातील आरोपी अनुराग मोरे दि.११ जून ते १३ जून २०२६ दरम्यान पीडितेचा पाठलाग करत होता.

मोबाईलवर वारंवार फोन व अश्लील मेसेज पाठवून त्रास देत होता. पीडितेच्या ओळखीच्या एका व्यक्तीला अश्लील शिवीगाळ करुन तरुणीच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले. सपोनि अजित पाटील हे तपास करत आहेत.

# पावसाळी अधिवेशन २२ जूनपासून



**मुंबई, १५ जून**

राज्य विधिमंडळाचे अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे पावसाळी अधिवेशन येत्या २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत मुंबईत पार पडणार आहे. मुंबईतील विधानभवन येथे आयोजित विधानसभा व विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत या तारखांवर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले, असून अधिवेशन १५ दिवस चालणार आहे.

विधानभवन येथे पार पडलेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विरोधी पक्षांतर्फे काँग्रेसचे नाना पटोले, राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) जयंत पाटील, शिवसेना (ठाकरे गट) नेते अनिल परब आणि सतेज पाटील, याशिवाय संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, छगन भुजबळ, सुधीर मुनगंटीवार, दीपक केसरकर, डॉ. नीलम गोर्हे, प्रसाद लाड, हेमंत पाटील, प्रवीण दरेकर, विक्रम काळे आणि विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांच्या उपस्थितीत या संपूर्ण अधिवेशनाच्या कामकाजाचे नियोजन आणि अजेंडा निश्चित करण्यात आला.

### उपसभापतींच्या निवडीची शक्यता

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला पुढील आठवड्यात २२ जूनपासून सुरुवात होत असून तीन आठवडे चालणाऱ्या या अधिवेशनात विधान परिषदेच्या उपसभापतींची निवड केली जाण्याची दाट शक्यता आहे. विधिमंडळाच्या याच अधिवेशनात उपसभापतिपदाची निवडणूक व्हावी, असा शिवसेना शिंदे गटाचा आग्रह आहे. (तभा वृत्तसेवा)

### बोअर चालू करण्याच्या बहाण्याने अकरा वर्षाच्या मुलीचा विनयभंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**

बोअर चालू करण्याच्या बहाण्याने एका ११ वर्षांच्या अल्पवयीन मुलीला घराच्या टेरेसवर नेऊन तिचा विनयभंग केल्याप्रकरणी एका आरोपीविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. संतोष महेश हुंडेकरी (रा. न्यू पाच्छा पेठ सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबत पीडित मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, संतोष हुंडेकरी हा मुलीला बोअर चालू करायचे आहे, असे सांगून रविवार दि. १४ जून रात्री ८:१५ वाजण्याच्या सुमारास बोलावून घेतले. आणि तिचे तोंड दाबून घराच्या टेरेसवर नेले. तेथे अश्लील कृत्य करुन तिचा विनयभंग केला. मुलगी ओरडत आरोपीचा हात झटकून खाली पळून आली. फौजदार मोरे हे पुढील तपास करीत आहेत.

# नागरी अणुऊर्जेला प्राधान्य : मोदी

## । तंत्रज्ञान भारत-स्लोव्हाकियातील संबंधांचा आधार । दोन्ही देशांमध्ये महत्त्वपूर्ण करार

**ब्राटिस्लाव्हा, १५ जून**

स्लोव्हाकियाचा दौरा ऐतिहासिक असून, तंत्रज्ञान हा भारत-स्लोव्हाकियातील संबंधांचा आधार आहे तसेच दोन्ही देश अणुऊर्जेला प्राधान्य देणार आहेत. भारत आणि युरोपियन युनियनमधील मुक्त व्यापार कराराला अंतिम रूप देण्यासाठी स्लोव्हाकियाने मदत केली, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी केले. नरेंद्र मोदी आणि स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्यासोबत त्यांची महत्त्वपूर्ण चर्चा झाली. त्यानंतर संयुक्त पत्रकार परिषदेला नरेंद्र मोदी संबोधित करीत होते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत करताना रॉबर्ट फिको

रॉबर्ट फिको आणि मी आमच्यातील सहकार्याला नवीन दिशा आणि नवीन गती देण्याबाबत सविस्तर चर्चा केली, असे संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित करताना नरेंद्र मोदी यांनी सांगितले. द्विपक्षीय व्यापार आणि आर्थिक भागीदारीतील प्रगती आमच्यासाठी समाधानाची बाब आहे. आमच्या क्षमता जास्त आहेत, त्यापेक्षा जास्त आमच्या अपेक्षा असल्याचे मोदी म्हणाले. नागरी अणुऊर्जा दोन्ही देशांसाठी प्राथमिकता क्षेत्र आहे. आम्ही दोन्ही देशांतील उद्योग आणि एक्सपर्ट् यांच्यातील सहकार्य वाढवण्यावर जोर दिला आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

### संरक्षण क्षेत्रात करार

संरक्षण क्षेत्रातील सहकार्य हे आमच्यातील दृढ परस्पर विश्वास आणि धोरणात्मक एकमताचे प्रतीक आहे. या महत्त्वपूर्ण क्षेत्रात आज आम्ही 'लेटर ऑफ इंटेंट'वर स्वाक्षरी केली, याचा मला आनंद आहे. यामुळे संरक्षण उद्योगांमधील संयुक्त विकास, संयुक्त उत्पादन आणि सहकार्याला नवी गती मिळेल.

### प्राचीन उपनिषदांचा स्लोव्हाक भाषेत अनुवाद

दोन्ही देशांमधील खोल सांस्कृतिक आणि जनसंपर्काचे संबंध आपल्या संबंधांसाठी एक भक्कम पाया प्रदान करतात. भारताच्या प्राचीन उपनिषदांचा स्लोव्हाक भाषेतील अनुवाद हे आमच्या सांस्कृतिक जवळीकीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

### स्लोव्हाकियाचा पहिला उपग्रह भारताने प्रक्षेपित केला.

२०१७ मध्ये स्लोव्हाकियाचा पहिला उपग्रह भारताने प्रक्षेपित केला होता. आज भारतातील अंतराळ क्षेत्र अभूतपूर्व वेगाने नवीन उंची गाठत आहे. मी स्लोव्हाक कंपन्यांना या विकास प्रवासात सामील होण्यासाठी आमंत्रित करतो.

### महादेव कीर्तन प्रकल्प ठरला उदाहरण

पंतप्रधानांनी रविवारी झालेल्या 'महादेव कीर्तन प्रोजेक्ट'च्या कार्यक्रमाची एक अतिशय सुंदर आणि आनंददायी झलक सोशल मीडियावर शेअर केली. ४४ सेकंदांच्या या व्हिडिओ क्लिपमध्ये, या प्रकल्पातील सदस्य 'शंभू-शंभू'चा जयघोष करताना दिसत आहेत. यात पंतप्रधानही त्यांच्या तालावर टाळ्या वाजवताना आणि त्यांना प्रोत्साहन देताना दिसत आहेत. (वृत्तसंस्था)

# पशूंच्या सोनोग्राफी मशीनने महिलांचे गर्भलिंग निदान

## यवत प्रकरणातील सूत्रधार नरेंद्र ठाकरे पोलिसांच्या ताब्यात

**पुणे, १५ जून**

गाई-म्हशींसारख्या पशूंच्या तपासणीसाठी वापरल्या जाणाऱ्या पोर्टेबल सोनोग्राफी मशीनचा वापर महिलांचे गर्भलिंग निदान करण्यासाठी होत असल्याची धक्कादायक माहिती यवत येथील प्रकरणाच्या तपासातून उघड झाली आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार नरेंद्र ठाकरे याला पुणे ग्रामीण पोलिसांनी येरवडा कारागृहातून ताब्यात घेतले आहे.

पुणे ग्रामीण पोलिसांनी पुणे, सातारा आणि अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यरत असलेल्या गर्भलिंग निदान रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. गावोगावी फिरून महिलांची बेकायदेशीर गर्भलिंग तपासणी केली जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणात अण्णासाहेब गिरी (रा. केंडगाव, ता. दौंड; मूळ रा. पारनेर, जि. अहिल्यानगर) आणि नरेंद्र साहेबराव ठाकरे (रा. केसनंद, ता. हवेली), डॉ. अतुल अंकुश जाधव (रा. लोहगाव), यांना अटक करण्यात आली आहे. मंदार सुरेश माळी (रा. किकवी, ता. भोर) आणि सुंदरम कदम (रा. उरुळीकांचन, ता. हवेली) यांच्याविरोधात गुन्हा दाखल असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी पुणे ग्रामीण पोलिसांनी विशेष तपास पथकाची नियुक्ती केली आहे. मार्च २०२६ मध्ये वाघोली पोलिसांनी नरेंद्र ठाकरेला अटक करून त्याला येरवडा कारागृहात पाठवले होते. त्यानंतर आता पुणे ग्रामीण पोलिसांनी त्याला पुढील तपासासाठी ताब्यात घेतले आहे. (तभा वृत्तसेवा)

### पोलिसांकडून संपर्क साधनांची तपासणी

या प्रकरणातील अटक केलेले आरोपी तसेच फरार संशयितांच्या मोबाईल फोन आणि इतर संपर्क साधनांची तपासणी करण्यात येत आहे. मागील दोन वर्षांतील त्यांचे संपर्क, व्यवहार आणि नेटवर्कची माहिती पोलिसांकडून तपासली जात आहे.


# जनगणनेचा महाराष्ट्रातील पहिला टप्पा पूर्ण

## प्रत्यक्ष लोकसंख्या मोजणीचा दुसरा टप्पा १ फेब्रुवारीपासून

**नवी दिल्ली, १५ जून**

जनगणना २०२७ साठी महाराष्ट्रात गृहसूची आणि गृह गणनेचा पहिला टप्पा यशस्वी पूर्ण झाला. राज्यभरात १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत जनगणनेचा पहिला टप्पा राबिवण्यात आला. या टप्प्यादरम्यान प्रगणकांनी गृहसूची क्षेत्रातील कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी दिल्या.

या भेटीदरम्यान त्यांनी केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या ३३ प्रश्नांची उत्तरे एका मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून संकलित केली. हे प्रश्न प्रामुख्याने घरांची स्थिती, त्या त्या कुटुंबांना उपलब्ध असलेल्या सुविधा आणि कौटुंबिक मालमत्ता या बाबींशी संबंधित होते.



जनगणनेच्या अनुषंगाने कुटुंबांनी पुरवलेली सर्व वैयक्तिक माहिती कायद्याद्वारे सुरक्षित असून, ही माहिती पूर्णतः गोपनीय असणार आहे. या टप्प्यात राबवल्या गेलेल्या गृह सूची प्रक्रियेमुळे घरांची स्थिती, कौटुंबिक सुविधा आणि मालमत्तांची उपलब्धता याबद्दलची माहिती संकलित होणार आहे. यासोबतच फेब्रुवारी २०२७ मध्ये होणाऱ्या मुख्य लोकसंख्या प्रगणनेसाठी आवश्यक असलेला आराखडाही यामुळे आखता येणार आहे. त्यामुळे या जगगणनेत प्रत्येक घटकाची नोंद होईल याची सुनिश्चिती होमार आहे.

महाराष्ट्रातील जनगणना २०२७ चा हा पहिला टप्पा सर्व ३६ जिल्हे आणि २९ महानगरपालिका क्षेत्रांमध्ये राबवला गेला. यासाठी मुख्य जनगणना अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. ही प्रगणना प्रक्रिया सुरळीत आणि नियोजनबद्धतीने पार पडावी याण्यासाठी एकूण २,२०,५१४ गृह सूची क्षेत्रांची आखणी केली गेली होती, आणि त्यासंबंधीची जबाबदारी वैयक्तिक प्रगणकांकडे सोपवण्यात आली होते. या अंतर्गत प्रत्येक सहा प्रगणकांच्या गटाच्या कामाची देखरेख करण्याची जबाबदारी प्रत्येकी एका पर्यवेक्षकाने पार पाडली. (वृत्तसंस्था)

### २.४५ लाख प्रगणक, पर्यवेक्षकांचे अथक परिश्रम

मोहीम नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी संपूर्ण राज्यामध्ये ३४ जिल्हाधिकारी आणि २९ महानगरपालिका आयुक्तांसह ६३ मुख्य जनगणना अधिकारी, ९४७ चार्ज अधिकारी, १४१ मुख्य प्रशिक्षक, ३८५० क्षेत्र प्रशिक्षक आणि सुमारे २.४५ लाख प्रगणक तसेच पर्यवेक्षक तैनात करण्यात आले होते. देशातली याआधीची अखेरची जनगणना २०११ मध्ये झाली होती. आगामी जनगणना २०२७ ही देशातील १६ वी आणि स्वातंत्र्योत्तर काळातील आठवी जनगणना ठरणार आहे. ही मोहीम निर्धारित मुदतीत यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्व प्रगणक, पर्यवेक्षक आणि जनगणनेशी संबंधित इतर कर्मचाऱ्यांबद्दल महाराष्ट्र जनगणना संचालन संचालनालयाने आभार व्यक्त केले आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# आ. रोहित पवार यांचे उपोषण अखेर स्थगित

## गिरीश महाजनांच्या आश्वासनानंतर घेतला निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि. १५ जून-**

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी या मागणीसाठी आंदोलनास बसलेले आमदार रोहित पवार यांच्याबरोबर जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी चर्चा केल्यानंतर अखेर त्यांनी आपले आंदोलन स्थगित केले. आंदोलन स्थळावरूनच महाजन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याबरोबर फोनवर चर्चा केल्यानंतर पवार यांनी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला. दरम्यान हे आंदोलन बेकायदेशीर आहे त्यामुळे रोहित पवार यांच्या गुन्हा दाखल करावा अशा मागणीच निवेदन येथील भाजप किसान सेलच्या वतीने




येथील पोलिसांना देण्यात आले आहे.

राज्य शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी फसवी असल्याचा आरोप करीत पवार यांनी पंढरपूर येथे तीन दिवसांपूर्वी अन्नदात्यांसाठी अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते. याबाबत चर्चा करण्यासाठी रविवारी रात्री साडेदहा वाजता महाजन हे आंदोलन स्थळी दाखल झाले. यावेळी त्यांनी पवार यांना२२ जून रोजी पावसाळी अधिवेशन असून त्यापूर्वी याबाबत बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान आमदार रोहित पवार यांनी रविवारी रात्रीसाडे अकरा वाजता या प्रस्तावास मान्यता देत सदर बैठकीस शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, अजित नवले, शेकापचे जयंतपाटील, माजीमंत्री महादेव जानकर यांच्यासमवेत बैठक घेऊन योग्य निर्णय झाला तरच पुढचे आंदोलन न करण्याचे जाहीर केले.

त्यानंतर आमदार रोहित पवार हे आपले वडील राजेंद्र पवार, आई सुनंदा पवार तसेच संपुर्ण कुटुंबियां समवेत येथील नामदेव पायरी येथे जावून विठुरायाची आरती करुन विठ्ठल-रुक्मिणीमातेचे दर्शन घेत विठ्ठलाचा प्रसाद असलेला पेढा खाऊन त्यांनी आंदोलन सोडले.

### घरातील लगीनघाईमुळेच आंदोलन गुंडाळल्याची चर्चा

आमदार रोहित पवार यांच्या घरी लगीनघाई असल्यामुळे शासनाच्या मदतीने आंदोलन गुंडाळण्यात आले असल्याची चर्चा राजकीय वतुळांत रंगू लागली आहे.

### रोहित पवार यांच्यावर गुन्हा दाखल करा : माऊली हळणवर

सरसकट शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदाररोहित पवार यांनी पंढरपुरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात अन्नत्याग आंदोलन केले.या आंदोलनाला प्रशासनाची परवानगी नसताना त्यांनी बेकायदेशीर आंदोलन केले. याप्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भाजपकिसान सेलचे प्रदेश सरचिटणीस माऊली हळणवर यांनी येथील प्रांताधिकारी सचिन इथापे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्याकडे केली आहे.

## महत्वाचे...



### विठ्ठल पतसंस्थेच्यावतीने शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप

**बार्शी, दि. १५ जून-**

श्री विठ्ठल नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने इयत्ता ५ वी ते १० वी मधील समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. बार्शीत पतसंस्थेच्या कार्यालयात हा उपक्रम झाला. श्री विठ्ठल नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन ॲड. प्रवीण करंजकर, व्हा. चेअरमन श्रीकांत शिंदे, संचालक यशवंत पाटील, मार्गदर्शक प्रशांत पाटील यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

### अनगर शिवारातील शेतात फवारणीचे औषध पिऊन मजुराची आत्महत्या

**सोलापूर, दि. १५ जून-**

अज्ञात कारणावरून एका ४० वर्षीय शेतमजुराने पिकावर फवारणी करण्याचे औषध पिऊन आत्महत्या केल्याची घटना मोहोळ तालुक्यातील अनगर शिवारामध्ये आज सोमवारी सकाळी साडेदहा वाजता उघडकीस आली. निवास बाबू नागणे (वय ४० वर्ष, रा. आंबे, ता.पंढरपूर, सध्या राहणार अनगर) असे त्या मयत व्यक्तीचे नाव असून त्याने आज सकाळच्या सुमारास शेतामध्ये फवारणीचे औषध पिले. याचा त्रास होऊ लागल्याने तो झाडाखाली तडफफडत पडला होता. शेजारील शेतकरी दीपक थिटे यांनी त्याला विचारले असता त्याने फवारणी औषध पिण्याचे सांगितले. तेव्हा त्याला मोहोळच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून अधिक उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात रुग्णवाहिकेतून दुपारी अडीच वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### बीबी दारफळ येथे विजेचा शॉक लागून महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. १५ जून-**

घरामध्ये काम करीत असताना विजेचा धक्का लागून एका ५५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबी दारफळ येथे आज सोमवारी सकाळी साडेदहा वाजता घडली. सावित्री भीमराव अलकुंटे (वय ५५ वर्ष , राहणार बीबी दारफळ ) असे त्या मयत महिलेचे नाव आहे . त्या आज सोमवारी सकाळी घरात पत्र्याच्या शेडमध्ये फरशी पुसत असताना त्यांचा हात पत्र्याला लागला. त्यामुळे त्यांना विजेचा जोराचा धक्का लागला. यात त्या बेशुद्ध होऊन पडल्या असता त्यांना जावई लक्ष्मण चौगुले यांनी उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दुपारी सव्वा बारा वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## ‘महावितरण’तर्फे १७ जून रोजी ग्राहक तक्रार निवारण दिन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ जून-**

महावितरणतर्फे जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये दि १७जून रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले असल्याची माहिती अ.भा.ग्राहकपंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

वीज ग्राहकांच्या विविध प्रकारच्यातक्रारी निवारण्यासाठी म हावितरणतर्फे दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी आयोजन करण्यातयेते त्याप्रमाणे १७ रोजी 'ग्राहक तक्रार निवारण दिनाचे' आयोजन करण्यातआले आहे तरी १७ जून रोजी जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शी,अकलूज, सोलापूर शहर वसोलापूर ग्रामीण अशा सर्व विभागीय कार्यालयांमध्ये सकाळी ११ ते दुपारी १ वा.पर्यंतग्राहकांनी उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडून त्यांची सोडवणूक करून घ्यावी. यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, सहा.अभियंता हे अधिकारी समक्ष उपस्थित राहून तक्रारी, अडचणी, समस्या सोडविणार आहेत. त्यामुळे पंढरपूर, बार्शी, अकलूज,सोलापूर ग्रामीण,सोलापूर शहर याठिकाणी सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांनी आपल्या अवाजवी बील,सरासरी बीलआकारणी, वीज बिल वेळेत न मि ळणे,मीटर रीडिंग वेळेत न घेणे,कनेक्शन वेळेत नमिळणे,योग्य दाबाने वीजपुरवठा न होणे,वारंवार वीजपुरवठा खंडित होणे,नविन मीटर वेळेत न मिळाल्यामुळे ग्राहकांना शेतकरी ग्राहकांना वेळेत डी. पी.बदलून न मिळणे, सोलर सिस्टीम अशा कोणत्याही स्वरुपातील लिखित तक्रार अर्जासह उपस्थित राहावे असे आवाहन महावितरण सोलापूर मंडलचे अधिक्षक अभियंता सुनिल माने यांनी केले आहे.

### १९ जूनपासून लॉजिक इन्स्टिट्यूटचा फाउंडेशन कोर्स

**सोलापूर, दि. १५ जून-**

JEE Main, JEE Advanced, MHTCET आणि NEET परीक्षांमध्ये सातत्याने उत्कृष्ट निकाल देणाऱ्या लॉजिक इन्स्टिट्यूटतर्फे इयत्ता ८ वी, ९ वी आणि १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी विशेष फाउंडेशन कोर्स दि. १९ जूनपासून सुरू होत आहे.

यावर्षी JEE Advanced 2026 मध्ये संस्थेचे ५ विद्यार्थी IIT प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र ठरले असून गौरव काळे (सोलापूर रँक ४) व आदित्य कामतकर (सोलापूर रँक ५) यांनी विशेष यश संपादन केले आहे. तसेच JEE Main 2026 मध्ये ४२ विद्यार्थी JEE Advanced साठी पात्र ठरले असून दोन विद्यार्थ्यांनी 99.5 percentile पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत.

# शहर-जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये नवागतांचे स्वागत, पुस्तक वाटप सोहळा

## बिटला प्रशालेत नव्या स्वप्नांचे बीज पेरून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित विडी घरकुल भागातील मातोश्री जनाबाई बिटला प्रशालेत अत्यंत उत्साहाने नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पद्मशाली शिक्षण संस्थेचे विश्वस्त श्रीनिवास गड्डम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन व पुस्तक वाटप करून त्यांचे स्वागत करण्यात आले. प्रशालेच्या मुख्याध्यापिका शारदा गोरट्याल यानी आपल्या प्रास्ताविकेतून विद्यार्थ्यांना



नव्या उमेदीने व नव्या उत्साहाने शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी वर्षाच्या सुरुवातीला संकल्प करुन नवे स्वप्न साकारण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे याकरिता संकल्प वृक्ष तयार करण्यात आले. नव्या स्वप्नांचे बीज पेरून या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील शिक्षक गीता सादूल, पद्मावती वल्लाल,निर्मला शिंदे, बाळासाहेब गंभीरे, सुरश्री नामा, विजय गायकवाड, हेमलता चिलवेरी, अविनाश आडम यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अभिज भानप यांनी केले. तर जालिंदर शिंगण यांनी आभार मानले.

## राजुरीत शिक्षण सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत



सांगोला तालुक्यातील राजुरी येथील जिल्हा परिषद शाळेत शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम पार पडला. यावेळी शाळेत प्रथमच दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे जि.प.शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांच्या हस्ते गुलाबपुष्प, शाळेचा गणवेश व पाठ्यपुस्तके देऊन स्वागत करण्यात आले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी परिसरात सणासारखे वातावरण निर्माण झाले होते. रंगीबेरंगी सजावट, शिक्षकांचे आपुलकीने भरलेले स्वागत आणि पालकांच्या चेहऱ्यावरील आनंद यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. याप्रसंगी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास पं.स.सदस्य सदाशिव दबडे, केंद्रप्रमुख दिनकर गाडे, शाखा विस्तार अधिकारी भंडारी, सूर्यकांत खुळे, सरपंच प्रतिभा व्हळगळ, उपसरपंच मोहिनी काटे, महेश काटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक बडंगर उपस्थित होते.

### सुयश विद्यालय, बार्शी

सुयश विद्यालय, बार्शी येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत ढोल-ताशांच्या गजरात करण्यात आले. तसेच लहान मुलांचे आवडते पात्र 'मोटू-पतलू' यांच्या विशेष उपस्थितीमुळे चिमुकल्यांचा आनंद द्विगुणित झाला. शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाबाचे फूल देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

या प्रवेशोत्सव कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक शिवदास नलावडे तसेच संस्थेच्या मार्गदर्शिका प्रतिभा नलावडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रशालेच्या मुख्याध्यापिका अलका जगताप तसेच उपमुख्याध्यापक येवले यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रवेशोत्सव यशस्वीरित्या पार पडला.





### नूमवि शाळा

नू. म. वि शाळेत प्रवेशोत्सव व मोफत पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रम पार पडला. शाळेच्या प्रथम दिनी इ. १. ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. पहिलीच्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून, रंगीबेरंगी फुगे त्यांच्या हातात देऊन, त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करून स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी सेल्फी स्टॅन्ड हे मुख्य आकर्षण होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्या नगरसेविका श्रीदेवी फुलारी, नियाम क मंडळ सदस्य सुरेश मंकणी व पद्माकर कुलकर्णी यांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक दामोदर करंबळेकर, रामचंद्र गोपाळ देव, रामकृष्ण भिकाजी कुलकर्णी, कृष्णाजी डोंगरे यांच्या प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांनी प्रास्ताविक केले तर रोहिणी चौधरी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

### शहा कोठारी प्रशाला

श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूल मध्ये विद्यार्थी प्रवेशोत्सव व मोफत पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रम मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक रमेश यादवाड, प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक शिवाजी वाघमोडे, नगरसेवक सात्विक बडवे, नगरसेविका संगीता जाधव उपस्थित होते. नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे औक्षण करून, पुष्पवृष्टी करण्यात आले. मान्यवरांच्या शुभहस्ते हवेत फुगा सोडून विद्यार्थ्यांना पेन देऊन स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे शाल बुके देऊन स्वागत सत्कार करण्यात आला. इयत्ता दहावी गुणवंत विद्यार्थी सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.





### जिजामाता प्राथमिक शाळा

जिजामाता प्राथमिक शाळा व जिजामाता बालक मंदिर तुळशीदासनगर कोंडी येथे शिक्षणातील सप्तपदीने विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर होते तर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक सत्वजय ठोकळ, सोनाली ठोंकळ, ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया भोसले, सोमनाथ राऊत, निंबाळकर माता पालक संघाच्या उपाध्यक्षा सुजाता पवार उपस्थित होते. प्रारंभी सावित्रीबाई फुले, संस्थापिका निर्मलाताई ठोकळ यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. नवोदीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पाऊल ठसे, शिक्षणातील सप्तपदीने आणि गुलाब पुष्प, पाठ्यपुस्तके देऊन मान्यवरांचे हस्ते स्वागत करण्यात आले. शिक्षणातील सप्तपदी उपक्रमाचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ यांनी कौतुक केले. मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर यांनी मान्यवरांचे सत्कार केले.

### हिराचंद नेमचंद प्रशाला

सकुबाई हिराचंद नेमचंद प्रशालेत शाळा प्रवेशोत्सव, नवागतांचे स्वागत व पुस्तक वाटप झाले. मुख्याध्यापिका नीता येरमा ळकर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. प्रमुख पाहुणे नगरसेवक विनोद भोसले, नगरसेवक अक्षय अंजिखाने, नगरसेवक नागेश खरात, भाजपचे मंडल अध्यक्ष नागेश सरगम उपस्थित होते. तसेच यावेळी श्री सरस्वती मंदिर सचिव रोहिणी तडवळकर, उपाध्यक्ष दत्तात्रय कुलकर्णी, संस्थेचे माजी अध्यक्ष ॲड रघुनाथ दामले, माजी सचिव प्रीती चिलजवार, सदस्य किशोर चंडक, शिरीष कुलकर्णी सुनील कुलकर्णी मंजिरी अंत्रोळीकर, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. नगरसेवक अक्षय अंजिखाने, ॲड रघुनाथ दामले यांनी मनोगत व्यक्त केले. पर्यवेक्षक मुकुंद गिरी यांनी अतिथीचा परिचय करून दिला. सहशिक्षिका सुचेता पोकळे यांनी सूत्रसंचालन केले. सहशिक्षिका रोहिणी कुलकर्णी यांनी आभार मानले.






### मल्लिकार्जुन हायस्कूल

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तक वितरण करण्यात आले. कार्यक्रम ाचे अध्यक्ष प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, प्रमुख अतिथी उपक्रमप्र मुख शिक्षक धरेप्पा हत्तुरे, विनायक हत्तुरे, बसवराज कोरे, भारत राऊत, अनिता हौदे हे होते. मा.अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते सरस्वती म तेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.मा.अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देवून स्वागत केले व औक्षण करण्यात आले. सूत्रसंचालन रमेश आगवणे यांनी केले तर आभार अनिलकुमार गावडे यांनी मानले. यावेळी प्रशालेतील दत्तात्रय अगरखेड, गुरूसिध्दप्पा पाटील, विद्याधर हुलगेरी, सुकेशनी गंगोडा, गणेश कोरे महेश चिवरे, परमेश्वर चांदोडे, अमरनाथ कदारे, प्रतिक्षा बिडवे, प्रिया पसारे संतोष स्वामी, संतोष हिरेमठ उपस्थित होते.

### नेताजी प्रशाला

निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रवेशोत्सव व मोफत पाठ्यपुस्तक वाटप कार्यक्रम पार पडला. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे उपस्थित होते. कार्यक्रम ाच्या प्रारंभी नवागत विद्यार्थ्यांना दोन घोडे व दोन उंटावर बसवून ढोल-ताशांच्या गजरात आणि पुष्पवृष्टी करत प्रशालेत आणण्यात आले. त्यानंतर जयश्री बिराजदार व मीनाक्षी वांगीकर यांनी विद्यार्थ्यांचे



औक्षण करून स्वागत केले. औक्षणानंतर विद्यार्थ्यांना पुष्प, खाऊ तसेच शासनाकडून प्राप्त झालेल्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

यावेळी अण्णाराव कुंभार म्हणाले ,विद्यार्थ्यांना जिद्द, चिकाटी आणि सातत्य यांचे महत्त्व पटवून देत शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले. सम ोरचा काळ आव्हानात्मक असला तरी शिक्षणाच्या प्रकाशातूनच यशाचा मार्ग खुला होतो असे ही ते म्हणाले. यावेळी मुख्याध्यापक रविशंकर कुंभार यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत अभ्यास, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व सांगितले. सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले तर शिवानंद पुजारी यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन मागे

**सोलापूर :** शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी आणि 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'तील जाचक अटी रद्द कराव्या, या मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चे आमदार रोहित पवार यांनी पंढरपुरात शनिवारी 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' आंदोलन सुरू केले होते. दरम्यान, सोमवारी भाजपा नेते व मंत्री गिरीश महाजन यांनी आंदोलनस्थळी भेट देत रोहित पवारांशी चर्चा केली.त्यांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक निर्णय घेईल, असे आश्वासन दिले. त्यानंतर रोहित पवारांनी आंदोलन मागे घेतले. आमदार रोहित पवार यांचे अन्नत्याग आंदोलन पंढरपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुरू होते. दिवसेंदिवस या आंदोलनाला राज्यभरातून मोठा पाठिंबा मिळत होता. मात्र, तिसऱ्या दिवशी रोहित पवार यांची प्रकृती काहीशी खालावली. दरम्यान, भाजपा नेते व मंत्री गिरीश महाजन यांनी आंदोलनस्थळी जाऊन रोहित पवारांची भेट घेतली. यावेळी रोहित पवारांनी जीआरमध्ये ज्या काही अटी आहेत त्या काढून टाकण्याची मागणी केली. यावेळी गिरीश महाजन यांनी सरकार सकारात्मक असल्याचे सांगत कर्जमाफीमधील अटींच्या बाबतीत काय करता येईल, यावर चर्चा केली जाईल, अशी ग्वाही दिली. (तभा वृत्तसेवा)

# रशियाचा युक्रेनवर आतापर्यंतचा भीषण हल्ला

## कीव्हवर डागले ६०० ड्रोन्स, ७० क्षेपणास्त्रे, ११ जणांचा मृत्यू ● हजारो वर्षे जुने चर्च उद्ध्वस्त

**कीव्ह, १५ जून**

रशियाने रविवारी रात्री युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वांत भीषण हल्ला केला आहे. तब्बल ६०० ड्रोन्स आणि ७० क्षेपणास्त्रांचा भडीमार केला. या हल्ल्यात युक्रेनच्या ११ नागरिकांचा मृत्यू झाला असून, हजार वर्षे पुरातन चर्च जळून खाक झाले. १५ जूनच्या रात्री रशियाने युक्रेनमधील कीव्ह आणि खार्कीव्ह या दोन सर्वांत मोठ्या शहरांवर एकाच वेळी हल्ले केले. लोक झोपलेले असताना हे हल्ले करण्यात आले.

रशियाने एकाच वेळी ७० क्षेपणास्त्रे आणि ६११ ड्रोन्ससह एकूण ६८१ शस्त्रे एकाचवेळी डागले. युक्रेनच्या सैन्याने यापैकी ५० क्षेपणास्त्रे आणि ५८२ ड्रोन्स हवेतच नष्ट केली. मात्र, २० बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि २७ ड्रोन युक्रेनमधील ४२ विविध ठिकाणांवर कोसळले.

या हल्ल्यात ११ जण ठार झाले, यात नागरिक आणि आपत्कालीन कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. केवळ कीव्हमध्ये पाच जणांचा मृत्यू आणि ३० पेक्षा जास्त जखमी झाले आहेत. यात पाच आणि सहा वर्षांच्या बालकांचाही समावेश आहे. कीव्हमधील शेव्हचेनकिस्व्ही परिसरात ३० मिनिटांपेक्षा कमी वेळात पाच हल्ले झाले. त्यापैकी एक २५ मजली इमारतीवरही झाला. एका किराणा दुकानाला



रशियाने केलेल्या क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हल्ल्यात युक्रेनमधील कीव्ह शहरातील हजार वर्षांपूर्वी उभारलेल्या चर्चला भीषण आग लागली

तसेच बाजारात आग लागली. ओबोलोन्स्की परिसरातील नऊ मजली रहिवासी इमारतीवरही हल्ला करण्यात आला. हल्ल्यानंतर सकाळी आकाश काळ्या ढगांनी पूर्णपणे झाकोळले होते. कीव्हमध्ये स्फोटांचे जोरदार आवाज ऐकू आले. लोकांना भूमिगत स्थळांवर आश्रय घेतला.

सर्वाधिक नुकसान पुरातन चर्चचे

या हल्ल्यात कीव्हचे सर्वाधिक प्रसिद्ध धार्मिक स्थळ कीव्ह-पेचेर्स्क लावरा या चर्चचे सर्वाधिक नुकसान झाले. हा अकराव्या शतकातील मठ आहे. म्हणजे जवळपास हजार वर्षे जुना आहे. याला 'मोनेस्ट्री ऑफ द केव्हज' म्हणजेच गुहांचा मठ म्हटले जाते. हे ठिकाण युनेस्कोच्या वारसा स्थळात येते. या परिसरातील कित्येक चर्च आणि इमारती अकराव्या ते एकोणीसाव्या शतकातील आहेत. या इमारतींखाली ६०० मीटरपेक्षा जास्त लांबीच्या मोठ्या गुहा आहेत. रशियन ड्रोनच्या हल्ल्यामुळे डॉर्मिशन कॅथेड्रलच्या छताला आग लागली.

**माणुसकीच्या विरोधातील गुन्हा**

हा हल्ला म्हणजे माणुसकी, इतिहास आणि ख्रिश्चन धर्माच्या विरोधातील गुन्हा असल्याचे युक्रेनमधील ऑर्थोडॉक्स चर्चचे प्रमुख मेट्रोपॉलिटिन एपिफेनियस यांनी सांगितले. दोन रशियन ड्रोन्सने हे नुकसान केले. हा एक ख्रिश्चन संस्कृतीच्या विरोधातील रशियाचा सर्वांत मोठा गुन्हा आहे, अशी प्रतिक्रिया युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी व्यक्त केली.

**साधला हल्ल्याचा 'मुहूर्त'**

या हल्ल्याच्या आदल्या दिवशी म्हणजेच रविवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन या दोघांशीही दूरध्वनीवरून चर्चा केली होती. थोडक्यात सांगायचे तर, अमेरिका शांततेसाठी प्रयत्नशील असतानाच, रशियाने अगदी दुसऱ्याच रात्री हा मोठा हल्ला चढवला. (वृत्तसंस्था)

### केवळ शस्त्रास्त्र कारखान्यावर हल्ला

आम्ही केवळ युक्रेनमधील शस्त्रास्त्र निर्मितीच्या कारखान्यावर हल्ला केला, असा दावा रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने केला. कीव्हमधील ड्रोननिर्मिती करणारा कारखाना, रडार प्रकल्प आणि क्षेपणास्त्र तयार करणाऱ्या प्रकल्पांवर आम्ही हल्ला केला.सोबतच सैनिक भरती कार्यालयावरही हल्ला केला आहे. चर्चवर आम्ही हल्ला केलेला नाही. युक्रेनने डागलेले अमेरिकी पॅट्रिएट क्षेपणास्त्र चर्चवर धडकले, असा दावा रशियाने केला.



## इराण-अमेरिका युद्धातील महत्त्वाच्या घडामोडी

**२८ फेब्रुवारी :** अमेरिका-इस्त्रायलचा इराणवर हल्ला. सर्वोच्च नेते अय्यातुल्ला सय्यद खामेनेई आणि वरिष्ठ कमांडर ठार.
**१ मार्च :** इराणचे क्षेपणास्त्र हल्ल्यांद्वारे प्रत्युत्तर. यात संयुक्त अरब अमिरातीत एका भारतीयासह तिघांचा मृत्यू.
**२ मार्च :** कुवेतने चुकून अमेरिकेची तीन विमाने पाडली.
**४ मार्च :** इराणच्या नौदलाची नौका बुडवली.
**५ मार्च :** इराणने इस्त्रायल, अमेरिकन तळांवर हल्ले.
**६ मार्च :** ट्रम्प यांनी तेहरानकडे 'बिनशर्त शरणागती'ची मागणी
**७ मार्च :** इराणने शरणागतीची ट्रम्प यांची मागणी फेटाळली.
**८ मार्च :** सौदी अरबमध्ये एका भारतीयासह दोन जण ठार झाले.
**९ मार्च :** अयातुल्ला मोज्ताबा खामेनी इराणचे सर्वोच्च नेते
**१२ मार्च :** मोज्ताबा यांचा हल्ले सुरू ठेवण्याचा संकल्प केला.
**१३ मार्च :** ट्रम्प यांनी जी-७ नेत्यांना सांगितले की, इराण शरणागती पत्करण्याच्या मार्गावर आहे.
**१७ मार्च :** हल्ल्यांमध्ये इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव अली लारीजानी यांची हत्या झाली.
**१८ मार्च :** इराणचे गुप्तचर मंत्री इस्माईल खतीब यांची हत्या झाली.
**२० मार्च :** १८ मार्चच्या अलिकडील घटनांमुळे सौदी अरबमध्ये एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाल्याचे भारतीय दूतावासाने जाहीर केले.
**२१ मार्च:** समुद्रात अडकलेल्या इराणी तेलाच्या विक्रीवरील निर्बंध तात्पुरते उठवण्याची घोषणा अमेरिकेने केली.
**२३ मार्च :** पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी चर्चा केली. ट्रम्प यांनी इराणला होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्यासाठी किंवा अन्यथा वीज प्रकल्पांवर हल्ल्यांना सामोरे जाण्यासाठी पाच दिवसांची मुदत वाढवून दिली.
**२५ मार्च :** इराणने अमेरिकेचा युद्धविराम प्रस्ताव फेटाळला आणि स्वतःच्या मागण्या मांडल्या.
**२६ मार्च :** ट्रम्प यांनी इराणला होर्मुझ खुला करण्यासाठी ६ एप्रिलपर्यंत मुदत वाढवून दिली.
**२७ मार्च :** इराणच्या अणुसुविधांवर इस्त्रायलचे हल्ले झाले.
**३० मार्च :** युद्ध संपवण्यासाठी 'लवकरच' करार न झाल्यास इराणची ऊर्जा संसाधने आणि इतर महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विनाश करण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली. इराणी हल्ल्यांमध्ये कुवेतमध्ये एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला.
**३१ मार्च :** चीन आणि पाकिस्तानने युद्ध संपवण्यासाठी पाच कलमी शांतता प्रस्ताव मांडला.
**३ एप्रिल :** इराणमध्ये अमेरिकेचे एक लढाऊ विमान पाडण्यात आले.
**६ एप्रिल :** करारास सहमती न दर्शवल्यास चार तासांत इराणचा नायनाट करण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली. इराणने ४५ दिवसांच्या युद्धविरामाचा प्रस्ताव फेटाळला.
**७ एप्रिल :** करारासाठी दिलेल्या ताज्या मुदतीचे पालन करण्यात इराण अपयशी ठरल्यास 'आज रात्री संपूर्ण संस्कृती नष्ट होईल', अशी धमकी ट्रम्प यांनी दिली.
**८ एप्रिल :** अमेरिका आणि इराण दोन आठवड्यांच्या युद्धविरामासाठी सहमत झाले.
**११ एप्रिल :** उपराष्ट्राध्यक्ष जे.डी. व्हान्स यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकन शिष्टमंडळाने पाकिस्तानात इराणच्या वरिष्ठ वाटाघाटीकर्त्यांशी ऐतिहासिक थेट चर्चा केली.
**१२ एप्रिल :** पाकिस्तानातील चर्चेदरम्यान अमेरिका आणि इराण शांतता करारापर्यंत पोहोचू शकले नाहीत. ट्रम्प यांनी जाहीर केले की, अमेरिकन नौदल होर्मुझमधून जहाजांच्या येण्या-जाण्यावर त्वरित नाकेबंदी सुरू करेल.
**१५ एप्रिल :** ट्रम्प म्हणाले की इराणसोबतचे युद्ध 'संपण्याच्या मार्गावर' आहे.
**१६ एप्रिल :** पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिम मुनीर यांनी तेहरानमध्ये इराणच्या वरिष्ठ नेतृत्वाशी चर्चा केली.
**१७ एप्रिल :** इराणने सांगितले की होर्मुझ पूर्णपणे खुला आहे. मात्र, ट्रम्प यांनी सांगितले की इराणविरुद्धची नौदलाची नाकेबंदी पूर्ण क्षमतेने कायम राहील.
**१८ एप्रिल :** इराणने होर्मुझ पुन्हा खुला करण्याचा निर्णय मागे घेतला.
**२० एप्रिल :** अमेरिकेने होर्मुझजवळ इराणचा ध्वज असलेल्या एका मालवाहू जहाजाला ताब्यात घेतले.
**२१ एप्रिल :** अमेरिकेच्या वाटाघाटीच्या भूमिकेला तेहरानकडून प्रतिसाद न मिळाल्याने अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स यांचा इस्लामाबाद दौरा स्थगित.
**२२ एप्रिल :** ट्रम्प यांनी इराणसोबतचा युद्धविराम अनिश्चित काळासाठी वाढवला. इराणने होर्मुझमध्ये तीन जहाजांवर गोळीबार केला आणि त्यापैकी दोन जहाजे ताब्यात घेतली.
**२४ एप्रिल :** पाकिस्तानच्या वरिष्ठ नेतृत्वाशी अमेरिका-इराण युद्धविरामाबाबत चर्चा करण्यासाठी इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची इस्लामाबादला पोहोचले.
**२६ एप्रिल :** इराणचे परराष्ट्र मंत्री तीन दिवसांत दुसऱ्यांदा पाकिस्तानमध्ये दाखल झाले आणि रशियाला रवाना होण्यापूर्वी त्यांनी लष्करप्रमुख आसिम मुनीर यांची भेट घेतली.
**२७ एप्रिल :** अमेरिकेने देशावरील नाकेबंदी उठवल्यास आणि युद्ध संपवल्यास होर्मुझवरील नाकेबंदी सोडण्याची तयारी इराणने दर्शवली.
**१ मे :** युद्ध संपवण्यासाठी इराणने अमेरिकेला एक नवीन प्रस्ताव सादर केला.
**४ मे :** ट्रम्प म्हणाले की, होर्मुझमध्ये अडकलेल्या जहाजांना सुरक्षितपणे नेणाऱ्या अमेरिकन जहाजांवर इराणने हल्ला केल्यास इराणला पृथ्वीवरून नष्ट केले जाईल.
**६ मे :** होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांना संरक्षण देऊन नेण्यासाठीचा 'प्रोजेक्ट फ्रीडम' ट्रम्प यांनी स्थगित केला.
**८ मे :** अमेरिकन सैन्याने होर्मुझमध्ये इराणच्या दोन तेल टँकर्सवर गोळीबार करून ते निकामी केले.
**१० मे :** अमेरिकेच्या युद्धविरामाच्या ताज्या प्रस्तावावर इराणने पाकिस्तानी मध्यस्थांमार्फत आपला प्रतिसाद पाठवला. ट्रम्प यांनी इराणचा प्रस्ताव फेटाळला.
**११ मे :** ट्रम्प यांनी म्हटले की, इराणसोबतचा युद्धविराम आता 'अत्यंत नाजूक स्थितीत' (लाइफ सपोर्टवर) आहे.
**१३ मे :** ओमानच्या किनारपट्टीजवळ भारताचा ध्वज असलेल्या एका जहाजावर हल्ला झाला.
**१६ मे :** पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नक्वी यांनी इराणी नेत्यांशी चर्चा करण्यासाठी तेहरानला भेट दिली.
**१८ मे :** ट्रम्प यांनी सांगितले की, इराणवर लष्करी कारवाई करण्यापासून थांबलो. कारण, सध्या 'गंभीर वाटाघाटी' सुरू आहेत.
**१९ मे :** ट्रम्प यांनी सांगितले की, ते इराणवर पुन्हा हल्ले सुरू करण्याचा निर्णय घेण्याच्या अगदी जवळ होते; परंतु शांतता चर्चेत तेहरानची भूमिका 'समंजस' असल्याचे सांगणारा कतार आणि संयुक्त अरब अमिरातीसारख्या मध्यस्थांचा फोन आल्यानंतर त्यांनी तो निर्णय पुढे ढकलला.
**२० मे :** पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नक्वी यांनी इराणी नेत्यांशी भेटीगाठी घेण्यासाठी एका आठवड्यात दुसऱ्यांदा तेहरानचा दौरा केला.
**२१ मे:** अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी म्हटले की, इराणसोबतच्या चर्चेत 'चांगली चिन्हे' दिसत असली तरी, इतर पर्याय खुले आहेत. ■

# भारताला कमकुवत करणाऱ्या शक्तींपासून सतर्क राहावे

## अ. भा. सह प्रचारप्रमुख प्रदीप जोशी यांचे प्रतिपादन ● उत्तराखंडात संघ शिक्षा वर्गाचा समारोप

**डेहराडून, १५ जून**

भारताची ओळख ही त्याच्या आध्यात्मिक परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि जागतिक कल्याणाच्या भावनेत रुजलेली आहे. देशाची हजारो वर्षे जुनी संस्कृती आणि सांस्कृतिक जाणीव हीच त्याची सर्वांत मोठी ताकद असून, हीच गोष्ट पुढे नेणे आवश्यक आहे. सीमांवरील आव्हाने आणि लोकसंख्येच्या रचनेत होणारे बदल याबाबत आपण सदैव सतर्क राहिले पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सह-प्रचार प्रमुख प्रदीप जोशी यांनी केले. ते हिमालयन इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित १५ दिवसीय संघ शिक्षा वर्गाच्या समारोपप्रसंगी बोलत होते.

संघाचा १०० वर्षांचा प्रवास हा विचारसरणी, दृढ निष्ठा, विकास आणि सामाजिक जागृतीचा प्रवास राहिला आहे. स्वयंसेवक समाजात




कार्यक्रमाला संबोधित करताना प्रदीप जोशी

शिस्त, एकता, मूल्ये आणि सेवाभाव बळकट करण्यासाठी कार्य करीत आहेत. भारतासमोर बाह्य आणि अंतर्गत अशा दोन्ही प्रकारची आव्हाने आहेत, असे प्रदीप जोशी यांनी सांगितले.

सीमाभागातील संवेदनशीलतेचा विचार करता, देशाला कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्ज राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रदीप जोशी यांनी केले. सीमावर्ती भागातील लोकसंख्येच्या रचनेत होणारे बदल ही चिंतेची बाब असल्याचे नमूद करीत, देशविरोधी शक्ती आणि विदेशी कारस्थानांद्वारे भारताला कमकुवत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि या धोक्याबाबत समाजाने सतर्क राहण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. आधुनिक युद्धाचे स्वरूप वेगाने बदलत असून, संघर्ष आता केवळ सीमांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. या पृष्ठभूमीवर विज्ञान, तंत्रज्ञान आणि संरक्षण या क्षेत्रांत स्वदेशी संशोधन व नावीन्यपूर्ण उपक्रमांना चालना देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

१५ दिवसांच्या या प्रशिक्षण कालावधीत स्वयंसेवकांनी शिस्त, संघटन कौशल्य आणि राष्ट्रसेवेची आदर्श भावना प्रदर्शित केली. येथे मिळालेले प्रशिक्षण स्वयंसेवकांना समाज आणि राष्ट्राच्या हितासाठी अधिक प्रभावी भूमिका बजावण्यास प्रेरित करेल. देशाच्या प्रगती आणि सुरक्षेमध्ये सैनिकांप्रमाणेच जागरूक नागरिक आणि स्वयंसेवकही महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. आपल्या वेळेचा आणि ऊर्जेचा सकारात्मक वापर करून राष्ट्रनिर्मितीत योगदान देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे या समारंभाचे प्रमुख पाहुणे, निवृत्त लेफ्टनंट जनरल जयवीर सिंग नेगी यांनी सांगितले.

**देशाची सांस्कृतिक मुळे बळकट करणे गरजेचे**

'आत्मनिर्भर भारत' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशाची सांस्कृतिक मुळे आणि राष्ट्रीय जाणीव बळकट करणे आवश्यक आहे. संघ कोणाच्याही विरोधात नाही; उलट तो समाजात राष्ट्रवाद आणि सांस्कृतिक जाणीव यांची भावना दृढ करण्याचे काम करतो. सामाजिक सलोखा, कौटुंबिक मूल्ये (कुटुंब प्रबोधन), पर्यावरण संवर्धन, आत्म-जाणीव आणि नागरिक कर्तव्ये यांसारख्या विषयांबाबत जागरूकता निर्माण करूनच देशाला सर्वोच्च वैभवाकडे नेले जाऊ शकते, असे प्रदीप जोशी म्हणाले. (वृत्तसंस्था)

# मुले आमची तर डीएनए वेगळा कसा ?

## आयव्हीएफद्वारे जन्मलेल्या मुलांच्या डीएनए अहवालामुळे खळबळ

**नवी दिल्ली, १५ जून**

इन-विट्रो फर्टिलायझेशनद्वारे जन्मलेल्या आमच्या जुळ्या मुलींचा डीएनए आमच्या डीएनएशी जुळत नाही, असा आरोप करत दिल्लीतील एका दाम्पत्याने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे रुग्णालयाच्या भ्रूण व्यवस्थापन पद्धतींवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या दाम्पत्याने आपली जैविक मुले परत करावी, अशी मागणी केली आहे.

बिल्डर राहुल राठोड आणि त्यांची पत्नी मीनू यांनी फर्टिलिटी सेंटरवर गंभीर आरोप केले आहेत. राठोड यांनी सांगितले की, दिल्ली न्यायालयाच्या आदेशानुसार ३१ मार्च २०२६ रोजी ग्रेटर कैलाश पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला होता. मात्र, याप्रकरणी पोलिस कोणतीही कारवाई करीत नाहीत; उलट आमच्यावरच सर्व बाजूंनी दबाव टाकला जात आहे. तक्रारदारानुसार, हे प्रकरण डिसेंबर २०२४ मध्ये सुरू झाले. दाम्पत्याने डॉ. रितू गर्ग यांचा सल्ला घेतला असता त्यांनी त्यांची ओळख डॉ. मनप्रीत कौर यांच्याशी करून दिली. त्यानंतर त्यांना नवी दिल्लीतील ग्रेटर कैलाश-१ येथील एससीआय रुग्णालयात पाठविण्यात आले. तिथे त्यांची ओळख इन-विट्रो फर्टिलायझेशन तज्ज्ञ डॉ. शिवानी सचदेवा यांच्याशी करून देण्यात



आली.

**इन-विट्रो फर्टिलायझेशन प्रक्रिया आणि संशय**

९ जानेवारी २०२५ रोजी एससीआय रुग्णालयात वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या. डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी जोडप्याला नैतिक प्रक्रियेचे आश्वासन दिले आणि केवळ त्यांचेच जैविक साहित्य वापरले जाईल, असे सांगितले. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी पत्नीची अंडी आणि पतीचे शुक्राणू गोळा करण्यात आले. राठोड यांनी दावा केला की, त्यांच्या जैविक साहित्याची संपूर्ण मालकी रुग्णालयाकडे सोपविण्यात आली होती. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी लॅपरोस्कोपी प्रक्रिया पार पाडण्यात आली. मार्च २०२५ मध्ये रुग्णालयाने पाच भ्रूण तयार झाल्याचा अहवाल दिला. यापैकी तीन भ्रूण १४ मे २०२५ रोजी पत्नीच्या गर्भाशयात स्थानांतरित करण्यात आले. जोडप्याने आरोप केला की, त्यांच्या जनुकीय सामग्रीपासून तयार केलेले भ्रूण बेकायदेशीरपणे काढून टाकण्यात आले. (वृत्तसंस्था)

# अमरावतीत हेलिकॉप्टरने आले 'नीट'चे पेपर

### सीआरपीएफच्या तुकडीचा बंदोबस्त

**अमरावती, १५ जून**

राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षेच्या (नीट) प्रश्नपत्रिका सोमवारी विशेष हेलिकॉप्टरने अमरावतीत दाखल झाल्या. सीआरपीएफच्या तुकडीसह वाहनांच्या ताफ्याद्वारे या प्रश्नपत्रिका कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत कोषागार कार्यालय व कॅम्पस्थित स्टेट बँक ऑफ इंडियाच्या लॉकरमध्ये सीलबंद करण्यात आल्या.

नीट परीक्षेबाबत प्रशासनाने अभूतपूर्व गोपनीयता आणि सुरक्षा व्यवस्था उभारली आहे. जिल्ह्यात २१ जून रोजी १४ केंद्रांवर ४,७७० विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. हनुमान गढी येथील मैदानावर सकाळी १०.३० वाजता हे हेलिकॉप्टर उतरविण्यात आले. तेथून सीआरपीएफच्या तुकडीसह १० ते १५ वाहनांचा ताफा जिल्हा कोषागारासह स्टेट बँकेकडे रवाना झाला. या प्रश्नपत्रिका कडेकोट पोलिस बंदोबस्तात एकमेव सुरक्षा कवचात दोन्ही ठिकाणी पोहोचविण्यात आल्या. पेपरफुट उघड झाल्यानंतर नीट परीक्षा रद्द करण्यात आली होती. नव्याने ही परीक्षा होत आहे. त्यामुळे आता राष्ट्रीय परीक्षा संस्थेकडून प्रश्नपत्रिकांच्या वाहतूक आणि साठवणुकीसाठी विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. देशभरातील २२ लाखांहून अधिक विद्यार्थी नीट परीक्षेला बसणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये परीक्षेच्या पारदर्शकतेबाबत निर्माण झालेली चिंता दूर करण्यासाठी प्रशासनाकडून यंदा परीक्षेबाबत सुरक्षा आणि कमालीची गुप्तता राखली जात आहे. प्रश्नपत्रिकांचे बॉक्स दोन्ही ठिकाणच्या लॉकरमध्ये सुरक्षित सीलबंद ठेवण्यात आले असून, २१ जून रोजी परीक्षा केंद्रांकडे रवाना होण्यापूर्वीच ते बाहेर काढण्यात येणार आहेत.



हनुमान गढीवर उतरलेले हेच ते हेलिकॉप्टर



# ...तर 'उबाठा' खासदारांचे स्वागतच : मुनगंटीवार

**मुंबई, १५ जून**

देशाच्या हितासाठी आणि राष्ट्रहितासाठी जर कोणतीही मोठी घडामोड घडत असेल, तर ती निश्चितच चांगली गोष्ट आहे, अशी प्रतिक्रिया देऊन भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी राजकीय खळबळ उडवून दिली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार जर देशहिताचा विचार करून सोबत येण्यास तयार असतील, तर त्यांचे भाजपमध्ये नेहमीच स्वागत असेल, असे सांगत त्यांनी उबाठा नेत्यांची झोप उडविली आहे.

राज्याच्या राजकीय वर्तुळात 'ऑपरेशन टायगर'मुळे प्रचंड खळबळ उडालेली असतानाच, आता या संपूर्ण प्रकरणावर सुधीर मुनगंटीवार यांनी प्रतिक्रिया दिली. यावेळी बोलताना मुनगंटीवार यांनी विरोधी पक्षांवर, विशेषतः काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. भूतकाळातील दाखला देत ते म्हणाले की, आदरणीय अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार असताना काँग्रेसने काय केले होते, हे संपूर्ण देशाने पाहिले आहे. त्यामुळे आज जर देशहिताला प्राधान्य देऊन काही लोक योग्य निर्णय घेत असतील, तर त्यावर बोट ठेवण्याचा अधिकार कोणालाही नाही. आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर राजकीय समीकरणे वेगाने बदलत असताना, मुनगंटीवार यांच्या या आजच्या वक्तव्यामुळे 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांना आता आणखी उधाण आले असून राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. (तभा वृत्तसेवा)

### आरटीओ कर्मचाऱ्यांचा आजपासून बेमुदत संप

**मुंबई, १५ जून**

अनेक प्रलंबित मागण्यांसाठी वारंवार दाद मागूनही प्रशासन केवळ वेळखाऊ धोरण राबवत असल्याचा आरोप करीत, राज्यातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी आरपारच्या लढाईची घोषणा केली आहे. १६ जूनपासून राज्यभरातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाचा एल्गार पुकारला आहे. या संपामुळे राज्यातील वाहन परवाने, गाड्यांचे पासिंग, आरसी बुक यांसह आरटीओ कार्यालयातील बहुतांश सर्वच कामे ठप्प होण्याची शक्यता असून सर्वसामान्यांना फटका बसणार आहे. विभागाचा नवीन आकृतिबंध मंजूर होऊन साडेतीन वर्षे उलटून गेली आहेत. (वृत्तसंस्था)

## अग्रलेख

# वातकुक्कुटांचा ‘दिशा-शोध’

हवामानाचे अंदाज वर्तविणारे शास्त्र काळाबरोबर प्रगत होत गेले असले, तरी पारंपरिक पठडीबाज अंदाजशास्त्रांच्या आधारावर आजही काही आडाखे बांधले जातात; अनेकदा ते प्रगत हवामानशास्त्राच्या अंदाजाहूनही अचूक असतात, असे दिसून आले आहे. हवामानाचे अंदाज वर्तविणाऱ्या परंपरागत शास्त्रावर विसंबून हवामानातील बदलाचे आडाखे बांधण्याच्या प्रथांची मान्यता अजूनही टिकून आहे. जेव्हा विज्ञानाने आजच्याएवढी झेप घेतली नव्हती आणि शेकडो मैलावरचे वारे आपल्यापर्यंत पोहोचतील तेव्हा त्यांची दिशा कोणती असेल, याचा अंदाज वर्तविणारे वातकुक्कुट आजही अनेक ठिकाणी वाहत्या वाऱ्यांचे दिशादर्शक म्हणून काम करीत असतात. राजकारणात अनेकदा वादळाच्या शक्यता वर्तविल्या जातात, भूकंपाची भाकितेही केली जातात, प्रचंड उलथापालथ होण्याचे अंदाज व्यक्त केले जातात, तेव्हा त्यामागे अशाच काही पठडीबाज परंपरांच्या अनुभवाचाच आधार घेतला जातो. ‘राजकारणात कोणीही कोणाचा कायमचा शत्रू किंवा कायमचा मित्र नसतो’ या विचारास राजकारणात सुभाषिताचे स्थान प्राप्त झाले आहे. अशी वाक्ये जेव्हा कानावर येऊ लागतात, तेव्हा त्यामध्ये भविष्याचे काही संकेत लपलेले असतात, हे अनेकांस अनुभवाने ठावूक असते. काही वेळा भविष्यात कोणत्याही कोलांटउड्या वगैरे मारण्याची वेळ आलीच, तर त्यासाठी अगोदरच सोयीस्कर वातावरण तयार करून ठेवण्याची खबरदारी घ्यावी लागते.

दोन वर्षांपूर्वी मे २०२४ मधील लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या व चौथ्या टप्प्याच्या काळात महाराष्ट्राच्या आणि राष्ट्रीय राजकारणातील शरद पवार या दीर्घानुभवी नेत्याने केलेल्या एका वक्तव्याची तेव्हा फारशी दखल घेतली गेली नव्हती; किंबहुना अशा वक्तव्यांकडे फारशा गांभीर्याने पाहावयाचे नसते, असेच अनेकांना वाटू लागले. काँग्रेसची आणि आमची विचारधारा एकच आहे, आम्हीही गांधी-नेहरूंच्याच विचारांचे आहोत आणि गांधी-नेहरूंची विचारधारा बळकट करण्यासाठी प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसमध्ये विलीन होणे हा एक मार्ग असू शकतो, असे शरद पवार यांनी एका वृत्तपत्रास दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते. भाजपाविरोधी पक्षांची ताकद वाढविण्यासाठी भाजपाविरोधी मतांचे विभाजन टाळावे हा त्यांच्या या मताचा गाभा होताच; पण प्रादेशिक पक्षांना सातत्याने सत्तेबाहेर राहण्याची वेळ आल्यास त्यांची संघटनात्मक ताकद कमी होऊन अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, ही त्यांची भीतीदेखील होती. शरद पवार यांचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार का, यावरच्या चर्चा रंगल्या होत्या. प्रगत विज्ञानाचे हवामानाचे आडाखेदेखील अनेकदा अचूक ठरत नाहीत, तेथे पठडीबाज परंपरांचे अंदाज तंतोतंत बरोबर येण्याची शक्यता नसते, हे खरेच असल्याने पवार यांच्या विधानानुसार तसे काही घडले तर नाहीच, पण माझा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार असे काही मी म्हणालो नव्हतो, असे सांगून पवारांनी स्वतःच दिलेले बदलाचे संकेत धुडकावूनही लावले होते. तेव्हा त्या चर्चेला पूर्णविराम मिळाला. काँग्रेसमधून बाहेर पडून वेगळी चूल मांडणाऱ्या प्रादेशिक पक्षांना काँग्रेसमध्ये विलीन होण्याबाबत पुनर्विचार करण्याकरिता प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने पवार यांना तेव्हा ते वक्तव्य केले असावे, असेही म्हणतात. पण तेव्हा ती वेळ चुकली. पवार यांनी तेव्हा वर्तविलेल्या भाकितामधून उघड होणारे संकेत आता मात्र भविष्यातील वादळे, भूकंप किंवा उलथापालथीची चिन्हे उघड करताना दिसत आहेत. पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसची वाताहत झाल्यानंतर या पक्षाची ज्या झपाट्याने शकले उडू लागली, तेव्हा पुन्हा एकदा तृणमूलच्या काँग्रेसमधील विलीनीकरणाची चर्चा सुरू झाली आणि त्याबरोबरच पुन्हा एकदा शरद पवार यांच्या पक्षाच्या भविष्याचे नवे आडाखेही बांधले जाऊ लागले आहेत. शरद पवारांच्या सुकन्या सुप्रिया सुळे यांच्या गळ्यात काँग्रेस भुवनमध्ये काँग्रेसच्या नेत्यांनी घातलेला काँग्रेसचा गमछा आणि त्याप्रसंगानंतर उडालेले हास्यविनोदाचे कारंजे भविष्याच्या आडाख्यांस खतपाणी घालणारे ठरू पाहात आहे. शरद पवार हे शब्दाचे पक्के आहेत, असे मानले जाते. त्यांच्या तोंडून बाहेर पडलेला शब्द कधी माघारी जात नाही, अशीही त्यांची ख्याती आहे. उलट, आपल्या तोंडून बाहेर पडलेल्या शब्दांचा विपर्यास होतो अशीच त्यांची अनेकदा तक्रार असते. त्यामुळे त्यांनी दोन वर्षांपूर्वी वर्तविलेल्या विलीनीकरणाच्या भाकितावरील त्यांचा विश्वास आजही ठामच असणार हे ओघानेच येते.

यामुळेच ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसप्रमाणेच शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस गटाच्या भवितव्याचे आडाखे आज बांधले जात असतील, तर ते अगदीच फोल ठरतील असे म्हणणे म्हणजे पवार यांच्या प्रदीर्घ अनुभवास दिले जाणारे आव्हान ठरू शकते. तसे होणार नाही याची काळजी सध्याच्या राजकीय वातावरणानेच घेतली असावी असे दिसते. १९९९ मध्ये शरद पवार यांनी काँग्रेसपासून फारकत घेतली त्याची कारणे वेगळी होती. पक्षनेतृत्वाविषयीच्या त्यांच्या काही भूमिकेमुळे त्यांना काँग्रेसने पक्षाबाहेरचा रस्ता दाखविला. त्यांनी स्वपक्षाची वेगळी चूल मांडली, पण त्यांनी गांधी-नेहरूंची विचारधारा सोडली नाही. तेव्हाही त्यांना भविष्यात कराव्या लागणाऱ्या तडजोडींचा अंदाज आलाच असावा. पुढे तो तंतोतंत खरा ठरला, कारण पुढे लगेचच महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात सत्ता स्थापन करण्यासाठी समान विचारधारेच्या जोरावरच त्यांचा पक्ष काँग्रेससोबत सत्तेसाठी तडजोड करू शकला आणि पुढे केंद्र सरकारातील सत्तेतही सहभागी होऊ शकला. अन्यथा, स्वबळावर कधीही सत्ता मिळवू न शकलेल्या शरद पवारांच्या पक्षास राजकारणात वळचणीला बसण्याची वेळ आली असती. ती तशी येऊ नये, यासाठी त्यांनी तेव्हा विचारधारेला धरून ठेवण्याचा निर्णय घेतला असावा. भविष्यात आपण कधीही काँग्रेसमध्ये जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी वेगळ्या पक्षाची स्थापना करतानाच दिली होती, हे अनेकांस आठवत असेल. गेल्या काही दिवसांत मात्र काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या पक्षांनी पुन्हा स्वगृही दाखल व्हावे आणि राहुल गांधी यांचे नेतृत्व स्वीकारून भाजपाविरोधी ताकद वाढवावी यासाठी काँग्रेसमधूनच प्रयत्न सुरू झाले आणि महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांनी शरद पवार गटाच्या विलीनीकरणाच्या संकेतास दुजोरा देण्यास सुरुवातही केली. यात भर म्हणून, सध्याच्या विरोधकांच्या राजकारणात दुय्यम स्थानावर असलेल्या उद्धव ठाकरेंच्या गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनीही त्या चर्चेत हवा भरण्याचे काम केले आहे. असे काही संकेत मिळतात, तेव्हा राजकारणाच्या तंबूवर बसलेला वातकुक्कुट नव्या राजकीय वाऱ्यांच्या दिशेचा अंदाज घेत असतो हे उघड आहे. ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू झाल्यानंतर आणि खासदारांच्या बैठकीतील हवा निघाल्यावर चर्चा सुरू झाल्यानंतर आता अयोध्येतील रामललाचे दर्शन घेऊन माफी मागण्याचे राऊत यांनी जाहीर केले आहे. त्यांचे हे वक्तव्यदेखील राजकारणाच्या नव्या दिशेने वाहणाऱ्या वाऱ्यांचे वेगळे संकेत असावे, असे आडाखे बांधले जात आहेत. तिकडे केंद्रात तृणमूल काँग्रेसमधून फुटलेल्या खासदारांनी नव्या राजकारणाचे संकेत दिलेले असताना, महाराष्ट्रातील वातकुक्कुट अजूनही वाऱ्यांच्या दिशेचा अंदाज घेत असल्याने वादळ, भूकंप, पडझड यापैकी काहीतरी नक्की घडणार आहे, एवढेच भाकीत वर्तविणे तूर्तास सावधिगिरीचे ठरेल. ■

---

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# होर्मुझचे रणांगण विनाश न ठरावे!

जगाच्या पाठीवर काही असे भौगोलिक प्रदेश आहेत, ज्यांच्यावर ताबा मिळवणे किंवा वर्चस्व गाजवणे म्हणजे संपूर्ण जागतिक व्यवस्थेची नाडी आपल्या हातात ठेवण्यासारखे आहे. मध्यपूर्वेतील होर्मुझची सामुद्रधुनी हे अशाच एका अत्यंत संवेदनशील आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण भू-राजकीय केंद्राचे नाव आहे. आजच्या घडीला या चिंचोळ्या सामुद्रधुनीला ‘होर्मुझचे रणांगण’ म्हटले, तर ते वावगे ठरणार नाही. कारण इथे केवळ प्रादेशिक सत्ताच नव्हे, तर जगातील महासत्तांचे हितसंबंध एकमेकांशी थेट धडकताना दिसत आहेत. त्यामुळेच आज संपूर्ण जगाला एकाच प्रश्नाने ग्रासले आहे, तो म्हणजे महासत्तांच्या या संघर्षात खरोखरच जगाचे भविष्य अडकले आहे का? होर्मुझचा संघर्ष नेमका काय आहे हे समजून घेण्यासाठी आधी होर्मुझचे भौगोलिक आणि आर्थिक महत्त्व समजून घेणे गरजेचे आहे. ओमान आणि इराण यांच्या दरम्यान असलेली ही सामुद्रधुनी एका बाजूला पर्शियन आखात आणि दुसऱ्या बाजूला ओमानचे आखात व अरबी समुद्राला जोडते. या समुद्राच्या पट्टीची रुंदी सर्वांत अरुंद ठिकाणी केवळ ३३ किलोमीटर आहे, तर जहाजांच्या वाहतुकीसाठी उपलब्ध असलेला मार्ग केवळ तीन ते चार किलोमीटर रुंद आहे. जगातील एकूण खनिज तेल वाहतुकीपैकी सुमारे २० ते २५ टक्के वाहतूक एकट्या होर्मुझमधून होते. सौदी अरेबिया, इराक, संयुक्त अरब अमिराती (यूएई), कुवेत आणि कतार यांसारख्या प्रमुख तेल उत्पादक देशांचा तेल पुरवठा याच मार्गावर अवलंबून आहे. जगातील एलएनजी उत्पादनात आघाडीवर असलेला कतारही बहुतांश वायुपुरवठा याच मार्गाने करतो.

भारत, चीन, जपान आणि दक्षिण कोरियासारख्या आशियाई महासत्तांच्या ऊर्जा सुरक्षेची गुरुकिल्ली या होर्मुझच्या मार्गात दडली आहे. थोडक्यात सांगायचे, तर होर्मुझची सामुद्रधनी जागतिक अर्थव्यवस्थेचा ‘हार्ट बीट’ आहे. हा श्वास काही काळासाठी थांबला, तर संपूर्ण जगाला ‘आर्थिक हृदयविकाराचा झटका’ बसू शकतो. होर्मुझचे रणांगण तापण्याला प्रामुख्याने अमेरिका आणि इराण यांच्यामध्ये दशकांपासून चाललेला संघर्ष कारणीभूत आहे; मात्र आता यात चीन आणि रशिया या इतर दोन महासत्तांची उडी पडल्यामुळे हा प्रादेशिक वाद आता जागतिक शीतयुद्धाच्या नव्या आवृत्तीत बदलला आहे. अमेरिकेने नेहमीच होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अप्रत्यक्ष लष्करी नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. बहरीनमध्ये असलेला अमेरिकेचा ‘पाचवा नौदल ताफा’ याच भागावर लक्ष ठेवून असतो. आंतरराष्ट्रीय व्यापार मार्ग खुला ठेवणे हे अमेरिकेचे अधिकृत उद्दिष्ट असले, तरी मध्यपूर्वेतील आपल्या मित्रदेशांचे (सौदी अरेबिया, इस्रायल) रक्षण करणे आणि इराणला रोखणे हा यामागचा मुख्य हेतू आहे. इराण भौगोलिकदृष्ट्या होर्मुझच्या संपूर्ण उत्तरेकडील किनारपट्टीवर नियंत्रण ठेवतो. जेव्हा जेव्हा अमेरिकेकडून इराणवर आर्थिक निर्बंध लादले जातात किंवा लष्करी दबाव आणला जातो, तेव्हा इराणकडून होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्याची धमकी दिली जाते. इराणकडे असलेले आधुनिक ड्रोन्स, नौदलाच्या छोट्या पण घातक बोटी आणि समुद्रात पेरल्या जाणाऱ्या सुरुंगांच्या जोरावर इराण या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत करू शकतो.

या संघर्षात आता चीन आणि रशियाने इराणची बाजू घेतल्याने समीकरणे बदलली आहेत. चीन हा जगातील सर्वांत मोठा तेल आयातदार देश आहे आणि त्याचे ७० टक्क्यांहून अधिक तेल मध्यपूर्वेतून येते. चीनने इराणसोबत २५ वर्षांचा धोरणात्मक करार केला आहे. दुसरीकडे, युक्रेन युद्धानंतर रशियावर पाश्चात्त्य देशांनी घातलेल्या निर्बंधांमुळे रशिया आणि इराणचे लष्करी संबंध कमालीचे दृढ झाले. इराण, रशिया आणि चीन या तिघांनी ओमानच्या आखातात आणि अरबी समुद्रात अनेकदा संयुक्त नौदल सराव केले आहेत. हा सरळ सरळ अमेरिकेच्या वर्चस्वाला दिलेला इशारा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये होर्मुझच्या परिसरात अनेक हिंसक आणि चिंताजनक घटना घडल्या आहेत. त्यामुळे हे क्षेत्र कधीही पेटू शकणाऱ्या दारूगोळ्याच्या कोठारासारखे झाले आहे. इस्रायल-हमास संघर्ष आणि त्यानंतर लाल समुद्रात हुथी बंडखोरांनी केलेल्या धुमाकुळानंतर होर्मुझवरही थेट परिणाम पाहायला मिळाला आहे. इराणने अनेक पाश्चात्त्य किंवा इस्रायलशी संबंधित व्यापारी जहाजे जप्त केली आहेत. इस्रायल आणि इराण यांच्यातील थेट संघर्षाने आता मर्यादा ओलांडल्या आहेत. इराणवरील इस्रायलच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराण होर्मुझच्या सामुद्रधनीचा वापर एक शस्त्र म्हणून करत आहे. २०१५ मधील इराण अणुकरार अमेरिकेने मोडीत काढल्यापासून इराणने आपले युरेनियम संवर्धन प्रचंड वाढवले आहे. इराण अणुबॉम्ब बनवण्याच्या जवळ पोहोचल्याची भीती पाश्चात्त्य देशांना आहे. भारताची सुमारे ८० ते ८५ टक्के तेलाची गरज आयातीतून भागते. त्यातील मोठा वाटा पर्शियन आखातातून येतो. तसेच, मध्यपूर्वेतील देशांमध्ये ८० लाखांहून अधिक भारतीय नागरिक राहतात. ते भारताला दरवर्षी अब्जावधी डॉलर्सचे परकीय चलन पाठवतात. भारताचे अमेरिकेशी धोरणात्मक संबंध आहेत, इस्रायलशी घट्ट मैत्री आहे आणि इराणसोबत चाबहार बंदराच्या माध्यमातून ऐतिहासिक आणि आर्थिक ऋणानुबंध आहेत. त्यामुळे भारत कोणत्याही एका गटात सामील न होता शांततेचा पुरस्कार करतो. होर्मुझच्या समुद्रात भारतीय व्यापारी जहाजांच्या सुरक्षेसाठी भारतीय नौदलाने ‘ऑपरेशन संकल्प’ अंतर्गत आपल्या युद्धनौका तैनात केल्या आहेत. भारत इराणच्या चाबहार बंदराचा विकास करत आहे, जेणेकरून होर्मुझला वळसा घालून ‘इंटरनॅशनल नॉर्थ-साऊथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर’ (आयएनएसटीसी)च्या माध्यमातून रशिया आणि मध्य आशियाशी जोडले जाता येईल. होर्मुझच्या संघर्षातून जगाची सुटका करायची असेल, तर महासत्तांना आपल्या साम्राज्यवादी आणि वर्चस्ववादी मानसिकतेतून बाहेर यावे लागेल. अमेरिका आणि इराण यांनी पुन्हा एकदा चर्चेसाठी समोर येणे गरजेचे आहे. आर्थिक निर्बंध आणि लष्करी धमक्यांमुळे प्रश्न सुटण्याऐवजी गुंतागुंतीचा होत चालला आहे. जगाने आता जीवाश्म इंधनावरील आपले अवलंबित्व कमी करून सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि हायड्रोजन यांसारख्या अक्षय ऊर्जेकडे वेगाने वळणे गरजेचे आहे. जगाची ऊर्जेची भूक मध्यपूर्वेतील तेलावर अवलंबून राहील, तोपर्यंत होर्मुजसारखी रणांगणे जगाला ओलिस धरत राहतील. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

**नितीन शिरसाट**

# तुकाराम मुंढेंचा धसका, पण...

प्रशासनातील एखादा अधिकारी धडक कारवाया करतो, नियमांची कठोर अंमलबजावणी करतो आणि भ्रष्टाचार, गैरव्यवहार किंवा बेकायदेशीर धंद्यांविरोधात मोहीम उघडतो तेव्हा सामान्य नागरिकांच्या मनात आशेचा किरण निर्माण होतो. महाराष्ट्रात अनेक वेळा काही अधिकाऱ्यांनी आपल्या कठोर कार्यपद्धतीमुळे जनतेचा विश्वास संपादन केला. अशा अधिकाऱ्यांच्या नावाने गैरव्यवहार करणार्यांमध्ये धास्ती निर्माण होते. मात्र केवळ एखाद्या अधिकाऱ्याची धडक कारवाई यामुळेच व्यवस्था सुधारते का हा खरा प्रश्न आहे. अन्न व औषध प्रशासन, महसूल, पोलिस, नगरपालिकांपासून ते विविध नियामक विभागांपर्यंत ही स्थिती कमी-अधिक प्रमाणात आढळते. एखाद्या अधिकाऱ्याने गुटखा माफियांवर, भेसळखोरांवर किंवा अवैध व्यवसायांवर कारवाई केली की दुसऱ्याच दिवशी त्याच व्यवसायांचे जाळे पुन्हा कार्यरत झाल्याचे दिसते. कारण कारवाई होते ती वरवर, पण मुळावर घाव घातला जात नाही. गुटखाबंदीचे उदाहरण घ्या. महाराष्ट्रात गुटखा विक्रीवर बंदी आहे. दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा गुटखा जप्त केला जातो. मोठमोठ्या बातम्या झळकतात. पण प्रश्न असा आहे की जप्त होणारा गुटखा येतो कुठून, त्याला संरक्षण कोण देतो, त्याची वाहतूक कोणाच्या आशीर्वादाने होते, या प्रश्नांची उत्तरे मात्र अनेकदा अंधारातच राहतात. त्यामुळे कारवाईचे श्रेय प्रशासनाला मिळते, पण अवैध व्यवसाय मात्र सुरूच राहतो. अन्न भेसळीचेही तसेच आहे. सणासुदीच्या काळात मिठाईची दुकाने, दुग्धजन्य खाद्यपदार्थ, खवा, पनीर, उत्पादकांवर धाडी टाकल्या जातात. निकृष्ट माल जप्त केला जातो. काहींवर गुन्हे दाखल होतात. पण काही दिवसांनी पुन्हा तेच प्रकार सुरू होतात. कारण दोषींना शिक्षा होण्याची प्रक्रिया संथ असते. त्यामुळे कायद्याची भीती निर्माण होत नाही.

नियमांचे पालन करणारे कर्तव्यदक्षअधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी सूत्रे हाती घेताच राज्यभरात बेकायदेशीर भेसळयुक्त पदार्थांविरोधात धडाकेबाज कारवाई सुरू केली आहे. त्यांच्या धडक मोहिमेमुळे गुटखा माफिया, भेसळखोर, नियम मोडणाऱ्या दुकानदारांचे धाबे दणाणले आहेत. गुटखा माफिया, प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला विक्रेत्यांवर आता महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा मकोका लावला जाईल. केवळ किरकोळ विक्रेतेच नाही तर उत्पादकापासून पुरवठा साखळीतील प्रत्येकावर ही कडक कारवाई होणार आहे. महाराष्ट्रात दरवर्षी गुटख्यामुळे मुख कर्करोग होणाऱ्यांचे प्रमाण प्रचंड असल्याने सार्वजनिक आरोग्यासाठी हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. कोट्यवधी रुपयांचा माल जप्त करून गुन्हेगारांना अटक केली आहे. गेल्या महिनाभरात अन्न व औषध प्रशासनाने राज्यभरात शेकडो ठिकाणी छापे मारले आहेत. एकाच दिवसाच्या मोठ्या कारवाईत सुमारे ४ कोटी रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आणि २१ जणांना अटक केली. आतापर्यंत विविध कारवायांमध्ये ३५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल झाले असून ३ कोटी २७ लाखांपेक्षा जास्त मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मे महिन्यात केलेल्या कारवाईत एकाच दिवसात ३३ आरोपींना अटक करून २८ दुकाने, आस्थापना सील करण्यात आल्या होत्या. मुंबईतील मुलुंड भागात अत्यंत अस्वच्छ पाणीपुरीचे साहित्य तयार करणाऱ्या गुप्ता चणा भंडार या दुकानाला टाळे ठोकण्यात आले. १ जून ते ५ जून या कालावधीत राज्यभर राबविलेल्या या विशेष मोहिमेत प्रशासनाने १९५ ठिकाणी अचानक धाडी टाकल्या. या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याची एकूण किंमत १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपये इतकी आहे. राज्यातील भेसळखोरांविरुद्ध तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या धडक कारवाईच्या भीतीचा गैरफायदा घेऊन भिवंडीतील शांतीनगर परिसरात गेल्या काही दिवसापासून काही महिला आणि पुरुषांची एक टोळी फिरत होती. ते स्वतःला अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी असल्याचे सांगत होते. ही टोळी हॉटेल, खानावळी आणि घाऊक किराणा व्यापार्यांकडे जात असत. तुमच्यावर केस करून दुकान सील करू अशी धमकी ते द्यायचे. तुकाराम मुंढे यांच्या कडक शिस्तीमुळे व्यापारी आधीच घाबरलेले होते. याच भीतिपोटी दुकानदारांनी कारवाई टाळण्यासाठी या तोतया टोळीला लाखो रुपये दिले. अशा टोळींना अटक करून कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा आंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं अशी प्रशासनाच्या कारवाईची स्थिती होईल. ■

९८८१७१७८२८

---

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# ‘पॉश’ कायद्याच्या अंमलबजावणीची गरज

नाशिक येथील ‘टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस’मधील उघड झालेल्या ‘कॉर्पोरेट जिहाद’च्या माध्यमातून हिंदू महिलांचे योजनाबद्ध स्वरूपात धर्मांतर घडवून आणण्याच्या प्रकरणाची ‘राष्ट्रीय महिला आयोगा’ने गांभीर्याने दखल घेतली. ‘टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस’ म्हणजेच, ‘टीसीएस’च्या उच्च व्यवस्थापनाला या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, कंपनीच्या प्रत्येक आस्थापना-शाखेत ‘पॉश’ म्हणजेच, ‘प्रीव्हेन्शन ऑफ सेक्युअल हरासमेंट ॲक्ट’च्या तरतुदींचे अधिक प्रभावीपणे पालन करण्यासाठी या कायद्यांतर्गत उचित व त्वरित कारवाईसाठी तातडीने व पुरेशी कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

‘टीसीएस’च्या नाशिक कार्यालयांतर्गत ‘लव्ह जिहाद’च्या जाळ्याआड महिला सहकारी-कर्मचाऱ्यांचे त्यांच्याच पुरुष सहकार्यांनी शारीरिक शोषण करून धर्मांतरणाचा प्रयत्न केला. या प्रकरणी संबंधित व्यवस्थापकाची भूमिका फूस लावणारी व संशयास्पद असल्याचे स्पष्ट झाल्याने ‘कॉर्पोरेट लव्ह जिहाद’ स्वरूपातील हे प्रकरण अद्याप गाजत आहे. या संदर्भातील प्राथमिक चौकशीत स्पष्ट झालेली बाब म्हणजे, कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांशी निगडित व महत्त्वाची बाब म्हणजे, ‘टीसीएस’सारख्या विख्यात व प्रस्थापित कंपनीमध्ये महिलांसाठी असणाऱ्या ‘पॉश’ कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नाशिक कार्यालयासाठी आवश्यक अशी अंमलबजावणी यंत्रणाच नव्हती व या महत्त्वपूर्ण कायद्याच्या अंमलबजावणीचे काम पुणे येथील कार्यालयातून होत असल्याची आश्चर्यकारक बाब स्पष्ट झाली होती. याच मुद्द्याची दखल घेत, आता ‘राष्ट्रीय महिला आयोगा’ने ‘टीसीएस’ कंपनीच्या व्यवस्थापनाला कंपनीच्या देशांतर्गत कार्यरत असणाऱ्या सर्व १२६ कार्यालये-आस्थापनांमध्ये ‘पॉश’ कायद्याच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून, आवश्यक कारवाईचा भाग म्हणून प्रत्येक आस्थापना स्तरावर स्वतंत्र अंमलबजावणी समितीसह आवश्यक ती कारवाई तातडीने करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

मुख्य म्हणजे, राष्ट्रीय महिला आयोगाने ‘टीसीएस’ला एक महिन्याची मुदत दिली आहे. याचाच अर्थ, या कालबद्ध स्वरूपात ‘टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस’ला आपल्या सर्व आस्थापनांमध्ये ‘पॉश’ अंतर्गत केवळ कारवाईच नव्हे, तर कर्तव्यपूर्ती करायची आहे. या संदर्भातील अन्य विशेष बाब म्हणजे, या प्रकरणाची पहिली सुनावणी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या उपस्थितीत झाली. यावरून राष्ट्रीय महिला आयोग स्तरावर विषयाचे गांभीर्य विशेष गांभीर्याने घेतल्याचे स्पष्ट होते.



यानिमित्ताने 'टीसीएस' व्यवस्थापनाचे वरिष्ठ प्रतिनिधी आयोगाच्या पूर्वपरवानगीने आभासी स्वरूपात उपस्थित होते. याशिवाय, यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाच्या मुख्य अतिरिक्त आयोगाच्या अतिरिक्त सचिव राधिका चक्रवर्ती यांच्यासह ‘टीसीएस’, नाशिक प्रकरणी नेमण्यात आलेल्या ‘सत्यशोधन समिती’चे सदस्यपण उपस्थित होते.

चौकशीच्या पहिल्याच टप्प्यात पुढे आलेला तपशील व झालेल्या चर्चेत राष्ट्रीय महिला आयोगाला ‘टीसीएस’च्या नाशिक कार्यालयात ‘पॉश’ कायद्याच्या महत्त्वपूर्ण तरतुदींच्या संदर्भात त्रुटी आढळल्या. यामध्ये चौकशीच्या वेळी ‘टीसीएस’च्या नाशिक कार्यालयातील ‘एचआर’ व्यवस्थापकाची अनुपस्थिती व सामान्य कर्मचाऱ्यांसह महिला कर्मचाऱ्यांसाठी तक्रार निवारण धोरण व पद्धती याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून आले. तसेच कंपनीच्या नाशिक कार्यालयात ‘पॉश’ कायद्यांतर्गत महिला कर्मचार्यांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक व कायदेशीर स्वरूपाची समितीसुद्धा अस्तित्वात नाही, यांसारख्या महत्त्वाच्या त्रुटींची नोंद राष्ट्रीय महिला आयोगाने घेतली. यासंदर्भात ‘टीसीएस’ व्यवस्थापनातर्फे कंपनीच्या नाशिक व पुणे कार्यालयांसाठी मिळून ‘पॉश’ कायद्याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी एकच अंतर्गत समिती असल्याचे स्पष्ट केले. ही बाब अर्थातच कायद्यांतर्गत पुरेशी नव्हती.

महिलांच्या काम आणि कामाच्या ठिकाणच्या सुरक्षिततेच्या संदर्भात व कायदेशीरदृष्ट्या विशेष महत्त्वाच्या तरतुदींचे ‘टीसीएस’मध्ये पालन होत नसल्याचे सकृद्दर्शनी आढळून आले. त्यावर राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी यासंदर्भात व्यक्त केलेल्या भूमिकेतून स्पष्टपणे नमूद केले की, कंपन्या आणि व्यवस्थापनांनी ‘पॉश’ कायद्याच्या तरतुदींचा अंमल आणि अंमलबजावणीकडे केवळ कायद्याची केलेली पूर्तता याच दृष्टीने न बघता, महिला कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील हा कायदा व त्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीकडे प्रामुख्याने प्रकर्षाने नैतिक, कायदेशीर व व्यवस्थापन म्हणून कंपन्यांनी जबाबदारीच्या भूमिकेतून पाहणे नितांत गरजेचे ठरते.

याच वेळी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षांनी असे स्पष्टपणे नमूद केले की, महिला कर्मचारी कामाच्या ठिकाणी सर्वार्थाने शारीरिक शोषणापासून मुक्त ठेवण्यासाठी प्रत्येक व्यवस्थापनाने आपापल्या ठिकाणी ‘पॉश’ कायद्याच्या सर्वच तरतुदींची संपूर्णपणे व पुरतेपणी अंमलबजावणी करणे, त्यांची महत्त्वाची व्यवस्थापकीय जबाबदारी म्हणून पार पाडायला हवी. एवढेच नव्हे, तर ‘टीसीएस’ नाशिकमध्ये महिला कर्मचाऱ्यांशी यबंधित गंभीर घटना घडूनसुद्धा ‘टीसीएस’च्या उच्चपदस्थांपैकी कुणीच नाशिक कार्यालयाला भेट देऊन संबंधित महिला सहकार्यांशी संवाद कसा साधला नाही? हा प्रश्नही रोखठोकपणे विचारण्यात येऊन, अशा प्रत्येक प्रसंगी गंभीर व ठोस भूमिका घेण्यावर भर दिला. अशा प्रसंगी पीडित महिला कर्मचाऱ्यांना संवाद, सहानुभूती व सहकार्याची भूमिका व्यवस्थापनाने घेण्यावर राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी ठामपणे भूमिका घेतली, हे विशेष महत्त्वाचे.

‘टीसीएस’ नाशिकमधील गाजलेल्या कॉर्पोरेट लव्ह जिहाद’प्रकरणी तातडीने दखल घेत, राष्ट्रीय महिला आयोगाने आपल्या प्राथमिक अहवालात, ‘टीसीएस’चे संचालन करणाऱ्या ‘टाटा उद्योग समूहा’च्या देशातील औद्योगिक विकासासह सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेत असतानाच, महिला सुरक्षाविषयक; पण ठोस भूमिका घेण्यावर जोर दिला आहे.

‘टीसीएस’ नाशिक प्रकरणाचा आपला प्राथमिक अहवाल राष्ट्रीय महिला आयोगाने राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आपल्या महत्त्वपूर्ण निरीक्षणांसह सादर केल्याने नाशिकच्या ‘कॉर्पोरेट जिहाद’प्रकरणी ‘पॉश’ व पोलिस या उभय तरतुदींनुसार तातडीने कारवाईला निश्चितपणे गती मिळेल, असा विश्वास आहे. ■

(लेखक ‘एचआर’ व्यवस्थापक व सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

---

### जी-२० अंतर्गत उभारलेल्या पुतळ्यांची दुरवस्था

नागपुरात मार्च २०२३ मध्ये जी-२० अंतर्गत जी परिषद झाली होती त्याकरिता नागपूर सुशोभित करण्यात आले होते. कोट्यवधी रुपये खर्च करून नागपूर शहर अत्यंत सुंदर केले होते. विविध चौक, उड्डाणपूल यांच्याखाली ऐतिहासिक प्रसंगाचे फायबर पुतळे स्थापित केले होते. आज त्यांची अवस्था अत्यंत खराब आहे. त्यावर धूळ, अवतीभवती कचरा, जी झाडे लावली ती पाण्याअभावी मृत झाली. काही नागरिकांनी ती चोरून नेली हे सुद्धा दिसले होते. सरकारकडून इतका खर्च करून हे सुशोभीकरण करण्यात आले होते. त्याची योग्य निगा राखणे हे स्थानिक प्रशासन व नागरिकांचे कर्तव्य आहे. परंतु हे होताना दिसत नाही याचे वाईट वाटते. स्थानिक प्रशासनाने याबाबत त्वरित पुढाकार घेऊन योग्य कार्यवाही करावी.

**मोहन पांडे**/नागपूर

* * *

### तंत्रज्ञान आणि अध्यात्माची सांगड

आजचे युग हे संपूर्णपणे तंत्रज्ञानाचे युग आहे. मानवी इतिहासात कधी नव्हे इतकी प्रचंड आणि वेगवान प्रगती आपण गेल्या काही दशकांत अनुभवली आहे. आज एका बोटाच्या इशाऱ्यावर जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील व्यक्तीशी संपर्क साधणे शक्य झाले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून अथांग माहितीचा साठा आपल्या मुठीत सामावला आहे. शिक्षण, व्यापार, वैद्यकीय क्षेत्र आणि मनोरंजन या सर्वच पातळ्यांवर तंत्रज्ञानाने माणसाचे जीवन अत्यंत सोयीस्कर, सुटसुटीत आणि वेगवान बनवले आहे. भौतिक सुबत्ता आणि साधनांच्या बाबतीत आजचा माणूस समृद्धीच्या शिखरावर पोहोचला आहे. निसर्गावर मात करत माणसाने विश्वाची दारे खुली केली आहेत, ही तंत्रज्ञानाची मानवी संस्कृतीला मिळालेली सर्वांत मोठी आणि सकारात्मक देणगी आहे.

परंतु, या नाण्याच्या दुसऱ्या बाजूचा विचार केला तर एक गंभीर वास्तव आपल्यासमोर उभे राहते. तंत्रज्ञानाने बाह्य जग जितके जवळ आणले, तितकाच माणूस आपल्या माणसांपासून आणि स्वतःच्या मनापासून दूर जात चालला आहे का, असा प्रश्न आज पडू लागला आहे. आज घराघरांमध्ये एकाच छताखाली राहणारे लोक एकमेकांशी बोलण्याऐवजी आपापल्या साधनांमध्ये व्यस्त असतात. या पृष्ठभूमीवर आपल्याला तंत्रज्ञान आणि अध्यात्म यांच्यातील अनुबंध समजून घ्यावा लागेल. अनेकदा तंत्रज्ञान आणि अध्यात्म यांना परस्परांच्या विरोधी मानले जाते. तंत्रज्ञान म्हणजे भौतिक प्रगती आणि अध्यात्म म्हणजे जगाचा त्याग, असा एक चुकीचा समज समाजात रूढ आहे. परंतु, वास्तव तसे नाही. हे दोन्ही विचार परस्परांना छेद देणारे नसून, ते मानवी जीवनाला परिपूर्ण करणारे परस्परपूरक घटक आहेत. तंत्रज्ञान माणसाला बाह्य जगाशी जोडते, तर अध्यात्म माणसाला त्याच्या स्वतःच्या मनाशी जोडते. बाह्य जगातील प्रगतीचा आनंद घेताना, अंतर्गत मनाची श्रीमंती जपणे हेच आजच्या काळातील सर्वांत मोठे आव्हान आणि कर्तव्य आहे. ज्या दिवशी आपण बाह्य प्रगती आणि अंतर्मनाचा हा समतोल साधू, त्याच दिवशी खऱ्या अर्थाने एका समाधानी, सुखी आणि प्रगतिशील मानवी संस्कृतीचा उदय होईल. हाच समतोल आजच्या आणि उद्याच्या पिढीला खऱ्या आनंदाकडे नेणारा राजमार्ग ठरेल.

**वीरेंद्र सोनवणे**/८८८८२४४८८३

* * *

## वाचक पत्रे

### पार्किंग समस्या सोडवणे आवश्यक

तरुण भारत आमचं पुणे पुरवणी १३ जूनमधील ‘छ. संभाजी महाराज पार्किंगची पुनर्बांधणी’ ही पार्किंग क्षमता वाढवण्याची सकारात्मक बातमी वाचून दिलासा मिळाला. खरे तर हा आनंदऋषीजी चौकातील उड्डाणपूल पुन्हा बांधण्यासारखा प्रकार झाला. पण ‘देर आये दुरुस्त आये’ असं म्हणायला हरकत नाही. कारण वाहनांच्या आकार-प्रकारांचा विचार न करता बांधलेल्या अभियांत्रिकी बहुमजली पार्किंगचा पूर्ण क्षमतेने उपयोग न होता, रस्त्यावरच वाहने लावणे ही स्मार्ट शहरासाठी नामुष्कीच म्हणावी लागेल. त्यातही सर्व प्रमुख रस्त्यांवर ‘पे ॲण्ड पार्क’च्या प्रस्तावांचा प्रवास हा आजपर्यंत केवळ अडथळ्यांनीच भरलेला आहे. त्याच्यासाठीच्या निविदांना प्रतिसादच मिळेनासा झालाय. त्यामुळे या पुनर्बांधणीबरोबरच महानगरपालिकेने पुढील पर्यायांचाही विचार करावा. मुख्य व गजबजलेल्या रस्त्यांवर व्यावसायिकांना महिन्याचा सवलत पास देता येईल का, नागरिकांसाठी ठरावीक पार्किंग स्लॉट ठरवता येतील का, मनपा बहुमजली वाहनतळांच्या कंत्राटदारांच्या मनमानी पार्किंग भाडे वसुलीच्या तक्रारी निर्भीडपणे करता येऊन त्यांची दखल घेऊन अशा कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकता येईल का, हे सारे विचारात घेऊन मनपाच्या नव्या कारभाऱ्यांनी या तातडीच्या प्रश्नावर कार्यवाही करावी असे वाटते.

उपनगरांतील अंतर्गत रस्त्यांवर दोन्ही बाजूला केले जाणारे पार्किंग रहदारीसाठीचा रस्ता अधिकच चिंचोळा करते. त्यावरही सम/विषम तारखांप्रमाणे फक्त एका बाजूला पार्किंग करण्यावर कटाक्ष ठेवला पाहिजे. ■

**श्रीपाद कुलकर्णी**/ पुणे. ९४२२५१५६४०

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भूजलपातळीत मोठी घट; पावसाने दडी मारल्यामुळे बळीराजा चिंताग्रस्त

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि. १५ जून -**

माळिशरस तालुक्यातील पिलीव परिसरात मृग नक्षत्राच्या पावसाने आठ व नऊ जुन रोजी हजेरी लावली. पावसाने बळीराजा थोडासा सुखावला. चांगला पाऊस होईल या आशेवर काही शेतकऱ्यांनी मका, बाजरी, कडवळ यांची पेरणी केली. मात्र नंतर पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.

पिलीवसह, बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी, पठाणवस्ती या भागातील तलावात सध्या कसलेच पाणी नाही. विहीरी, तलाव, तळी यांनी तळ गाठला आहे. परिणामी पिण्याच्या पाण्याचा, जनावरांना पाणी तसेच शेतीच्या पाण्याचा गंभीर झाला आहे. बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी या गावात सध्या पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरु आहेत. ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली, त्यांना पाऊस न आल्यामुळे दुबार पेरणी करावी लागते की काय अशी चिंता लागली आहे. अजून ४-५ दिवसात पाऊस न पडल्यास पेरणी वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. निरा उजव्या कॅनॉलचे आवर्तनही सध्या बंद केले आहे. मशागत व पेरणीसाठी केलेला मोठा खर्च वाया जाण्याची शक्यता आहे. भागातील १० -२० टक्के शेतकऱ्यांनी पेरणी केली आहेत. उर्वरित शेतकरी म शागत करुन पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. भागात सध्या समाधानकारक पाऊस न पडल्यामुळे खते, बि बियाणे खरेदीसाठी दुकानात अद्यापही गर्दी दिसुन येत नाही. पाऊस वेळेवर न पडल्यामुळे खरीप हंगाम लांबणीवर पडण्याची शक्यता सध्या निर्माण झाली आहे.

> सुळेवाडी भागात अद्यापपर्यंत समाधानकारक पाऊस न पडल्यामुळे पाण्याचा टँकर सुरु आहे. तसेच शेतीच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न सध्या आहे.
> **- विक्रम सुळे, शेतकरी.**

> यंदा अद्यापपर्यंत पाऊस न झाल्यामुळे खते, बियाणे खरेदीसाठी शेतकरी दुकानाकडे येत नाहीत.
> **- सर्जेराव मदने पाटील, खते, बियाणे विक्रेते.**

> पिलीव मंडळामध्ये अद्यापही समाधानकारक पाऊस झाला नाही. सध्या शेतकरी पावसाची वाट पाहत आहेत. शेतकऱ्यांनी चांगला पाऊस झाल्याशिवाय पेरणी करु नये.
> **- जयश्री खरात, मंडल कृषी अधिकारी**

# उद्यापासून मोफत सुवर्णबिंदू प्राशन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जून-

लहान मुलांच्या बौध्दिक क्षमतेत आणि विकासात वाढ होण्यासाठी सुवर्णबिंदूचे प्राशन अत्यंत महत्वाचे आहे. 'सुवर्णबिंदू' प्रत्येक महिन्यात 'पुष्यनक्षत्रालाच' देण्याची प्रथा आहे. यंदा जून महिन्यात बुधवार १७ रोजी दुपारी २ वाजल्यापासून ते गुरुवार १८ रोजी सकाळी ११ पर्यंत आहे, अशी माहिती डॉ. शिवानी सोमा यांनी दिले आहे.

जुना विडी घरकुल येथे वैष्णव मारुती मंदिर देवस्थान जवळपास पिठ्ठा नगर मार्गावर असलेल्या सोमा क्लिनिक येथे बुधवार १७ रोजी संध्याकाळी ६ ते ९ पर्यंत पुन्हा गुरुवार १८ रोजी १० ते ११ पर्यंत यावेळेत असणार आहे. फक्त गुरुवारीच 'गुरुपुष्य नक्षत्र' म्हटले जाते, बाकीच्या दिवशी फक्त 'पुष्य नक्षत्र' म्हणतात. पालकांनी मोफत असलेल्या 'सुवर्णबिंदू' जन्मल्यापासून ते वयाच्या १६ वर्षाच्या मुला - मुलींना अवश्य पाजावेत.

# शहरात सर्वच भागांत सिटी बससेवा सुरु करण्यासाठी अभिनव संस्थेची निदर्शने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जून-**




वाढती लोकसंख्या, शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालये, रुग्णालये आणि बाजारपेठांची वाढती संख्या लक्षात घेता सोलापूरमध्ये सर्वच भागांत तातडीने सिटी बससेवा सुरू करावी या म ागणीसाठी अभिनव सामाजिक संस्थेच्या वतीने निदर्शने करण्यात आली.

गेल्या काही वर्षांत शहराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली असली तरी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अत्यंत अपुरी आहे. विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.बससेवेअभावी शाळा-म हाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पायी किंवा सायकलने प्रवास करावा लागत आहे. तसेच अनेक नागरिकांना खासगी रिक्षांवर अवलंबून राहावे लागत असून, काही ठिकाणी प्रवाशांकडून अवाजवी भाडे आकारले जात असल्याचा आरोप संस्थेने केला आहे.

महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही संस्थेने उपस्थित केला आहे. शहरात ई-बस सेवा जानेवारी महिन्यापासून सुरू होईल, अशी प्रशासनाकडून यापूर्वी ग्वाही देण्यात आली होती. मात्र, जून महिना अर्धा संपत आला तरी अद्याप बससेवा सुरू झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

तातडीने कार्यवाही करावी अन्यथा, यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे लोकशाही म ार्गाने जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अभिनव सामाजिक संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा मिनल दास यांनी दिला.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तांचे प्रतिभूतीकरण व पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस**

खालील कर्जदार आणि सहकर्जदार यांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले होते. खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांच्या कर्जाची सुरक्षा म्हणून त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण (मॉर्टगेज) ठेवण्यात आल्या आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारातील अटी व शर्तींचे पालन न केल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून त्यांची कर्ज खाती एनपीए (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. त्यांच्याकडून आयडीएफसी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक** लिमिटेड म्हणून ओळखली जाते) ला येणे असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये दिलेल्या संबंधित जारी केलेल्या नोटिसीनुसार नमूद करण्यात आली आहे आणि या रकमेवर पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते संबंधित तारखेपासून करारातील दराने आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिसी नुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1094224872 | मालमत्तेवर कर्ज | १. अमन कैलास लोंढे<br>२. नंदा कैलास लोंढे | 04.02.2026 | INR 10,11,029.45/- |

**मालमत्तेचा पत्ता :** मालमत्तेचा पत्ता : जिल्हा सोलापूर, उपविभाग बार्शी येथील मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग, नगरपरिषद बार्शीच्या हद्दीतील प्लॉट नं. ३३, पैकी गट नं. १२९९/१, एकूण मोजमाप क्षेत्र ८६.२५ चौ. मीटर (दक्षिण बाजू), आणि सदर मालमत्तेच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत:
उत्तर : प्रतीक्षा गायकवाड यांचा प्लॉट नं. ३३ दक्षिण : प्लॉट नं. ३४ पूर्व : रस्ता पश्चिम : प्लॉट नं. ३८

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येत आहे की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसारची रक्कम, त्यावर लागणारे संबंधित तारखेपासूनचे करारातील व्याज आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडे जमा करावी, असे करण्यात कसूर केल्यास, बँकेला येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी खालील स्वाक्षरीकार वरील नमूद गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अन्वये कायदेशीर कारवाई सुरू करण्यास बांधील राहतील. याव्यतिरिक्त, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये तुम्हाला गहाण ठेवलेली सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास सक्त मनाई आहे.

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 16/06/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**जाहीर समन्स प्रसिध्दीकरण**

क्रमांक जमा-२/१५५/एसआर/१५९/२०२५

**बार्शी येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयात**

१. नानासाहेब भिमराव निचळे,
२. बापूराव भिमराव निचळे,
रा. धोत्रे, ता. बार्शी जि. सोलापूर ...... अर्जदार

**विरुध्द**

१. तुकाराम विठ्ठल गोरे,
रा. धानोरे ता. बार्शी जि. सोलापूर
२. लक्ष्मी सुभाष गाढवे,
रा. पांगरी ता. बार्शी जि. सोलापूर ...... सामनेवाला
३. विजया भास्कर धुमाळ,
रा. बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
४. सविता उत्रेश्वर उकिरडे,
रा. बोरगांव ता. बार्शी जि. सोलापूर,

ज्याअर्थी, सदरचा अर्ज यातील अर्जदार यांनी मौजे कुसळंब ता. बार्शी येथील गट नं. ३०७ चे ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कातील प्रतिवादी यांच्या नावाच्या असलेल्या चुकीच्या व पोकळ नोंदी कमी करून मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे कामी सामनेवाला क्र. १ हजर राहावे म्हणून अर्जात नमूद केलेल्या अर्जदार यास माहित असलेल्या वरील पत्त्यावर मे. न्यायालयामार्फत यापूर्वी नोटीस पाठविले असता सामनेवाला क्र. १ अर्जामध्ये नमूद पत्त्यावर राहतो किंवा कसे याबाबत कोणताही खुलासा मिळत नाही व सामनेवाला क्र. १ सध्या कोठे राहतो याबाबत सखोल चौकशी केली असता त्यांचा पत्ता मिळून येत नाही त्यामुळे सामनेवाला क्र. १ विरूद्धचे सदर अर्जाच्या नोटिसीची बजावणी होत नाही.

त्याअर्थी, तुम्ही सामनेवाला क्र. १ यांनी सदर अर्जाचे कामी सदर जाहीर समन्स प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली ता. १६/०७/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता मे. कोर्टात या अर्जाचे कामी स्वतः अगर कुलमुखत्यार यांचे मार्फत विधिज्ञांमार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करून तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर अर्जाचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे काही म्हणणे नाही, असे समजून मे. कोर्टाचे तुमचे विरूद्ध एकतर्फी आदेश होतील. मागाहून तक्रार चालणार नाही.

कळावे हे जाहीर समन्स प्रसिद्धीकरण मे. कोर्टाचे सही शिक्यानिशी दिले.
दिनांक :- १५/०६/२०२६

शिक्का

**सही/-**
**एफ. आर. शेख**
**तहसिलदार बार्शी**

# लोकराजा शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जून-**

लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आशुतोष तोंडसे यांनी दिली आहे.



स्पर्धा तीन गटांमध्ये विभागण्यात आली असून, इयत्ता ५ वी ते ७ वी, इयत्ता ८ वी ते १२ वी आणि खुला गट अशा स्वरूपात ती आयोजित करण्यात आली आहे. प्रत्येक गटासाठी शाहू महाराजांच्या जीवनकार्य, शिक्षण क्षेत्रातील योगदान, सामाजिक न्याय, आरक्षण आणि सामाजिक परिवर्तन या विषयांवर निबंध लेखन करावयाचे आहे.

स्पर्धकांनी आपला निबंध स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून टपालाद्वारे पाठवावा किंवा त्याची झेरॉक्स प्रत ई-मेल अथवा व्हॉट्सअपद्वारे पाठवावी. निबंध पाठविण्याची अंतिम तारीख २२ जून २०२६ आहे.

निबंध पाठविण्याचा पत्ता लोकराजा अभ्यासिका, पहिला मजला, वैदांत टॉवर, भारती विद्यापीठ समोर, विजापूर रोड, सोलापूर - ४ असा आहे. तसेच samyakacademy95@gmail.com या ई-मेलवर किंवा ९९६०३७२७३६ / ७०३८८८३३३९ या व्हॉट्सअप क्रमांकावर निबंध पाठविता येणार आहेत. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहे. स्पर्धेचे विषय आणि अधिक माहितीसाठी बुद्धजय सुशीलदेवी अण्णासाहेब भालशंकर (मो. ९९६०३७२७३६) व आशुतोष सुरेखा विनायक तोंडसे (मो. ७०३८८८३३३९) यांच्याशी संपर्क साधावा.

**पाहिजेत**

**तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित,**
**व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव,**

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे नाहरकत पत्र क्रः सहसं/उशि/छ.शं.वि./अनु-४ दि. १२.०६.२०२६ नुसार महाविद्यालयात तात्पुरत्या स्वरूपात घड्याळी तासिका तत्वावर (CHB) अधिव्याख्यात्यांची पदे तसेच स्थानिक निवडसमिती मार्फत अधिव्याख्यात्यांची पदे भरावयाची आहेत. इच्छुक पात्र उमेदवारांनी अर्ज व मूळ कागदपत्रासह दि. १८/०६/२०२६ वार गुरूवार रोजी ठीक १०.०० वा. स्वखर्चाने व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, समर्थ नगर, सांजा रोड धाराशिव येथे मुलाखतीस उपस्थित रहावे . सकाळी १०.०० ते १०.३० या वेळेत अर्ज नोंदणी केली जाईल. उशिरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
अधिक माहितीसाठी संपर्क : प्राचार्य. मो. नंबर ८०८७७७९७१८, ९९७५११९३८०

**तासिका तत्वावरील अनुदानित विषय**

| अ.क्र. | विद्याशाखा | विषय | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | कला | इतिहास | ०१ |
| २ | कला | राज्यशास्त्र | ०१ |
| ३ | कला | समाजशास्त्र | ०१ |
| ४ | कला | अर्थशास्त्र | ०१ |
| ५ | विज्ञान | प्राणिशास्त्र | ०१ |
| ६ | विज्ञान | वनस्पतीशास्त्र | ०१ |
| ७ | विज्ञान | रसायनशास्त्र | ०२ |
| ८ | विज्ञान | संगणकशास्त्र | ०३ |
| ९ | विज्ञान | गणित | ०२ |
| १० | कला | मराठी | ०३ |
| ११ | कला | हिंदी | ०१ |
| १२ | कला | इंग्रजी | ०१ |
| | | **एकूण** | **१८** |

**स्थानिक निवड समिती मार्फत कायमविनाअनुदानित विषय**

| अ.क्र. | विद्याशाखा | विषय | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | कला | महात्मता फुले डॉ. आंबेडकर विचारधारा | ०१ पूर्ण वेळ |
| २ | कला | भूगोल | ०१ पूर्ण वेळ |
| ३ | कला | संगीत | ०१ पूर्ण वेळ |
| ४ | विज्ञान | सुक्ष्मजीवशास्त्र | ०१ पूर्ण वेळ |
| ५ | बीसीए | सर्व विषय | ०२ पूर्ण वेळ |
| ६ | वाणिज्य (B.Com) | सर्व विषय | ०२ पूर्ण वेळ |
| | | **एकूण** | **०८** |

**नियम व अटीः-**
१) शैक्षणिक अर्हता पदवी व पदव्युत्तर परीक्षेत बी+, नेट/सेट किंवा पीएच.डी. आवश्यक आहे.
२) मानधन यु.जी.सी., महाराष्ट्र शासन व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या नियमा नुसार राहील.
३) विद्यापीठाकडून मान्यता आल्यानंतरच नियुक्ती अंतिम समजली जाईल.
४) ही नियुक्ती शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता असेल. नियमित अध्यापक रुजू झाल्यानंतर संबंधित रिक्त जागेवर नियुक्त करण्यात आलेल्या तासिका तत्त्ववरील अध्यापकांच्या सेवा समाप्त होतील.
५) उमेदवारांची निवड करताना शासनाच्या आरक्षण धोरणाचा प्राधान्याने विचार केला जाईल.
६) मुलाखतीसाठी कोणताही भत्ता दिला जाणार नाही.

**सही/-**
**प्राचार्य**
**व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव**

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि ।। व सब डि ।। सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी कसबे सोलापूर मधील महानगरपालिका हद्दीतील गांधी नगर झोपडपट्टी ७ येथील झोपडी/घर नं. ९६ यांसी एकूण अंदाजे क्षेत्र १५० चौ.फुट इतकी असून यांसी मालमत्ता नं. ५८३६०२ येणेप्रमाणे झोपडी सोलापूर महानगरपालिका सोलापूर गलिच्छ वस्ती सुधारणा (ग.व.सु.) यांच्या अभिलेखाच्या भोगवट नुसार बालाजी ऊर्फ बालय्या चंद्रय्या दुडम यांच्या नावाची नोंद असून बालाजी ऊर्फ बालय्या चंद्रय्या दुडम यांचे दि. २७/०६/२००८ रोजी निधन झालेले आहे.

मयत बालाजी ऊर्फ बालय्या चंद्रय्या दुडम यांच्या मृत्यूपश्चात जवळचे व कायदेशीर वारसदार, आमचे अशिल नं. १) श्री. गणेश बालाजी ऊर्फ बालय्या दुडम, २) ललिता नागनाथ गोविंद हे होते व आहेत. त्यानुसार मयत बालाजी ऊर्फ बालय्या चंद्रय्या दुडम यांच्या नावाची नोंद कमी करुन भोगवटदार म्हणून आमचे अशिलाच्या नावाची नोंद होऊन मिळणेकामी म्हणून रितसर अर्ज दाखल करणार आहेत. तरी सदर झोपडीबाबत कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, दान, लिज, टाच, गहाण, जप्ती, बोजा, इसारापावती साठेखत, खरेदीखत, कब्जापावती, पोटगी, करार, मदार, इत्यादी प्रकारचे हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखीस्वरुपात खालील पत्त्यावर हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही, कसलीही हरकत/तक्रार न आल्यास सदरहू झोपडी हि निर्वेध, निजोखीम आहे असे समजून दप्तरी आमचे अशिलाच्या नावाची नोंद करतील. कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस देत आहे, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली दि. १५/०६/२०२६.

**सही/-**
**श्री. अश्विन एस. कोंगारी**
**ॲडव्हाकेट**
**बी. कॉम., एल.एल.बी.**
**मो. नं. ९८९०५०३२८१**
**पत्ता - प्लॉट नं. २३ नवनाथ नगर,**
**आकाशवाणी केंद्र रोड, सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्हाकेट**



# अवधूत गांधी यांच्या 'भक्ती-शक्ती संगम'मधून शिवशौर्य गाथेचे सादरीकरण

## महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा जागर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १५ जून**

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ, सोलापूर यांच्यावतीने शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त बार्शी शहरात आयोजित करण्यात आलेल्या प्रख्यात लोकगायक अवधूत गांधी यांच्या 'भक्ती-शक्ती संगम' या सांगीतिक कार्यक्रम ाला बार्शीकरांनी हजारोंच्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी समस्त शिवप्रेमींनी छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना अर्पण करत त्यांच्या शौर्य, विचार, आदर्श आणि इतिहासाचे स्मरण केले. यावेळी स्मारक समितीचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, सचिव गंगाधर गावसाने, संचालक पुरुषोत्तम कारकल, ऋषीकेश कुलकर्णी, रावसाहेब मनगिरे, अमित आपटे, अरुण ग्रामोपाध्ये, ओम माढेकर, निलेश घाटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यानंतर महाराष्ट्राला सुपरिचित असलेले लोकगायक अवधूत गांधी यांनी आपल्या सुमधुर आवाजातून भक्तिसंगीत आणि शिव-शंभूंच्या कीर्तीचे वर्णन करणाऱ्या गीतांची बहारदार मैफल रंगवली. संतवाणी, अभंग, भारुड, गोंधळ आणि भक्तिगीतांच्या सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.

कार्यक्रमातून मराठा संस्कृतीचे दर्शन घडले तसेच वारकरी परंपरेचा वारसा जपत शिवकालीन घटना आणि प्रसंगांना उजाळा देण्यात आला. कार्यक्रमात हार्मोनियमवादक यांच्या सह सर्व वादकांनी गायकानी उत्कृष्ट साथसंगत केली. त्यांच्या कलाविष्काराला उपस्थित रसिकांनी भरभरुन दाद दिली. संबळ, तबला आणि ढोलकीच्या जुगलबंदीने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. जोशपूर्ण वादनामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आकर्षक रोषणाई, प्रकाशयोजना, सजावट आणि ढोल पथक हे देखील कार्यक्रम ाचे प्रमुख आकर्षण ठरले. अवधूत गांधी यांनी सादर केलेले 'देह विठ्ठल', तसेच 'पावनखिंड' चित्रपटातील 'युगात मांडली' आणि 'शिवबा राजा' यासारख्या वीररसपूर्ण गीतांनी कार्यक्रमात चैतन्य निर्माण केले.

> **समाजहितासाठी कार्यरत संस्थांचा गौरव**
>
> छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आणि सामाजिक बांधिलकीचा वारसा जपत समाजहितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या बार्शीतील विविध संस्था व संघटनांचा यावेळी गौरव करण्यात आला. जय शिवराय प्रतिष्ठान, युवा प्रतिष्ठान, जगदंबा प्रतिष्ठान, श्री शिवछत्रपती व्यायामशाळा, शिवराज्य सेना, छावा प्रतिष्ठान तसेच शिवकालीन दुमिळ शस्त्रसंग्रह जतन करणारे माधव देशमुख आणि शिवभक्त संग्राम मोहिते यांना छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ, सोलापूर यांच्यावतीने प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**
**संगणक विभाग**

पंढरपूर नगरपरिषदेचे आगामी यात्रा आनुषंगिक चित्रीकरणाचे नियोजन असून याकामी निविदा मागविणेत येत आहे. तरी इच्छुक पुरवठा धारकांनी निविदा दोन लिफाफ्यामध्ये आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह दि.१६/०६/२०२६ ते दि.२२/०६/२०२६ अखेर कार्यालयीन वेळेत नगरपरिषद कार्यालयात द्यावयाचे आहेत. अधिक माहिती करीता संगणक विभाग नगरपरिषद कार्यालय यांचेशी संपर्क करावा.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप व कामाचा तपशील | अंदाजे कालावधी | बयाणा रक्कम | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | आगामी यात्रा व आवश्यक त्या कालावधीत विकास कामांचे व्हिडिओ शूटींग करणे, फोटो काढणे, भाविकांना स्वच्छतेचे व आवश्यक सूचना संदेश देणाऱ्या व्हिडिओ क्लिप करणे, प्रत्येक क्लिप एडिटिंग करून योग्य सुस्पष्ट आवाजात रेकॉर्डिंग करणे व निविदेत नुमद व इतर अनुषांगिक कामे करणे. | यात्रा अनुषंगिक कालावधी व नगरपरिषदेकडील अनुषांगिक कामे संपेपर्यंत | १००००/- | १०००/- |

निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा तसेच अटी व शर्तीमध्ये बदल करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

**सही/-**
**(औक्षणी मते)**
**संगण अभियंता**

**सही/-**
**महेश रोकडे**
**नगरपरिषद पंढरपूर**

**खरेदीपूर्व जाहिर नोटीस**

तमाम लोकांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतली मजरेवाडी येथील मिळकत यांसी जुना सर्व्हे नं. २३८ नविन सर्व्हे नं. ३३/२/६ व ७ यापैकी तनिष्का नगर मधील प्लॉट नं. १४२/१४३/२१ या जागेवर बांधण्यात आलेल्या "मरगू नगर" रो-हाऊस ब्लॉक नं. ३४ याचे क्षेत्र ४६.५६ चौ.मी. किंवा ०.४६.५६ आर चौ.मी. यात तळमजल्यावर हॉल, किचन, डायनिंग, टॉयलेट व जिना असे बांधकाम क्षेत्र ३१.४१ चौ.मी. व पहिल्या मजल्यावर दोन बेडरूम, टॉयलेट व जिना असे बांधकाम क्षेत्र ३१.४१ चौ.मी. असे दोन्ही मिळून एकूण बांधकाम क्षेत्र ६२.८२ चौ.मी. इतके असून यांसी चतुःसिमा पुढीलप्रमाणे- पुर्वेस :- रोड, पश्चिमेस :- रो-हाऊस नं. १५, दक्षिणेस :- रो-हाऊस नं. ३३, उत्तरेस :- रो-हाऊस नं. ३५ येणेप्रमाणे चतुःसिमेत नमूद रो-हाऊस जागा व यातील दगड-माती, वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह व येण्याजाण्याच्या पुर्वपार वहीवाटीचे हक्कासह.

वर नमुद केलेली रो-हाऊस घरजागा हि श्री. अरुण किसन साळुंखे यांचे मालकीची आहे. त्यांनी वर नमुद केलेली रो-हाऊस घरजागा आमचे अशिल श्री. आकाश बालाजी गाडपेल्ली यांना विक्री करण्याचे ठरवून लेखी स्वरुपात इसारापावती लिहून देऊन इसार रक्कम स्विकारलेली आहेत. तसेच सदरील मिळकत हि निर्वे ध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचाही, कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲण्ड लायसन्स, बक्षीस, साठेखत पोटगी, टाच, जप्ती (right of intrest) व इतर कोणत्याही स्वरुपाचा बोजा, हक्क, हितसंबंध असल्यास अथवा सदर रो-हाऊस घरजागेसंबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाले पासून सात (०७) पासून दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी, कोणाचेही, कसलीही तक्रार व हरकत न आल्यास ते सदरची मिळकत हि संपुर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे असे गृहित धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील.

तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली दि. १५/०६/२०२६

**सही/-**
**श्री. अश्विन एस. कोंगारी**
**ॲडव्हाकेट**
**बी. कॉम., एल.एल.बी.**
**मो. नं. ९८९०५०३२८१**
**पत्ता - प्लॉट नं. २३ नवनाथ नगर,**
**आकाशवाणी केंद्र रोड, सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्हाकेट**



## महत्त्वाचे

### अमरावतीच्या कुमकुम मोहोडचा सुवर्णवेध

**अमरावती :** अंतालिया, तुर्की येथे ९ ते १४ जून दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-३ स्पर्धेत भारतीय संघाने मिक्स्ड टीम प्रकारात शानदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. भारतीय संघातील धीरज बोम्मादेवरा राय आणि खेलो इंडिया अमरावती केंद्राची प्रशिक्षणार्थी कुमकुम मोहोड यांनी अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाचा ५-१ अशा सेट फरकाने पराभव करून भारताला सुवर्णपदक मिळवून दिले.



कुमकुम मोहोड ही अमरावती येथील खेलो इंडिया धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्रावर मागील आठ वर्षांपासून राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रफुल डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करत आहे. तिच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे आणि उत्कृष्ट प्रशिक्षणाचे हे यशस्वी फळ मानले जात आहे. यापूर्वीही कुमकुमने चीन येथे झालेल्या आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-२ स्पर्धेत भारतीय महिला संघाचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

### १९ जूनपासून आशियाई वरिष्ठ तलवारबाजी

**नवी दिल्ली:** नवी दिल्लीतील प्रतिष्ठित 'भारत मंडपम' येथे १९ ते २४ जून या कालावधीत होणाऱ्या बहुप्रतिक्षित 'आशियाई वरिष्ठ तलवारबाजी (फेन्सिंग) स्पर्धे'चे यजमानपद भूषवून क्रीडा क्षेत्रातील इतिहास घडवण्यासाठी भारत अधिकृतपणे सज्ज झाला आहे. आशियाई स्तरावरील तलवारबाजी स्पर्धेचे यजमानपद भूषवण्याची भारताची ही हिलीच वेळ आहे. तलवारबाजीमधील 'आशिया चषक' म्हणून ओळखली जाणारी ही स्पर्धा आशिया-ओशनिया क्षेत्रातील सर्वात प्रतिष्ठित वार्षिक स्पर्धा आहे.

### दोहा डायमंड लीगमध्ये नीरज चोप्रा भाग घेणार

**नवी दिल्ली :** दुखापतीतून सावरलेला भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा १९ जून रोजी दोहा डायमंड लीगमध्ये पुन्हा एकदा स्पर्धात्मक मैदानात उतरणार आहे. पाठदुखीच्या समस्येमुळे २८ नीरज आतापर्यंत या हंगामातील स्पर्धामध्ये सहभागी होऊ शकला नव्हता. '२०२६ मधील पहिला थ्रो दोहामध्ये ! नीरज चोप्रा १९ जून रोजी स्पर्धात्मक मैदानात परतत आहे,' अशी घोषणा त्याच्या 'वेल स्पोर्टस' या व्यवस्थापन संस्थेने इंस्टाग्रामवर केली. या स्पर्धेसाठी चोप्राचा समावेश उशिरा करण्यात आला आहे, कारण १२ जून रोजी आयोजकांनी जाहीर केलेल्या यादीत त्याचे नाव नव्हते. गत वर्षी मे महन्यिात, ऑलम्पि-किमध्ये दोन पदके जिंकणाऱ्या या भारतीय खेळाडूने याच ठिकाणी ९० मीटरचा महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडला होता.

### भारतीय टेनिस संघाचे नेतृत्व सुमित, सहजाकडे

**नवी दिल्ली :** जपानमध्ये होणाऱ्या २० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेत भारताच्या टेनिस मोहिमेचे नेतृत्व अव्वल मानांकित एकेरी खेळाडू सुमित नागल आणि सहजा यमलापल्ली करतील. अखिल भारतीय टेनिस संघटनेने (एआयटीए) या स्पर्धेसाठी सोमवारी सहा सदस्यांचे पुरुष आणि महिला संघ जाहीर केले. आशियाड क्रीडा स्पर्धा १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीत आइची-नागोया येथे होणार आहेत. पुरुष संघात जागतिक क्रमवारीत २७७ व्या स्थानावर असलेला नागल, युवा मानस धामणे (३७८ वे स्थान) आणि डेव्हिस चषकाच्या मागील लढतीतील स्टार खेळाडू दक्षिणेश्वर सुरेश (४७८ वे स्थान) याचा समावेश आहे.

## दोनदा मुसंडी मारीत जपानने नेदरलँड्सला रोखले



**मॉन्टेरी, १५ जून**

फिफा विश्वचषकाच्या सलामीच्या सामन्यात दोनदा मुसंडी मारीत जपानने नेदरलँड्सला २-२ ने बरोबरीत रोखले.आशियातील सर्वात यशस्वी संघ, जपानने, गट 'एफ'च्या सलामीच्या सामन्यात दोनदा पिछाडीवरून जोरदगार मुसंडी मारली व नेदरलँड्सविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधली.

टेक्सासमध्ये ६९,२८५ प्रेक्षकांसमोर झालेल्या आपल्या विश्वचषक मोहिमेच्या सलामीच्या मिनिटाला बरोबरीचा गोल करत दोनदा पुनरागमन करून नेदरलँड्सविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधली. नेदरलँड्सचा कर्णधार व्हर्जिल व्हॅन डाइकने एका उत्कृष्ट हेडरने गोल केला, पण केटो नाकामुराने लगेचच बरोबरी साधली. त्यानंतर, साठव्या मिनिटालाच विंगर क्रायसेन्सियो समरविलेने खालच्या कोपऱ्यात एक अप्रतिम वळणदार फटका मारून गोल केला.


नेदरलँड्स संघ सामना पण सामन्याच्या अखेरच्या क्षणी जपानने बरोबरी साधली. दाइची कामाडाने गोल नोंदवून नेदरलँड्सचा विजय हिरावून नेला. दुखापतीमुळे जपान आणि नेदरलँड्स हे दोन्ही संघ महत्त्वाच्या खेळाडूंशिवाय उत्तर अमेरिकेत खेळत आहेत.

दोन्ही संघांना अनपेक्षित विजेते मानले जात आहे. नेदरलँड्स संघ तीन वेळा उपविजेता ठरला आहे, तर जपान संघ कधीही अंतिम १६ च्या पुढे जाऊ शकलेला नाही.

## आयारीचे दोन शानदार गोल; स्वीडनचा ५-१ ने विजय

**मॉन्टेरी, १५ जून**

स्वीडनने रविवारी फिफा विश्वचषक सामन्यात ट्युनिशियाचा ५-१ असा धुव्वा उडवला. या विजयामुळे उत्तर आफ्रिकन देशाच्या भक्कम बचावाचा लौकिक धुळीस मिळाला आणि स्वीडनने विश्वचषकाच्या 'गट एफ' मध्ये सुरुवातीची आघाडी घेतली.



मेक्सिकोमधील ग्वाडालुपे शहरात खेळल्या गेलेल्या या सामन्यात यासिन आयारीने दुरून मारलेल्या एका जबरदस्त फटक्याने संघाचे खाते उघडले, तर ३० व्या मिनिटाला अलेक्झांडर इसाकने स्वीडनची आघाडी दुप्पट केली. मध्यंतरापूर्वी ओमर रेकिकने ट्युनिशियासाठी एक गोल परत केला, परंतु व्हिक्टर ग्योकेरेसने पुन्हा एकदा स्वीडनला दोन गोलची आघाडी मिळवून दिली. त्यानंतर मॅटियास स्वानबर्गने संघाची धावसंख्या ४-१ अशी केली आणि त्यानंतर आयारीने आणखी एक अप्रतिम गोल नोंदवला.

स्वीडनचा संघ आणि प्रशिक्षक ग्रॅहम पॉटर यांच्यासाठी इथपर्यंतचा प्रवास अत्यंत खडतर आणि आव्हानात्मक होता. पात्रता फेरीत स्वीडनचा संघ आपल्या गटात तळाच्या स्थानावर राहिला होता आणि अंतिम फेरी गाठण्यासाठी त्यांना 'नेशन्स लीग' प्ले-ऑफच्या संधीचा आधार घ्यावा लागला होता. (वृत्तसंस्था)

## आजचे सामने

**१६ जून २०२६**

**फ्रान्स विरुद्ध सेनेगल**
**वेळ :** मध्य रात्री १२:३० वाजतापासून
**स्थळ :** मेटलाइफ स्टेडियम, न्यू जर्सी

**इराक वि. नॉर्वे**
**वेळ :** पहाटे ३:३० वाजतापासून
**स्थळ :** जिलेट स्टेडियम, बॉस्टन

**अर्जेंटिना विरुद्ध अल्जेरिया**
**वेळ :** मंगळवारी सकाळी ६:३० वाजतापासून
**स्थळ :** ॲरोहेड स्टेडियम, कॅन्सस सिटी

**ऑस्ट्रिया विरुद्ध जॉर्डन**
**वेळ :** मंगळवारी सकाळी ९:३० वाजतापासून
**स्थळ :** लेव्हीज स्टेडियम, सॅन फ्रान्सिस्को बे एरिया

**थेट : प्रसारण - युनाईट८ स्पोर्टस वाहिनीवर (झी५)**

## दत्तात्रय काळे व हेमंत वाघमारे यांची कॉम्रेड्स अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये उल्लेखनीय कामगिरी







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जून-**

दक्षिण आफ्रिकेतील डर्बन येथे झालेल्या जगप्रसिद्ध कॉम्रेड्स अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धेत सोलापूर पोलीस दलातील पोलीस निरीक्षक दत्तात्रय काळे आणि पोलीस कॉन्स्टेबल हेमंत वाघमारे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सोलापूरचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले.

राष्ट्रगीतानंतर पहाटे ५.३० वाजता स्पर्धेला सुरुवात झाली. यावर्षीची ८५.७७७ किलोमीटरची चढाची स्पर्धा डर्बन ते पीटरमॅरिट्झबर्ग या मार्गावर आयोजित करण्यात आली होती. जगातील सर्वात कठीण धावस्पर्धांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या स्पर्धेत तब्बल २१,६७८ धावपटूंनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत पोलीस निरीक्षक दत्तात्रय काळे यांनी ८५.७७७ किमी अंतर १० तास २३ मिनिटांत पूर्ण केले, तर पोलीस कॉन्स्टेबल हेमंत वाघमारे यांनी ९ तास २९ मिनिटांत पूर्ण करून उल्लेखनीय यश संपादन केले.

कॉम्रेड्स अल्ट्रा मॅरेथॉन ही केवळ धावण्याची स्पर्धा नसून 'द अल्टिमेट ह्यूमन रेस' म्हणून जगभर प्रसिद्ध आहे. स्पर्धेत अनेक कट-ऑफ पॉइंट्स असतात. निर्धारित वेळेत त्या ठिकाणी पोहोचता आले नाही तर स्पर्धक स्पर्धेबाहेर होतो. त्यामुळे ही स्पर्धा मानवी क्षमतेची खरी कसोटी मानली जाते.

खराब हवामान, प्रखर उष्णता, जीवघेणे चढ-उतार आणि शारीरिक-मानसिक आव्हाने यांचा सामना करत दोन्ही धावपटूंनी स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली. अंतिम ४०० मीटरमध्ये हजारो प्रेक्षकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे अंगावर शहारे आल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. अंतिम रेषा पार करून तिरंगा फडकावत भारताचा अभिमान जगासमोर मांडण्याचा अविस्मरणीय क्षण त्यांनी अनुभवला.

या उल्लेखनीय यशाबद्दल चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर तर्फे दत्तात्रय काळे व हेमंत वाघमारे यांचे अभिनंदन करण्यात आले.



## 'साऊथ सोलापूर आपटे ग्रुप'ला विजेतेपद

### विजय ट्रॉफी : मॉडेल क्रिकेट अकॅडमीचा ८ गडी राखून धुव्वा

#### निरंजन कदमचे झंझावाती शतक

**सोलापूर, दि. १५ जून-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर खेळवल्या गेलेल्या 'विजय ट्रॉफी ' च्या अंतिम सामन्यात 'साऊथ सोलापूर आपटे ग्रुप' संघाने 'मॉडेल क्रिकेट अकॅडमी ए'चा ८ गडी राखून दणदणीत पराभव केला आणि मानाच्या चषकावर आपले नाव कोरले.

निरंजन कदमचे स्फोटक शतक आणि आदर्श राठोडच्या संयमी अर्धशतकी खेळीच्या जोरावर साऊथ सोलापूरने हा अंतिम सामना एकतर्फी जिंकला. आपल्या वैयक्तिक १२५ धावांच्या वादळी शतकी खेळीने सामन्याला एकतर्फी बनवणारा निरंजन कदम हा या महामुकाबल्याचा खरा 'मॅन ऑफ द मॅच' ठरला.

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना 'मॉडेल क्रिकेट अकॅडमी ए' संघाने निर्धारित ४० षटकांत सर्वबाद २४२ धावा केल्या. त्यांच्याकडून विवेक अनची याने सर्वाधिक ६८ धावांची (७२ चेंडू) खेळी केली, तर डावाच्या अखेरीस स्वराज वाले याने ३९ चेंडूंत ५१ धावा कुटत संघाला सन्मानजनक धावसंख्येवर पोहोचवले. साऊथ सोलापूर आपटे ग्रुपच्या वतीने स्वप्नील हंचाटेने शानदार गोलंदाजी करत ३६ धावांत ३ बळी घेतले, तर आदर्श राठोडने अवघ्या २५ धावांत २ बळी घेत त्याला उत्तम साथ दिली.

२४३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना साऊथ सोलापूर आपटे ग्रुपची सुरुवात वादळी झाली. सामन्याचा मुख्य टर्निंग पॉईंट ठरली ती सलामीवीर निरंजन कदम आणि आदर्श राठोड यांच्यातील पहिल्या विकेटसाठी झालेली १७० धावांची भागीदारी! निरंजनने मॉडेल अकॅडमीच्या गोलंदाजांची पिसं काढत अवघ्या ८२ चेंडूंत ११ चौकार आणि ९ उत्तुंग षटकारांच्या मदतीने १२५ धावांची मॅचविनिंग शतकी खेळी केली. त्याला आदर्श राठोडने ६६ धावा (९० चेंडू) करून चोख साथ दिली. या भक्कम पायामुळे साऊथ सोलापूरने अवघ्या ३३.१ षटकांत २ बाद २४४ धावा करत ८ विकेट्स राखून सहज विजय मिळवला.

सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित केलेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा वरिष्ठ विधीज्ञ मिलिंद थोबडे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेंबर्सु, उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, संतोष बडवे, नितिन देशमुख आणि सुनील मालप आदी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राजेंद्र गोटे, बच्चूवार, बसवराज सलगर, राजू रंगम, उमेश मामड्याल आणि टूर्नामेंट कमिटीचे चेअरमन संजय वडजे यांनी परिश्रम घेतले.

## सोलापूर विद्यापीठात महिला महोत्सवाचा जल्लोष!

### राज्यातील पाच विद्यापीठांच्या महिला कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृतसेवा**
**सोलापूर, दि. १५ जून-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतरविद्यापीठ महिला कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा (महिला महोत्सव-२०२६) च्या पहिल्याच दिवशी उत्साह, ऊर्जा आणि सांस्कृतिक वैभवाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. राज्यातील पाच विद्यापीठांतील महिला कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवत रॅली, वैयक्तिक गायन, वैयक्तिक नृत्य, समूह गायन आणि समूह नृत्य स्पर्धांमधून आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडविले.



१५ ते १७ जून २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ समाजसेविका चंद्रिका चौहान यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे, परीक्षा संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, डॉ. गणेश काकंडीकर, प्रिसिजनचे फलटणकर, डॉ. केदारनाथ काळवणे, डॉ. अनिल घनवट, डॉ. मुकुंद माळी यांची उपस्थिती होती. प्रारंभी प्रभारी कुलसचिव तथा क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. त्यांनी महिला महोत्सवाच्या संकल्पनेची माहिती देताना या उपक्रमातून महिला कर्मचाऱ्यांमध्ये नेतृत्वगुण, संघभावना आणि आत्मविश्वास वृद्धिंगत होईल, असा विश्वास व्यक्त केला. महिला कर्मचाऱ्यांमधील क्रीडा, सांस्कृतिक आणि कलात्मक क्षमतांना प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यात परस्पर संवाद व स्नेहभाव वाढावा आणि विविध विद्यापीठांतील महिला कर्मचाऱ्यांना एक समान व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ या पाच विद्यापीठांतील महिला कर्मचारी सहभागी झाल्या आहेत.

### रॅली, गायन, नृत्य आणि सांस्कृतिक सादरीकरणांनी पहिला दिवस रंगला



#### विद्यापीठ परिसरातून आकर्षक रॅली

उद्घाटनापूर्वी सहभागी महिला कर्मचाऱ्यांनी विद्यापीठ परिसरातून आकर्षक रॅली काढून महोत्सवाचा प्रारंभ केला. त्यानंतर झालेल्या वैयक्तिक गायन स्पर्धेत एकूण ८ गायकांनी सुमधुर सादरीकरण करत वातावरण संगीतमय केले. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत पारंपरिक तसेच आधुनिक नृत्यशैलींचे मनोहारी दर्शन घडले. यात ७ जणांनी भाग घेऊन उत्साह निर्माण केला. समूह गायन आणि समूह नृत्य स्पर्धांनी तर उपस्थितांची विशेष दाद मिळवत सभागृह अक्षरशः दणाणून सोडले.

#### यश हे सांघिक प्रयत्नांचे फलित : चंद्रिका चौहान

यावेळी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ समाजसेविका चंद्रिका चौहान म्हणाल्या, विद्यापीठाच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांसाठी अशा क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करणे ही अत्यंत स्तुत्य बाब आहे. स्पर्धांमध्ये जय-पराजय असतोच; मात्र यश हे सांघिक प्रयत्नांचे फलित असते. क्रीडा क्षेत्रात जात, वय किंवा इतर कोणतेही भेद नसतात. अपयश आले तरी निराश न होता



पुढील संधीसाठी अधिक जोमाने तयारी करणे महत्त्वाचे आहे. पहिल्याच वर्षी राज्यातील पाच विद्यापीठांचा सहभाग मिळणे ही या उपक्रमाची मोठी जमेची बाजू आहे. त्यांनी महिला कर्मचाऱ्यांना एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन करत, मानसिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम राहून सकारात्मक ऊर्जा जपण्याचा संदेश दिला.

#### प्रशासकीय इमारतीतील भव्य सभागृहाचा प्रत्यक्ष वापर सुरू : कुलगुरू

अध्यक्षीय समारोपात कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर म्हणाले, या महिला महोत्सवाच्या निमित्ताने नवीन प्रशासकीय इमारतीतील भव्य सभागृहाचा प्रत्यक्ष वापर सुरू झाला. कोणतीही नवीन सुविधा वापरात आणताना काही अडचणी येतात; मात्र त्यावर मात करत या सभागृहाचा वापर टप्प्याटप्प्याने वाढविला जाईल. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक विकासाला चालना देण्याबरोबरच हे सभागृह विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांनाही उपलब्ध करून देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे, असे ही ते म्हणाले. यावेळी त्यांनी सर्व महिला कर्मचाऱ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवाजी शिंदे आणि डॉ. यशपाल खेडकर यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## मंगळवेढा पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १५ जून -**

सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये मंगळवेढा येथील ५ पोलिस कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे.

सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी नुकतेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढले आहेत. मंगळवेढा पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार तुकाराम कोळी (पंढरपूर), श्रीमंत पवार (पोलिस मुख्यालय), दौलत तळवार (सांगोला), पोलीस नाईक कृष्णा जाधव (पोलिस मुख्यालय),महिला पोलिस अंमलदार कविता मिसाळ (पंढरपूर) अशा बदल्या झाल्या आहेत. पोलिस अंमलदार प्रविण सावंत (एक वर्ष मुदतवाढ), पोलिस उपनिरीक्षक राजेश पवार (एक वर्ष मुदतवाढ) यांना मुदतवाढ दिली आहे. मंगळवेढ्याला सहाय्यक फौजदार सिध्देश्वर माळी, पोलिस हवालदार परशुराम शिंदे, पोलिस नाईक महेश पवार, पोलिस अंमलदार सागर देसाई, पोलिस अंमलदार शिवाजी खटकळे आदी कर्मचारी बदली होवून आले आहेत.

# माझी वसुंधरा योजनेतील झाडांची होणार उलट तपासणी

### गटविकास अधिकाऱ्यांनी झाडांची पाहणी करण्यासाठी नेमले पथक

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१५ जून-**

मंद्रूप ग्रामपंचायतीकडून दीड कोटी रुपये निधीतून लागवड केलेल्या झाडांची संख्या व सद्यस्थिती पाहण्यासाठी उलट तपासणी करण्याची बातमी दैनिक तरूण भारतने १५ जून रोजी प्रसिध्द केली होती. या वृत्ताची दखल घेऊन दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी झाडांची स्थळ पाहणी करण्यासाठी पथक नेमले आहे. पथकाकडून अहवाल आल्यानंतरच बिल देण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

मंद्रूपमध्ये गणेशोत्सव, नवरात्र व इतर उत्सवादरम्यान मोठ्या प्रमाणात झाडे लावण्यात आली आहेत. त्या झाडांची संख्या वाढवून माझी वसुंधरा योजनेतील दीड कोटी बिल काढण्याचा मंद्रूप ग्रामपंचायतीकडून प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने लावलेल्या झाडांची जियो टॅगिंग करून त्यांची संख्या निश्चित करण्याची मागणी पर्यावरण प्रेमींमधून करण्यात येत आहे.



आधी लावल्यानंतर वाळलेले झाड



दोन दिवसापूर्वी लावलेले रोप



नवीन लागवडीसाठी आणलेली रोपे

**दैनिक तरूण भारतचे अभिनंदन**

दैनिक तरूण भारतने पर्यावरण संवर्धनासाठी मंद्रूप ग्रामपंचायतीमधील झाडे लावण्यातील भ्रष्टाचार उघडकीस आणला आहे. त्यामुळे दैनिक तरूण भारतचे अभिनंदन! पथकाने नवीन व जुनी झाडे यांची खात्री करूनच अहवाल द्यावा, अन्यथा वरिष्ठांकडे तक्रार करणार आहे. **- सोनाली कडते, जिल्हा परिषद सदस्या, मंद्रूप.**

**दोन दिवसापूर्वी लावली झाडे**

**दैनिक तरुण भारतच्या वृत्ताची दखल**

सहा महिन्यापूर्वी लावलेली झाडे पाण्याअभावी व देखभाल न केल्याने वाळून गेली आहेत. त्यामुळे झाडांची स्थळ पाहणी होणार असल्याचे सांगितल्यानंतर ग्रामपंचायतीकडून दोन दिवसापूर्वी झाडे लावण्यात आली आहेत. त्यामुळे पथकाने त्यांची योग्य शहानिशा करूनच त्यांची मोजमाप करावे, अशी मागणी सजग नागरिकांकडून होत आहे.

# प्रत्यक्ष झाडे पाहिल्याशिवाय बिले काढणार नाही

### बीडीओ मनोज राऊत यांचे स्पष्टीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १५ जून -**

मंद्रूप ग्रामपंचायतीमार्फत माझी वसुंधरा योजनेतून दीड कोटी निधीचे वृक्षारोपण केले आहे. मात्र लावलेली झाडे पाण्याअभावी करपून गेली आहेत. तर अनेक ठिकाणी झाडेच दिसत नाहीत. केवळ कागदावर झाडांची संख्या अधिक दाखवून मंद्रूप ग्रामपंचायतकडून बिल काढण्याचा खटाटोप सुरु आहे. याबाबत दक्षिणच्या गटविकास अधिकाऱ्यांनी झाडे व स्थळ पाहणी केल्याशिवाय बिल देणार नसल्याचे सांगितले आहे. तसेच ग्रामपंचायत व सत्ताधाऱ्यांकडून राजकीय व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दबाव आणून बिल काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

मंद्रूप ग्रामपंचायतीला माझी वसुंधरा योजनेतून दोन पुरस्कार मिळाले आहेत. त्यासाठी दोन कोटी ७५ लाख रुपयांचे बक्षीसही मिळाले आहे . यातील एक कोटीहून अधिक रक्कम सौर पॅनलवर खर्च केली आहे. उर्वरित रकमेतून मंद्रूपमध्ये दर्शनी भागात वृक्षारोपण करून दीड कोटी बिल काढण्याचा ग्रामपंचायतीचा खटाटोप सुरू आहे. यासाठी बांधकाम विभागाच्या सहायक अभियंत्याकडून मोजमाप करून बिल सादर केले आहे. मात्र दक्षिण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (बीडीओ) मनोज राऊत यांनी पर्यावरण संवर्धनाचा विषय महत्वाचा असल्यामुळे झाडांची प्रत्यक्ष संख्या पाहिल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे बिल देणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून राजकीय व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दबाव आणण्यात येत असल्याचे राऊत यांनी सांगितले.



**सहाय्यक अभियंत्यांवर कारवाईची मागणी**

माझी वसुंधरा योजनेतून पर्यावरण पूरक व पर्यावरण संवर्धनाचे काम करण्यासाठी ग्रामपंचायतींना पुरस्कार देण्यात आला. मात्र या निधीतून ग्रामपंचायतीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून बोगस बिले काढण्याचा प्रयत्न होत आहे. मंद्रूपमध्ये झाडांची संख्या कमी व झाडे वाळली असतानाही बोगस मोजमाप पुस्तिका सादर करणाऱ्या बांधकाम विभागाच्या सहाय्यक अभियंत्यांवर वरिष्ठांनी कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.





## महाराष्ट्र समाजरत्न आदर्श पत्रकार पुरस्काराने संजय पाटील सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि १५ जून-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील पत्रकार संजय ज्ञानेश्वर पाटील यांना ए.डी फाऊंडेशनच्या वतीने महाराष्ट्र समाजरत्न आदर्श पत्रकार पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

सोलापूर येथे माजी पशुसंवर्धन मंत्री महादेव जानकर, पोलिस उपाधिक्षक प्रदीप गोरड, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा माने, अजित पाटील, ए. डी. फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड, राष्ट्रवादी काँग्रेस सांगलीचे जिल्हाध्यक्ष विवेक कोकरे, प्रा. सतीश कुलाळ आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पत्रकार संजय पाटील यांच्या गेल्या तेवीस वर्षांतील पत्रकारिता क्षेत्रातील तसेच सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा राज्यस्तरीय महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. संजय पाटील यांना यापूर्वीही अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. संजय पाटील यांचे माजी विद्यार्थी संघटना आठवणी ९५, पिलीव पत्रकार संघ तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे. सत्काराला उत्तर देताना संजय पाटील यांनी ए.डी.फाऊंडेशनने माझ्या सामाजिक कार्याची दखल घेऊन मला हा पुरस्कार दिला. मात्र या पुरस्कारामुळे मला सर्व सामान्यांसाठी जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली असल्याचे सांगितले.

## माढा न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेतून आरोपीची बार्शी न्यायालयात निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १५ जून -**

उपळवटे ता. माढा येथे २०१३ साली घडलेल्या घटनेतील शिक्षेतून आरोपीची बार्शी जिल्हा व सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे.

सख्ख्या चुलत भावाच्या शेतात आरोपीची जनावरे गेल्याच्या कारणावरुन वाद झाला होता. टेंभुर्णी पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. माढा येथील जे.एम.एस.सी. कोर्टाने आरोपी भैरु डांगे याच्याविरुद्ध खटला चालवून २०१९ रोजी शिक्षा सुनावली होती. शिक्षेविरोधात आरोपीने ॲड. गणेश हांडे यांच्यामार्फत बार्शी जिल्हा व सत्र न्यायालयात अपील दाखल केले होते.

अपिलात ॲड. गणेश हांडे यांनी आरोपीने ज्या शस्त्राने जखमीला मारहाण केली, ते जप्त केले नाही, पोलिस तपासात जखमींचा एक्सरे काढला तो रेकॉर्डवर नाही, एफ.आय.आर.मधील जे वादाचे कारण सांगितले, त्या बाबतीत पोलिसांनी तपासच केला नाही, जाणीवपूर्वक खोटे साक्षीदार तयार केले, घटना स्थळाचा पंचनामा सिद्ध होत नाही आदी मुद्दे युक्तीवादात उपस्थित केले. आरोपीविरुद्ध खोटा गुन्हा दाखल केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. सर्वोच्च न्यायालयाचे न्याय निवाड्यांचा संदर्भही दिला. ॲड गणेश हांडे यांनी केलेला हा युक्तिवाद ग्राह्य धरत बार्शी जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

# नजरचुकीने ५ लाखांऐवजी ५० लाख रुपये ट्रान्सफर

### उर्वरित ४५ लाख परत न केल्याने फसवणुकीची तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.१५ जून -**

बार्शी शहरातील एका व्यावसायिकाने नजरचुकीने ५ लाख रुपयांऐवजी तब्बल ५० लाख रुपये ऑनलाइन ट्रान्सफर केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. संबंधित व्यक्तीने वारंवार मागणी करूनही उर्वरित ४५ लाख रुपये परत न मिळाल्याने विश्वासघात व फसवणूक झाल्याप्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी अमित कटारिया हे बार्शी शहरातील पटेल चौकात कपड्याचा व्यवसाय करतात. दि. ७ जून रोजी त्यांचे मित्र सुशांत बाळकृष्ण शहाणे यांनी फोन करुन त्यांच्या ग्राहकाच्या खात्यावर ५ लाख रुपये पाठविण्याची विनंती केली होती. त्यानुसार शहाणे यांनी रामभाऊ सुनिल मोरे यांचा बँक खाते क्रमांक फिर्यादी यांना पाठविला. ७ जून रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास अमित कटारिया यांनी नेट बँकिंगद्वारे संबंधित खात्यावर पैसे हस्तांतरित केले. मात्र दुसऱ्या दिवशी बँकेचा संदेश तपासल्यानंतर त्यांच्या खात्यातून ५० लाख रुपये वळते झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर नेट बँकिंग तपासणी केली असता ५ लाख रुपयांऐवजी चुकून ५० लाख रुपये पाठविल्याचे स्पष्ट झाले.

घडलेल्या प्रकाराची माहिती कटारिया यांनी मित्र सुशांत शहाणे, प्रशांत शहाणे तसेच मुन्ना पिंजारी यांना दिली. त्यानंतर सर्वांनी मिळून राम मोरे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांच्या खात्यात ५० लाख रुपये जमा झाल्याची कबुली त्यांनी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. प्राप्त रकमेपैकी ४५ लाख रुपये कटारिया यांच्या खात्यावर धनादेशाद्वारे वर्ग करण्याचे आश्वासन दिल्याचेही म्हटले आहे. मात्र त्यानंतर वारंवार पाठपुरावा करुनही संबंधित व्यक्तीकडून विविध बँकिंग कारणे सांगून रक्कम परत करण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप केला आहे.

याप्रकरणी फिर्यादी अमित कटारिया यांनी रामभाऊ सुनिल मोरे (मूळ रा. साकत, ता. बार्शी, सध्या खापाबंदर, पौंडा, गोवा) यांच्याविरोधात विश्वासघात व फसवणुकीची तक्रार दिली आहे.

## भाळवणीत जुगार अड्ड्यावर छापा; सुमारे पावणेचार लाखांचा मुद्देमाल जप्त

### १ १ २ डायल क्रमांकावर माहिती देवून तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १५ जून-**

भाळवणी ग्रामपंचायतीजवळ काही लोक जुगार खेळत असल्याची माहिती ११२ डायल क्रमांकावर पोलिसांना मिळताच पोलिसांनी सदर ठिकाणी जावून छापा टाकला. कारवाईत ३ लाख ६३ हजार ६८० रुपयांच्या जुगार साहित्यासह मुद्देमाल जप्त केला. तसेच सात जणांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

मनोहर सोपान घुले, संभाजी शिवाजी चव्हाण, सोमनाथ शंकर दोडके, चिनबसू बसवेश्वर स्वामी, दामाजी महादेव साखरे, गणपत मारुती माने (सर्व रा.भाळवणी), दत्तात्रय वसंत बिले (रा.खोमनाळ) अशी गुन्हा दाखल केलेल्यांची नावे आहेत. दि.१३ जून रोजी मंगळवेढा पोलिस ठाण्यात डायल क्रमांक ११२ वर एकाने याबाबत माहिती दिली होती. त्याची दखल घेवून पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली बोराळे बीटचे पोलिस उपनिरिक्षक नागेश बनकर यांच्यासह पोलिस कर्मचारी सदर ठिकाणी ४.४० वाजता हजर झाले. त्यावेळी पोलिसांना वरील आरोपी गोलाकार बसून पैशाची पैज लावून जुगार खेळत असताना सापडले. त्यांना पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेतले. पोलिसांनी सदर ठिकाणावरून ७ मोटरसायकली,६ मोबाईल, आकडेमोड केलेल्या चिठ्ठया, पत्ते, ६१८० रुपये रोख रक्कम असा एकूण ३ लाख ६३ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याची फिर्याद सिध्दनाथ शिंदे यांनी दिली आहे.

## निधन वृत्त...

### मुरलीधर वगरे



**पिलीव, दि. १५ जून-**

माळिशरस तालुक्यातील पिलीव येथील श्री महालक्ष्मी देवीचे पुजारी व पिलीव विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेचे माजी संचालक मुरलीधर रामचंद्र वगरे यांचे वृद्धापकाळाने व अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. ते ९१ वर्षाचे होते त्यांच्या पश्चात एक मुलगा पाच मुली, सून, जावई नातवंडे, परतवंडे, एक बंधू, पुतण्या, दोन बहिणी असा परिवार आहे. श्री महालक्ष्मी देवीचे ते पुजारी व श्री महालक्ष्मी देवी यात्रा कमिटीचे संचालक दादासाहेब वगरे यांचे ते वडील होते.

### दादासाहेब पाटील



**मोहोळ, दि. १५ जून-**

तबलावादक व ज्येष्ठ गुरु, वारकरी संप्रदायाचे गाढे अभ्यासक, कलापिनी संगीत विद्यालयाचे संस्थापक पं. दादासाहेब पाटील (रा . खंडाळी) यांचे सोमवार, दि. १५ जून रोजी सकाळी ६ वा अल्पशा आजाराने निधन झाले. संगीत, अध्यात्म आणि समाजसेवा या क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या निधनामुळे संगीत, वारकरी आणि सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली असून सर्व स्तरांतून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, दोन मुले, दोन सुना, नातवंडे असा परीवार आहे. युवा तबला वादक अविनाश पाटील यांचे ते वडील आहेत.

### इस्माईल शेख



**सोलापूर, दि. १५ जून-**

नई जिंदगी भागातील रहिवाशी म. इस्माईल उमरसाब शेख यांचे अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. मृत्यू समयी ते ७६ वर्षाचे होते. त्यांची अंत्ययात्रा दुपारी दोन वाजता त्यांच्या १०२ सिद्धेश्वर गांधीनगर, मजरेवाडी येथील राहत्या घरापासून काढून जडेसाब मुस्लिम कब्रस्तान येथे त्यांचा दफन विधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त सहाय्यक फौजदार मोहियोद्दीन उमर शेख यांचे ते लहान बंधू होत.

# विवाह संस्था बदलती आव्हाने आणि सामाजिक उत्तरदायित्व


**विवाह ही केवळ दोन व्यक्तींची गाठ नसून दोन कुटुंबांचा, संस्कृतींचा आणि मूल्यांचा संगम असतो. भारतीय संस्कृतीत विवाहाला 'संस्कार' मानले गेले आहे. मात्र, बदलत्या जागतिकीकरणात आणि आधुनिक जीवनशैलीत या पवित्र संस्थेला अनेक तडे जात असल्याचे चित्र आज समाजात दिसत आहे. विवाह जमण्यातील अनंत अडचणींपासून ते घटस्फोटाच्या वाढत्या प्रमाणापर्यंतच्या समस्यांचा ऊहापोह करणे आज काळाची गरज बनली आहे.**

-------------------------------

**विवाह जमण्यातील प्रमुख अडथळे एक सामाजिक पेच**

आजच्या काळात लग्नाचे वय वाढणे आणि स्थळे न मिळणे ही एक मोठी समस्या बनली आहे. याची काही प्रमुख कारणे अवाजवी अपेक्षा वधू आणि वर पक्षाकडून एकमेकांकडून असलेल्या अपेक्षा खूप वाढल्या आहेत. शिक्षण, पगार, दिसणे आणि कौटुंबिक पार्श्वभूमी यामध्ये 'परफेक्ट' जोडीदार हवा असतो, ज्यामुळे जुळणी कठीण होते. शिक्षण आणि करिअर यात करिअर सेट करण्याच्या नादात तरुण-तरुणींचे वय ३० च्या पुढे जाते. वाढत्या वयानुसार योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता कमी होत जाते. मुलींचे स्वावलंबन यामध्ये आजच्या मुली सुशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहेत. त्यांना स्वतःच्या विचारांशी जुळणारा जोडीदार हवा असतो, ज्यामुळे जुन्या पद्धतीचे 'जुळवून घेणे' आता कमी झाले आहे.

कुंडली आणि गुणमेलन: आजही अनेक ठिकाणी केवळ गुण जुळत नाहीत म्हणून चांगली स्थळे नाकारली जातात. शहरी विरुद्ध ग्रामीण: ग्रामीण भागातील मुलांशी लग्न करण्यास शहरी मुली सहसा तयार नसतात, तर शेती करणाऱ्या मुलांसाठी मुली मिळणे ही मोठी सामाजिक समस्या बनली आहे. वधू आणि वर दोन्ही पक्षांकडून एकमेकांबद्दलच्या अपेक्षांची व्याप्ती खूप वाढली आहे. केवळ पत्रिका किंवा गुण जुळणे पुरेसे नसून, पगाराचे मोठे आकडे, स्वतःचे घर, राहणीमान आणि बाह्य सौंदर्याचे निकष यात 'परफेक्ट' जोडीदार शोधण्याच्या नादात अनेक मौल्यवान वर्षे निघून जातात. करिअर आणि वयाची मर्यादा - उच्च शिक्षणाच्या आणि करिअरमध्ये स्थिर होण्याच्या शर्यतीत विवाहाचे वय वाढत चालले आहे. पूर्वी विशीत होणारे विवाह आता तिशीकडे सरकले आहेत. वयाची तिशी ओलांडल्यानंतर आवडीनुसार स्थळे मिळणे अधिक कठीण होते.



शहरी विरुद्ध ग्रामीण दरी ही समस्या विशेषतः मुलांच्या बाबतीत प्रकर्षाने जाणवते. शेती करणाऱ्या किंवा ग्रामीण भागात राहणाऱ्या मुलांशी लग्न करण्यास शहरी मुलींचा असलेला नकार हा एक गंभीर सामाजिक प्रश्न निर्माण करत आहे. यामुळे ग्रामीण भागातील मुलांच्या विवाहाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**घटस्फोटाची वाढती कारणे**

पूर्वी 'घटस्फोट' हा शब्द समाजात निषिद्ध मानला जायचा, मात्र आता हे प्रमाण चिंताजनक रतीने वाढले आहे. संवादाचा अभाव: पती-पत्नीमध्ये एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलण्याची कमी आणि ईगो (अहम) जास्त असतो. छोट्या वादांचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. सहिष्णुतेचा अभाव पूर्वीच्या पिढीत 'सहन करण्याची' वृत्ती होती, जी आता कमी झाली आहे. 'मी का झुकू?' हा विचार नात्यात दुरावा आणतो. विभक्त कुटुंब पद्धती घरात वडीलधारे माणसे नसल्यामुळे भांडण सोडवणारे कोणी नसते. दोन तरुण व्यक्ती रागाच्या भरात टोकाचे निर्णय घेतात. व्यसनाधीनता आणि विवाहबाह्य संबंध: सोशल मीडियाचा अतिवापर आणि बदलती जीवनशैली यामुळे विश्वासाला तडा जाण्याचे प्रमाण वाढले आहे. आर्थिक वाद खर्च करण्याची पद्धत, कर्ज आणि आर्थिक नियोजनावरून होणारे वाद घटस्फोटास कारणीभूत ठरतात. ती म्हणजे विस्कळीत होणारी नाती विवाह झाला तरी तो आयुष्यभर टिकवणे ही आज एक मोठी कसरत ठरत आहे. घटस्फोटाच्या वाढत्या प्रमाणामागे काही मानसिक आणि सामाजिक घटक कारणीभूत आहेत संवादाचा अभाव आणि 'ईगो': पती-पत्नीमध्ये वैचारिक देवाणघेवाण कमी होऊन अहमपणा वाढला आहे. 'मीच का झुकू?' किंवा 'माझेच म्हणणे खरे' ही वृत्ती नात्यात दुरावा निर्माण करते. संवादाची जागा आता सोशल मीडिया आणि मोबाईलने घेतली आहे. विभक्त कुटुंब पद्धती -पूर्वी एकत्र कुटुंबात वडीलधारी मंडळी मध्यस्थी करून छोटे-मोठे वाद मिटवत असत. आता विभक्त कुटुंबामुळे रागाच्या भरात घेतलेले टोकाचे निर्णय थेट न्यायालयाच्या पायरीपर्यंत पोहोचतात. मार्गदर्शनाचा आणि समजूतदारपणाचा अभाव नात्याला मारक ठरत आहे. सहिष्णुतेची कमतरता बदलत्या जीवनशैलीमुळे संयम आणि सहनशीलता कमी झाली आहे. एकमेकांच्या त्रुटी स्वीकारण्याऐवजी छोट्या-छोट्या चुकांना अक्षम्य मानून नाते तोडण्याकडे तरुण पिढीचा कल वाढला आहे.

**समाजाची भूमिका आणि वाढती अनास्था**

समाज ही एक मोठी शक्ती आहे, पण लग्नासारख्या वैयक्तिक विषयात समाज मागे पडताना दिसतो, कारण: बदलेली मानसिकता: आता 'आमच्या घरात ढवळाढवळ करू नका' अशी प्रवृत्ती वाढली आहे. त्यामुळे नातेवाईक किंवा शेजारी मध्यस्थी करण्यास घाबरतात. स्वार्थी वृत्ती प्रत्येक जण आपल्या स्वतःच्या कामात आणि प्रपंचात व्यस्त आहे. समाजासाठी किंवा इतरांच्या कल्याणासाठी वेळ देण्याची वृत्ती कमी झाली आहे. जातीपातीची बंधने: समाज आजही जातीच्या चौकटीत अडकलेला आहे. 'आपल्या जातीतच लग्न व्हावे' या अट्टहासामुळे अनेक चांगली स्थळे हातातून जातात, पण समाज या चौकटीबाहेर येण्यास तयार नाही. बदनामीची भीती कोणाचे लग्न जमवून दिले आणि उद्या ते टिकले नाही, तर नाव आपल्यावर येईल या भीतीने लोक पुढाकार घेत नाहीत. लग्नासारख्या महत्त्वाच्या कौटुंबिक विषयात समाज एकत्रित का येत नाही, हा प्रश्न मनाला चटका लावणारा आहे. पूर्वी 'गाव' किंवा 'समाज' एका मोठ्या कुटुंबासारखा उभा राहायचा, पण आता चित्र बदलले आहे प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या परिघात मर्यादित झाली आहे. 'दुसऱ्याच्या वैयक्तिक आयुष्यात आपण कशाला पडायचे?' ही वृत्ती बळावल्यामुळे सामाजिक मध्यस्थी जवळजवळ संपली आहे. विवाह जमवणे ही आता एक व्यावसायिक सेवा झाली आहे, जिथे भावनेपेक्षा 'नोंदणी शुल्क' महत्त्वाचे ठरते. पुढारपण घेण्याची भीती कोणाचे लग्न जमवून दिले आणि उद्या त्या संसारात काही बिघाड झाला, तर त्याचे खापर आपल्यावर येईल, या भीतीने समाजातले जाणते लोकही आता पुढाकार घेण्यास कचरतात. विवाह संस्था वाचवण्यासाठी केवळ वधू-वर मेळावे भरवून किंवा नोंदणी केंद्रे चालवून भागणार नाही.

**यासाठी खालील गोष्टी आवश्यक आहेत**

१)अपेक्षांची वास्तवता: पालकांनी आणि मुलांनी जोडीदार निवडताना बाह्य गोष्टींपेक्षा स्वभावाला जास्त महत्त्व द्यावे.

२)समुपदेशन लग्नापूर्वी आणि लग्नानंतर उद्भवणाऱ्या वादांसाठी तज्ज्ञांची मदत घेण्यास लाजू नये.

३)सामाजिक पुढाकार: प्रत्येक समाजाने आपली 'वधू-वर सूचक केंद्रे' केवळ नोंदणीसाठी न ठेवता, प्रबोधनासाठी वापरली पाहिजेत.

४)संयम नाते टिकवण्यासाठी दोन्ही बाजूंनी सामंजस्य आणि समजूतदारपणा दाखवणे काळाची गरज आहे.

थोडक्यात सांगायचे तर, नाती ही रक्ताने नाही तर विश्वासाने आणि प्रेमाने टिकतात. जेव्हा समाज 'मी' कडून 'आम्ही' कडे प्रवास करेल, तेव्हाच या समस्या सुटण्यास सुरुवात होईल.

याकरिता तरुण पिढीचे आणि त्यांच्या पालकांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. एकमेकांचा आदर, संयम, त्याग आणि अपेक्षांमध्ये लवचिकता आणल्याशिवाय ही व्यवस्था भक्कम होणार नाही. समाजानेही केवळ 'प्रेक्षक' न राहता, पुन्हा एकदा जबाबदार 'मध्यस्थाची' आणि 'मार्गदर्शकाची' भूमिका पार पाडणे अपेक्षित आहे. जेव्हा आपण 'स्व' कडून 'सर्व' कडे जाऊ, तेव्हाच समाजाचे स्वास्थ्य टिकून राहील.

**- रविंद्र नाशिककर,**
**अध्यक्ष कौस्तुभ ब्राम्हण वधू वर सूचक केंद्र**

## महत्वाचे...

### नाकोडो रेसिडेन्सीमधून ६० हजारांची रोकड चोरीस

**सोलापूर, दि.१५ जून-**
बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने पूना नाका परिसरातील नाकोडो रेसि फेज २ मधून ६० हजाराची रोख रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. याबाबत भरत कमल किशोर कांबरा (रा.७०१ नाकोडो रेसी फेज २, पुना नाका, सोलापूर) यांनी जोडभावी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. दि १२ जून रोजी पहाटे ४ वा ते दि.१४ जून रोजी रात्री ८ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे भाऊ धिरज काबरा यांचे बंद घराचे कुलूप तोडून बेडरुममधील कपाटाचे ड्राव्हरमध्ये ठेवलेले ६० हजार रुपये रोख रक्कम चोरुन नेले, असे फिर्यादीत म्हटले आहे.

### घरातून मोबाईल लंपास, ११ महिन्यानंतर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.१५ जून-**
उघड्या घरात प्रवेश करून चोरट्याने बिछान्यावरील दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याप्रकरणी घटनेच्या ११ महिन्यानंतर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रोहन सिध्दराम हबगोंडे (वय-१९, रा.मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) याने फिर्याद दिली आहे. दि १६ जुलै २०२५ रोजी पहाटे ५ ते सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान फिर्यादीने आपला मोबाईल घरात अंथरुणावर ठेवले होते, असे फिर्यादीत म्हटले आहे.



### तांदुळवाडी येथील अपघातग्रस्तांना भाऊसाहेब रुपनर यांची श्रद्धांजली

**सांगोला,दि.१५ जून-**
पिकअप वाहनाचा तांदुळवाडी (ता.माळिशरस) येथे झालेल्या भीषण अपघातात ५ महिला आणि ६ महिन्यांच्या चिमुकल्यासह एकूण ८ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातस्थळी भेट देऊन फॅबटेक उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब रुपनर यांनी मृतांना श्रद्धांजली अर्पण केली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांच्या मदतीने इरफान मुजावर यांनी धाडसाने बचावकार्य करत चार जणांचे प्राण वाचवले. त्यांच्या या शौर्यपूर्ण कार्याची शासनाने दखल घेऊन अधिकृत सन्मान करावा, अशी मागणी भाऊसाहेब रुपनर यांनी केली. यावेळी बाळासाहेब एरंडे, नागेश फाटे, पोपट गडदे व नागरिक उपस्थित होते.

### वाढत्या भारनियमना विरोधात माजी आ.दीपकआबा साळुंखे पाटील आक्रमक

**सांगोला,दि.१५ जून-**
सांगोला शहर, तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने सध्या खरिपाच्या पेरण्या लांबणीवर चालल्या आहेत. भूजल पातळी खालावल्याने तीव्र पाणी टंचाई जाणवू लागली आहे. त्यातच वीज वितरण कंपनीने तालुक्यात शेतकरी आणि पशुपालकांना भारनियमनाचा धक्का दिल्याने माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील आक्रमक झाले. त्यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांना घेऊन थेट महावितरणच्या कार्यालयात धडक दिली. भारनियमनाच्या वेळेत बदल न केल्यास आणि वीज वितरण कंपनीच्या अन्य तक्रारी बाबत प्रशासनाने वेळेत दुरुस्ती केली नाही तर यापुढील काळात वीज वितरण कंपनीच्या कार्यालयांना टाळे ठोकून पुढे रस्ता रोको सारखे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला. यावेळी सभापती पुनम इंगवले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. तहसीलदार बाळूताई भागवत आणि वीज वितरण कंपनीचे उपअभियंता बनसोडे यांना निवेदन देण्यात आले.

# पंढरपूर नगरपालिकेच्या आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह; मृतांच्या वाहतुकीस अडचण

## नगरपालिकेच्या तीन शववाहिका धुळखात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर ,दि.१५ जून-**
तांदूळवाडी (ता.माळिशरस) येथे रविवारी झालेल्या दुर्दैवी अपघातात पंढरपूर तालुक्यातील ८ जणांचा मृत्यू झाल्यानंतर मृतांचे पार्थिव त्यांच्या घरी नेण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर पंढरपूर नगरपालिकेच्या शववाहिका सेवांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

माजी नगरसेवक विक्रम शिरसट यांनी आरोप केला की, नगरपालिकेच्या मालकीच्या तीन शववाहिका सध्या वापराअभावी धुळखात पडल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत उपयोग झाला नाही. परिणामी, मृतांच्या नातेवाईकांना पार्थिव वाहतुकीसाठी पर्यायी व्यवस्था मंदिर समितीची रुग्णवाहिका बोलवावी लागली.




राज्याचे मंत्री गिरीश महाजन, जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या निदर्शनास ही बाब आणून देण्यात आली. नगरपालिकेकडील बंद अवस्थेतील शववाहिका तात्काळ सुरु कराव्यात, जेणेकरून भविष्यात अशा आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांची गैरसोय होणार नाही, अशी मागणीही विक्रम शिरसट यांनी केली. यावेळी पिंटु शिंदे व विशाल तुपसौंदर हे उपस्थित होते.




### वाहनाच्या धडकेत पादचारी वृध्दाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जून-**
रिव्हर्स येणाऱ्या वाहन धडकेत एक ८३ वर्षीय पादचारी वृद्ध पंढरपूर तालुक्यातील शंकरगाव येथे रविवारी मयत झाला. मसू भुजा चंदनशिवे (वय-८३, रा.शंकरगाव) असे मयत वृद्ध व्यक्तीचे नाव आहे. ते रविवारी सकाळी राहत्या घरापासून पायी चालत निघाले असताना समोरून रिव्हर्स येणाऱ्या एका चारचाकी वाहनाचा धक्का लागला. त्यात ते रस्त्यावर पडून जखमी झाले. त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात नातू अर्जुन यांनी दाखल केले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# वीरतपस्वी पंचमुखी परमेश्वर मठाच्या सभामंडपासाठी देणार एक कोटींची देणगी

## आमदार देवेंद्र कोठे : धर्मसभा व सांगता समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**
अक्कलकोट रस्त्यावरील वीरतपस्वी पंचमुखी परमेश्वर मठाच्या सभा मंडपासाठी एक कोटी रुपयांची देणगी देणार असल्याची घोषणा आमदार देवेंद्र कोठे यांनी केली. अधिक मासानिमित्त वीरतपस्वी पंचमुखी परमेश्वर मठात आयोजित करण्यात आलेल्या विविध धार्मिक कार्यक्रमास आमदार देवेंद्र कोठे यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले. यावेळी श्रीमद काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्री श्री श्री १००८ जगतगुरु



डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांची इष्टलिंग पूजा जगदगुरु उत्सव, धर्मसभा आणि सांगता समारंभ झाला.

विष्णुपंत नगरात विविध रस्त्यांसाठी ४० लाख रुपयांचा निधी, मल्लिकार्जुन नगर येथील अनेक वर्षांपासून प्रलंबित मुख्य रस्त्यांची कामे अंतिम टप्प्यात सुरू आहेत, असेही आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले. याप्रसंगी नागणसूर मठाचे श्री श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी, माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी, काशीपीठाचे डॉ.शैलेश पाटील, नगरसेवक अजय पोन्नम, मीनाक्षी कडगंची, राजकुमार हंचाटे, गुरुशांत धुत्तरगांवकर, प्रकाश वाले, मल्लिनाथ मसरे, अप्पू कडगंची आदी उपस्थित होते.

# विकास निधीमध्ये समान न्याय मिळालाच पाहिजे

## खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१५ जून-**
जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष म्हणून पालकमंत्र्यांची भूमिका केवळ राजकीय कार्यक्रमांना उपस्थित राहणे किंवा निवडणुकांच्या काळात जिल्हाभर दौरे करणे इतपत मर्यादित नसते. जिल्हा नियोजन समितीच्या अध्यक्षपदासोबत विकासकामांच्या नियोजनाचे, अंमलबजावणीचे, देखरेखीचे आणि प्रगतीचा नियमित आढावा घेण्याचे गंभीर दायित्व जोडलेले आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक नगरपालिका, तालुका, गावाला निधीवाटपात समान न्याय दिला पाहिजे, अशी भुमिका खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मांडली आहे.



खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी याबाबत एक प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे. इस्लामपूर ग्रामपंचायतीने सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समिती निधी वाटपाच्या पद्धतीविरोधात उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ कोल्हापूर येथे याचिका दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या पत्राचा संदर्भ जोडला आहे. पत्रामध्ये जिल्हा नियोजन समितीमार्फत विकासकामांच्या वाटपासाठी कोणतेही स्पष्ट, लिखित आणि सार्वजनिक धोरण अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून संपूर्ण जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. विकासकामांचे वाटप कोणत्या निकषांवर होते, कोणत्या गावाला किंवा मतदारसंघाला किती प्राधान्य दिले जाते आणि त्यामागील धोरण काय आहे, याबाबत जनतेला आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना माहिती असणे आवश्यक आहे. सार्वजनिक निधीचा वापर पारदर्शक पद्धतीने होणे ही लोकशाही व्यवस्थेची मूलभूत अपेक्षा आहे, असे खासदार मोहिते-पाटील यांनी म्हटले आहे.

मी जिल्हा नियोजन समितीचा विशेष निमंत्रित सदस्य म्हणून अनेक ग्राम पंचायती, नगरपंचायती, नगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला आहे. अनेक ठिकाणी विकासकामांसाठी प्रस्ताव दिले गेले, अनेक कामांना शिफारशी मिळाल्या, काही कामे जिल्हा परिषद किंवा इतर अंमलबजावणी यंत्रणांकडे पाठविण्यात आली; मात्र त्या कामांचे पुढे काय झाले याची माहिती संबंधित संस्थांना मिळत नाही. काम कोणत्या टप्प्यावर आहे, प्रशासकीय मान्यता मिळाली आहे का, तांत्रिक मान्यता प्रलंबित आहे का, निविदा प्रक्रिया सुरू आहे का अथवा कार्यादेश देण्यात आला आहे का, याबाबत कोणतीही प्रभावी सार्वजनिक माहिती प्रणाली अस्तित्वात नाही. ही परिस्थिती केवळ प्रशासकीय त्रुटी नसून लोकशाही उत्तरदायित्वाच्या तत्त्वालाच बाधा आणणारी आहे.

# यत्नाळ येथील वाचनालयचे अनुदान थांबविण्यात आले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील यत्नाळ येथील व्यंकय्या गुत्तेदार सार्वजनिक वाचनालयसंदर्भात श्रीशैल सिद्रामय्या स्वामी व राधाकृष्ण गेनसिध्द बंडगर यांनी धर्मादाय आयुक्त कार्यालयकडे परस्परविरोधी दोन बदल अर्ज दाखल केले आहेत. या दोन्ही अर्जातील तक्रारींचा विचार करता याचा निकाल राखून ठेवण्यात आला असून अनुदानही थांबविण्यात आले आहे, असे जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे यांनी एका पत्रकान्वये कळविले आहे.

सदर ग्रंथालय महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम, १९७० मधील निकषानुसार दर्जा/वर्ग प्रमाणे कार्यरत असल्याचे आढळून आलेले आहे. ग्रामपंचायत, शाळा, पोलिस पाटील, ग्राम महसूल अधिकारी यांनी ग्रंथालय सेवा देत असून गावाला त्याचा लाभ मिळत असल्याचे पत्र या कार्यालयास दिलेले आहे.

परस्पर विरोधी गटामध्ये गावपातळीवर व इतर कारणामुळे वाद असल्याने ग्रंथालयाचे अनुदान वितरित करु नये म्हणून एका गटाकडून वारंवार तक्रारी करणे, उपोषण करणे, कार्यालयावरही सतत खोटेनाटे आरोप करुन वेठीस धरले जाते. याप्रकरणी धर्मादाय कार्यालयाकडे तात्काळ निर्णय देण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. तोपर्यंत सदर ग्रंथालयाचे अनुदान थांबविण्यात आलेले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.




स्व.प्रा.बी.ए.चौगुले स्मृती पुरस्कार सोलापूरच्या जोहडकार लेखिका सुरेखा चंद्रगुप्त शहा यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी नीलम माणगावे, अरुणा चौगुले, डॉ.रावसाहेब पाटील, प्राचार्य संतोष कोटी, प्रा.डॉ.महावीर शास्त्री, डॉ. सरिता कोठाडिया संदीप चौगुले, सुनील गांधी निशा गांधी, पल्लवी मेहता आदी.



# ‘उत्तम करिअर’साठी ज्ञानासह कौशल्ये महत्वाची

## देऋब्रा तर्फे ११० विद्यार्थ्यांना सव्वा लाख रूपयांच्या अर्थसहाय्यासह शैक्षणिक साहित्याचे वाटप

### एल.जी. काकडे एज्युकेशनल फाऊंडेशनचे सहकार्य


यावेळी अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या सहा गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रत्येकी अडीच हजार रूपयांची काकडे व ठोंबरे शिष्यवृत्ती देऊन विशेष सन्मान करण्यात आला. तसेच दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना फोल्डर फाईल्ससह रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जून -**
सोलापूर, (प्रतिनिधी) : विद्यार्थ्यांनी उत्तम करिअर साठी ज्ञान, कौशल्य, चांगली वृत्ती, कठोर परिश्रम व निर्णय क्षमता या पंचसूत्रीचा अवलंब करावा असे आवाहन सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक महादेव न्हावकर यांनी येथील देऋब्रा संस्थेच्या कार्यक्रमात केले.

सोलापूर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था व कै. एल.जी. काकडे एज्युकेशनल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता पहिली ते उच्च पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या गरीब व होतकरू अशा ११० विद्यार्थ्यांना सुमारे १ लाख २५ हजार रूपयांच्या अर्थसहाय्याचे तसेच शैक्षणिक साहित्याचे वितरण प्रमुख पाहुणे श्री. न्हावकर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षपदी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगांवकर होते. यावेळी दहावी व बारावीतील गुणवंतांचा विशेष सन्मान करण्यात आला.

येथील दत्त चौकातील संस्थेच्या समर्थ सभागृहात रविवारी दि. १४ जून रोजी हा कार्यक्रम झाला. प्रमुख अतिथी श्री. न्हावकर यांच्या हस्ते श्रीसंत समर्थ रामदास स्वामींच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी अध्यक्ष डॉ. येळेगावकर, उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, दत्तात्रय आराध्ये, कार्यवाह श्याम जोशी, खजिनदार सतीश पाटील, महिलाध्यक्षा हेमा चिंचोळकर, युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, क्षितीजा गाताडे, प्रा. शुभदा देशपांडे, स्मिता देशपांडे, मंगेश महाजन यांच्यासह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी श्री. न्हावकर यांनी विद्यार्थ्यांना करिअरबाबत जागृत राहून योग्य त्या शिक्षणप्रवाहाचा अवलंब करण्याचे तसेच शिक्षणाद्वारे स्वतःसह कुटूंब व समाजाला भूषणावह काम करण्याचे आवाहन केले. उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये यांनी प्रास्ताविक केले. युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी यांनी यादीवाचन केले. कार्यवाह श्याम जोशी यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.

# ‘आपुलकीने वागल्यास रुग्ण आनंदित होतो’



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**
रुग्णांना औषधोपचार करण्याबरोबरच आपुलकीचे वागल्यास रुग्ण आनंदित होतो. त्याच्या मनातील आरोग्यविषयक भीती दूर होते, असे प्रतिपादन हाजी अब्दुल जब्बार नल्लामंदू यांनी केले. डॉ.मारिया अबुबकर नत्लामंदू यांच्या हुमा क्लिनिकच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी हाफीज अहमद कुरेशी यांनी कुराण पठण केले. प्रा.अबुबकर नल्लामंदू यांनी उपस्थितांचे स्वागत केले. असरार अहमद यांनी सूत्रसंचालन केले. कुद्दूस नल्लामंदू यांनी मानले

यावेळी डॉ.उस्मान, डॉ.आस्मा बिजापूरे, डॉ.इक्बाल तांबोळी, डॉ. शकील शेख, डॉ.शफी चोबदार, यासीन बेलीफ, मुसेब एजाज सय्यद जुबेर नल्लामंदू, उमर नल्लामंदू, सादिक हकीम, करीम रचभरे, मजहर अल्लोळी, इब्राहिम तडकल, जावीद चाँदा, हाजी शमीम, तजम्मुल चांदा, हाजी शकील, रजाक नल्लामंदू, डॉ.रफीक खान, जुबेर हिप्परगी, मसूद पटेल, रईस नल्लामंदू, डॉ.कदीर बिजापूरे, अशफाक शेख, फारूक शेख, सज्जाद हकीम, सिराज नल्लामंदू, वसीम शेख, मुर्तजा बुकवाले उपस्थित होते.

# दहावी, बारावीच्या फेरपरीक्षांना आजपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जून-**
इयत्ता दहावी, बारावीच्या फेरपरीक्षांना मंगळवार, १६ जून २०२६ पासून प्रारंभ होणार आहे. इयत्ता बारावीची फेरपरीक्षा दि.१६ जून ते ०८ जुलै २०२६ तर इयत्ता दहावीची फेरपरीक्षा दि. १६ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत आयोजित केली आहे, असे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून सांगण्यात आले.



कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हयातील दक्षता समितीची सभा घेण्यात आली. या दोन्ही परीक्षांच्या अनुषंगाने केंद्र, भरारी पथकही नेमण्यात आले आहे. इयत्ता १२ वीसाठी जिल्हयात ४२१६ विद्यार्थी तर इयत्ता १० वीसाठी २०९६ विद्यार्थी प्रविष्ठ होत आहेत, असेही सांगण्यात आले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## धाराशिवमध्ये महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठन हिसकावले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

धाराशिव शहरातील सांजा रोड परिसरात दुचाकीवरून जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठन हिसकावून नेल्याची घटना घडली आहे.


छाया सुनिल शेरखाने (वय ४४, रा. बापू शेखखाने गल्ली, सांजा रोड, धाराशिव) या १३ जून रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास एमएच-२५ एव्हाय-०५४४ क्रमांकाच्या मोटारसायकलवरून जात असताना, आर्यन फंक्शन हॉलसमोरील रस्त्यावर अज्ञात दोन इसमांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे काळ्या मण्यांचे गंठन हिसकावून पळ काढला.



यावप्रकरणी छाया शेरखाने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०४(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



## मृगही कोरडाच... पावसाअभावी तुळजापूर तालुक्यात खरीप पेरणी खोळंबली; शेतकरी चिंतेत



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ जून -**

तुळजापूर तालुक्यात यंदा पावसाने मोठी दडी मारल्याने खरीप हंगामाच्या पेरण्या लांबणीवर पडल्या आहेत. रोहिणीनंतर मृग नक्षत्रातही समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. बी-बियाणे व खतांची खरेदी करूनही पावसाअभावी शेतकरी पेरणी करू शकत नसल्याने आर्थिक आणि मानसिक ताण वाढला आहे.

हवामान विभागाने यंदाच्या मान्सूनवर 'अल निनो'चे सावट असल्याचे संकेत दिले आहेत. त्याचा परिणाम म्हणून पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

मृग नक्षत्र संपत आले तरी अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. मात्र आकाश निरभ्र राहून कडक ऊन आणि उष्ण वारे सुरू असल्याचे चित्र आहे.

शेतकऱ्यांनी ऐनवेळी बियाणे व खतांचा तुटवडा होऊ नये म्हणून आधीच खरेदी केली आहे. मात्र पावसाने पाठ फिरवल्याने खरीप पेरण्या रखडल्या आहेत. कृषी विभागाने १०० मिमी पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये, असा सल्ला दिला आहे.

त्यामुळे शेतकरी पावसाची प्रतीक्षा करत आहेत.

गेल्या वर्षी मृग नक्षत्रातच मोठ्या प्रमाणात खरीप पेरण्या पूर्ण झाल्या होत्या.

यंदा मात्र बियाणे व खतांच्या वाढलेल्या किमतींमुळे आधीच आर्थिक फटका बसलेल्या शेतकऱ्यांसमोर नवीन संकट उभे ठाकले आहे. वेळेवर पेरणी होईल की नाही, याबाबत अनिश्चितता असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

तळपत्या उन्हात शेतातील मशागतीची सर्व कामे पूर्ण करून शेतकरी पेरणीसाठी सज्ज आहेत. मात्र पावसाच्या प्रतीक्षेत त्यांना हातावर हात धरून बसावे लागत आहे.

येत्या काही दिवसांत चांगला पाऊस न झाल्यास खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात असून तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### आ. स्वामी यांच्या हस्ते रामपूर शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

**उमरगा, १५ जून -**


नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामपूर येथे इयत्ता पहिलीतील नवागत विद्यार्थ्यांचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते उत्साहात स्वागत करण्यात आले. शाळेच्या परिसराची आकर्षक सजावट करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट व सॉक्सचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हणमंत दासमे, उपसरपंच अनंत भोसले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक महादेव शिंदे यांनी प्रास्ताविक केले. आमदार प्रवीण स्वामी यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देत नियमित शिक्षण, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



### डॉ. शालिनी कुरकुलेंचा सत्कार

**लोहारा, १५ जून -**

लोहारा येथील डॉ. शालिनी सारीका राजकुमार कुरकुले यांनी एमबीबीएस पदवी यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल हाजी शब्बीर अहमद अन्सारी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. गरीब कुटुंबातील शालिनी यांनी कठोर परिश्रमातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून आई-वडील व लोहारा शहराचे नाव उज्वल केल्याबद्दल हा गौरव करण्यात आला. त्यांचे वडील राजकुमार कुरकुले हे पुणे येथे पीएमटीमध्ये कंडक्टर म्हणून कार्यरत आहेत. यावेळी संस्थेचे अध्यक्ष महेबूब फकीर यांच्यासह विनोद कुरकुले, युसुफ कुरेशी, सादिक फकीर, जाकेर कुरेशी, जिंदाशा फकीर, रमेश रेणके, अन्वर कुरेशी आदी उपस्थित होते.



### लांजेश्वर येथे प्रवेशोत्सव उत्साहात; प्रभात फेरीने दिला शिक्षणाचा संदेश

**भूम, १५ जून -**

भूम तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लांजेश्वर येथे शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. प्रवेशोत्सवानिमित्त शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक व ग्रामस्थांच्या सहभागातून संपूर्ण गावात भव्य प्रभात फेरी काढण्यात आली. आपली मुले शाळेत पाठवा आणि शिक्षण हा प्रत्येक मुलाचा हक्क आहे अशा घोषणांमधून शिक्षणाचा संदेश देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सरपंच, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका, शिक्षक, कर्मचारी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा प्रवेशोत्सव खऱ्या अर्थाने 'गावाचा उत्सव' ठरला असून विद्यार्थ्यांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## कानेगाव येथे किरकोळ कारणावरून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

लोहारा तालुक्यातील कानेगाव येथे किरकोळ कारणावरून एका व्यक्तीस शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सतीश रमेश भिसे (वय ३८, रा. कानेगाव, ता. लोहारा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १४ जून रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास मुलांना घरी ठेवण्याबाबत आईशी बोलल्याच्या कारणावरून निलेश मधुकर कांबळे, दैवशाली मधुकर कांबळे (दोघे रा. बामणीवाडी) व अनिकेत श्रीमंत कांबळे (रा. कानेगाव) यांनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी तसेच सत्तूरने मारहाण करून गंभीर जखमी केले.

या प्रकरणी अधिकचा तपास पोलिस करीत आहेत.

## कळंबच्या मराठवाडा दूध डेरीवर अन्न व औषध प्रशासनाचा छापा

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१५ जून -**

ग्राहकाकडून प्राप्त झालेल्या गंभीर तक्रारीची दखल घेत धाराशिव जिल्हा अन्न व औषध प्रशासनाने कळंब येथील प्रसिद्ध मराठवाडा दूध डेरीवर रविवारी (दि. १४ जून) धडक कारवाई करत छापा टाकला.

या कारवाईदरम्यान डेरीमधील दूध तसेच दुग्धजन्य पदार्थांपैकी दही आणि आईस्क्रीमचे नमुने घेण्यात आले.

संबंधित नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. यापूर्वीही जिल्ह्यातील एका खवा व्यावसायिकावर कारवाई करून खव्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यानंतरची ही धाराशिव जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासनाची दुसरी मोठी कारवाई मानली जात आहे.



दूध, दही व आईस्क्रीमचे नमुने तपासणीसाठी पाठवले

दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात कठोर मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्याअंतर्गत विविध ठिकाणी छापे, नमुना संकलन आणि तपासणीच्या कारवाया वेगाने सुरू असून भेसळ करणाऱ्यांमध्ये प्रशासनाच्या धडक कारवाईमुळे खळबळ उडाली आहे.

अन्नपदार्थांची गुणवत्ता व ग्राहकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू राहणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात येत आहेत.

## कत्तलीसाठी नेण्यात येणारे २८ गोवंशीय जनावरे व चार वाहने जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

नळदुर्ग पोलिसांनी गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई करत २८ जनावरे आणि चार मालवाहू वाहने जप्त केली आहेत. या प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजता तुळजापूर-नळदुर्ग मार्गावरील चिवरी पाटी येथे तपासणीदरम्यान ही कारवाई करण्यात आली. आरोपींनी विविध मालवाहू वाहनांमध्ये गोवंशीय जनावरे कोंबून, त्यांच्यासाठी चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता निर्दयतेने वाहतूक केल्याचे आढळून आले. या कारवाईत महादेव इंद्रजीत कांबळे (रा.



भंडारी), विशाल विकास बनसोडे (रा. वडगाव देव), महादेव गोविंद धाकतोडे (रा. सारोळा) आणि लखन हनुमंत मोटे (रा. काक्रंबा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी जप्त केलेल्या वाहनांमधून ४ जर्सी गायी, ५ रेडे, १ वगार, ८ कालवडी आणि १० खोंडे अशी एकूण २८ गोवंशीय जनावरे आढळून आली. जनावरे आणि चार मालवाहू वाहनांसह सुमारे ६ लाख ४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## 'जलतारा' योजनेला इटकळमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद; तीन दिवसांत १५० पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१५ जून -**

महसूल विभागाच्या पुढाकारातून राबविण्यात येत असलेल्या 'जलतारा' या महत्त्वाकांक्षी योजनेला तुळजापूर तालुक्यातील मौजे इटकळ येथे शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विहीर व बोअरवेल पुनर्भरणासाठी सुमारे दीडशेहून अधिक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात खड्डे खोदून घेतले असून, 'पाणी आडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला गावकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.

या योजनेअंतर्गत पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजलपातळी वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. गावात व्यापक जनजागृती व प्रसिद्धी केल्यामुळे शेतकऱ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळंगे आणि गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदिवे यांच्या मार्गदर्शनाखाली ११ ते १३ जून या कालावधीत दोन जेसीबी मशिनच्या सहाय्याने इच्छुक शेतकऱ्यांच्या शेतात विहीर व बोअरवेलजवळ पुनर्भरण खड्डे घेण्यात आले. अवघ्या तीन दिवसांत सुमारे १५० खड्ड्यांचे काम पूर्ण करण्यात आले. विशेष म्हणजे, उपक्रमाच्या शेवटच्या दोन दिवसांत शेतकऱ्यांचा प्रतिसाद अधिक वाढल्याने जलतारा योजना गावात यशस्वीपणे रुजत असल्याचे चित्र दिसून आले.

मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ग्राम महसूल अधिकारी जी.के. तोडकरी, लक्ष्मण पाटील, ग्रा.पं. अधिकारी नितीन कांबळे, मंडळ अधिकारी डी. पी. गायकवाड, सरपंच क्षिरसागर, विनोद सलगरे यांच्यासह श्रीकृष्ण मुळे, राहुल बागडे, दयानंद गायकवाड, केशव गायकवाड, शिवानंद हांडगे, हसन पठाण यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना प्रोत्साहित केले.

## शाळा एकत्रीकरणाच्या निर्णयाविरोधात मंगरूळमध्ये पहिल्याच दिवशी शाळेला टाळे

### मुख्याध्यापकांच्या विनंतीवरून आंदोलनाला स्थगिती...

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१५ जून -**

राज्य शासनाने शाळा एकत्रीकरणाबाबत घेतलेल्या निर्णयाच्या निषेधार्थ तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथे ग्रामस्थांनी शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी, सोमवार (दि. १५ जून) रोजी जिल्हा परिषद प्रशालेला टाळे ठोकून आंदोलन केले.

राज्य शासनाने एकाच कॅम्पसमध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळा, मुलींची शाळा तसेच प्रशाला यांचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागेल, शिक्षकांची संख्या कमी होईल तसेच शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांवरही परिणाम होईल, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे.या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी करणारे निवेदन मंगरुळ ग्रामस्थांनी दि. १२ जून रोजी धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले होते. निवेदनाची दखल न घेतल्यास शाळेला टाळे ठोकून आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता. त्या अनुषंगाने सोमवारी ग्रामस्थांनी शाळेला टाळे ठोकले. मात्र, शैक्षणिक वर्षाचा पहिलाच दिवस असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी तिन्ही शाळांच्या मुख्याध्यापकांनी ग्रामस्थांना आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले. त्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित केले.

तथापि, शासनाने शाळा एकत्रीकरणाच्या निर्णयाचा फेरविचार न केल्यास धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद कार्यालयाच्या प्रांगणात शाळा भरवून आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या आंदोलनात गावातील प्रतिष्ठित नागरिक, तिन्ही शाळा व्यवस्थापन समित्यांचे अध्यक्ष, माता-पालक आणि ग्रामस्थ सहभागी झाले होते.

## खामसवाडी जि.प. शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१५ जून -**

कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त नवागत विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वाराची रांगोळी व पुष्पहारांनी सजावट करण्यात आली होती.

जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती विश्वास कोकणे, पंचायत समिती सदस्या सुवर्णा पाटील, सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व गोड पदार्थ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी मानवी कमान करून नवागतांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक, पत्रकार व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक रामचंद्र पवार यांनी प्रास्ताविक केले. ज्ञानोबा काळे यांनी सूत्रसंचालन तर तुकाराम सुरवसे यांनी आभार प्रदर्शन केले. स्वागत सोहळ्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## दोन आरोपींकडून ४ गावठी पिस्तुले व जिवंत काडतुसे जप्त

### धाराशिव एलसीबीची धडक कारवाई...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई करत दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून ४ गावठी पिस्तुले, ३ जिवंत काडतुसे आणि मोटारसायकलसह एकूण २ लाख ९४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.




दि. १३ जून २०२६ रोजी पोलीस अधीक्षक रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार अवैध शस्त्रधारकांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत होती. पेट्रोलिंगदरम्यान स्थागुशा पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, बालाजी बबन काळे व आश्रु उर्फ भुऱ्या भिमा काळे हे मोटारसायकल (एमएच-२५ एयू-९४३३) वरून धाराशिवहून बेंबळीकडे जात असून त्यांच्याकडे गावठी पिस्तुले आहेत. माहितीच्या आधारे पथकाने साळुंखे नगर कमानीजवळ सापळा रचला.

रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास संशयित मोटारसायकलस्वार दिसताच पोलिसांनी त्यांना अडवून चौकशी केली. पंचासमक्ष घेतलेल्या झडतीत आरोपींकडून ४ लोखंडी गावठी पिस्तुले व ३ जिवंत काडतुसे आढळून आली. तसेच त्यांची मोटारसायकलही जप्त करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे बालाजी बबन काळे (रा. कल्याणनगर, भूम, सध्या गोलेगाव पारधी पेडी) व आश्रु उर्फ भुऱ्या भिमा काळे (रा. जांब, ता. भूम) अशी आहेत.

या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात अवैधरित्या शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना पुढील तपासासाठी पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोनि. विनोद इज्जपवार, सपोनि. अमोल मोरे, पोलीस हवालदार समाधान वाघमारे, राहुल नाईकवाडी, बळीराम शिंदे, महिला पोलीस हवालदार शोभा बांगर, पोलीस नाईक अशोक ढगारे तसेच दहीहांडे, शेरखाने आणि मुंगळे यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

## कनगरा येथे अवैध मद्यसाठा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

कनगरा येथील एका व्यक्तीकडून अवैध विक्रीसाठी साठवून ठेवलेल्या देशी-विदेशी मद्याच्या ४८ सिलबंद बाटल्या पोलिसांनी जप्त केल्या. या मद्यसाठ्याची किंमत सुमारे ३ हजार ८४० रुपये असल्याचे सांगण्यात आले.

१४ जून रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास कनगरा ते कनगरा पाटी रस्त्यालगत घरासमोरील ओट्यावर हा मद्यसाठा अवैधरित्या विक्रीच्या उद्देशाने ठेवलेला असल्याचे आढळून आले. यावप्रकरणी पोलिसांनी मद्यसाठा जप्त करून संबंधित गुन्हा दाखल केला आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### जिजाबाई मरपडवाड यांचे निधन



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १५ जून : जिजाबाई नरहरी मरपडवाड वय ७५ वर्ष यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर मुळगाव कांदलगाव ता. पालम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्र्चात तीन मुले सुना नातवंडे असा परिवार आहे. त्या धनेगाव येथे श्री महादेव विद्यालयातील शिक्षक गोरखनाथ मरपडवाड यांच्या आई होत.

### होमगार्डच्या मागण्यांसाठी उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : होमगार्डना ३६५ दिवस काम देण्यात यावे, होमगार्डना दर महिन्याच्या २ तारखेला मानधन देण्यात यावे, होमगार्डची ३ वर्षांनी होणारी पुर्ननियुक्ती कायम बंद करावी, होमगार्डची वयोमर्यादा ५८ वरुन ६० वर्षे करण्यात यावी, होमगार्डना सेवानिवृत्ती झाल्यानंतर पेन्शन एक रकमी रक्कम २५ लाख कौटूंबिक उदरनिर्वाह करण्यासाठी देण्यात यावी, होमगार्डना दिवाळीला बोनस देण्यात यावा, अश्या मागण्या शिवसेनेचे अहमदपूर तालुकाप्रमुख गोपीनाथ जायभाये यांनी निवेदनाद्वारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केल्या आहेत.

### निवाडा येथे खेत बचाव अभियानास प्रारंभ
#### एल निनोच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. १५ जून : यावर्षी निर्माण झालेल्या एल नीनो परिस्थितीमुळे संभाव्य दुष्काळ व कमी पावसाचा धोका लक्षात घेऊन शेतकऱ्यांचे पीक वाचविण्यासाठी कृषी विभाग, आत्मा व कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे निवाडा (ता. रेणापूर) येथे 'खेत बचाव अभियान' तसेच खरीप हंगाम पूर्वतयारी बैठक आयोजित करण्यात आली.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी सांगितले की, पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी, बीज प्रक्रिया तसेच बीबीएफ पद्धतीवर पेरणी करणे आवश्यक आहे. तसेच माती परीक्षण अहवालानुसार खतांचा संतुलित वापर करावा व खतांचा अतिवापर टाळावा, असे आवाहन त्यांनी केले.

एल नीनोमुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर, ठिबक व तुषार सिंचनाचा शेतकऱ्यांसाठी प्रात्यक्षिक व मार्गदर्शन बैठकीत बीज प्रक्रिया व बियाणे उगवण क्षमता तपासणीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तसेच जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी मल्चिंग (आच्छादन) तंत्रज्ञानाचा वापर आणि सेंद्रिय खतांचा वापर वाढवून जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढविण्याबाबत माहिती देण्यात आली.

अवलंब आणि ओलावा संवर्धनावर भर देण्यात आला. शेतकऱ्यांनी कमी पाण्यात व कमी कालावधीत येणारी पिके व वाणांची निवड करून आर्थिक नुकसान टाळावे, असेही यावेळी सांगण्यात आले.

मांजरा कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शाखज्ञ डॉ. संदीप देशमुख यांनी खरीप हंगामात उद्भवू शकणाऱ्या कीड व रोग व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. योग्य पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी व कमी पावसावर घाईघाईने पेरणी टाळावी, असे आवाहनही करण्यात आले.

या कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी वैभव चव्हाण, सहाय्यक कृषी अधिकारी राजश्री कांबळे, एम. एम. माळी तसेच परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शेतकऱ्यांच्या शंका निरसनासाठी प्रश्नोत्तर सत्र घेण्यात आले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राजश्री कांबळे यांनी केले.

# खते आणि बियाणे स्वस्त : मालाला योग्य भाव हिच शेतकऱ्यांची अपेक्षा



तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे

लातूर दि. १५ जून : कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करण्यासाठी राज्यातील१३ हजार२७५ क्षेत्रीय कृषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक लॅपटॉप उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकार तर्फे घेण्यात आला असून लॅपटॉपवर सुमारे१०९ कोटी रूपयांच्या निधी ला मंजुरी दिली आहे . लॅपटॉप चा पुरवठा जुलै अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून ऑगस्ट२०२६ च्या पहिल्या आठवड्यात संबंधित अधिकारी आणि कर्मचार्यांपर्यत पोहोचले जातील .

पुरणरारांकडून प्राप्त होणाऱ्या प्रत्येक लॅपटॉप ली पारदर्शकता आणि दर्जा राखण्यासाठी१०० टक्के गुणवत्ता तपासणी केली जाणार आहे . ही तपासणी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे या स्वतंत्र त्रयस्थ संस्थेमार्फत करणार असल्याचे कृषी मंत्र्यांनी प्रसार माध्य्याशी बोलताना सांगितले .

सध्या महाडीबीटी पोर्टल, पी एम किसान योजना, पीक कापणी प्रयोग, पीक पेरणी नोंदी, नामाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, महाकृषि यासारख्या डिटीटल प्रणालींवर क्षेत्रीय स्तरावर माहिती ऑनलाईन अध्ययावत करावी लागते . या साठी कर्मचाऱ्यांना संगणकावर अवलंबून रहावे लागते . माहिती भरण्यासाठी तालुका किंवा मंडळ कार्यालयात चकरा माराव्या लागत असल्यामुळे कामकाजावर परिणाम होत असे या पार्श्र्वभूमीवर महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटना आणि कृषी पर्यवेक्षक संघटना लॅपटॉपची मागणी करत होत्या .

ही खरेदी प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी शासकीय ई - मार्केट प्लेस पोर्टलवर निविदा प्रक्रिया राब्दून पुरवठा आदेश देण्यात आले आहेत . याचे तांत्रिक निकष इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धीमत्ता आपुळतालयाकडून निश्र्चीत करण्यात आले असून या निर्णयांतर्गत राज्यातील१० हजार६२० सहायक कृषी अधिकारी, ८८५ मंडळ कृषी अधिकारी यांना लॅपटॉपचे वितरण केले जाईल . यापूर्वीही१२ हजार३७३ सिमकार्ड आणि एप्रिल२०२६ मध्ये तालुकास्तरांवर४४ नवीन संगणक उपलब्ध करण्यात आले होते .

लॅपटॉप मुळे क्षेत्रीय पातळी वर माहिती संकलन, तपासण्या आणि अहवाल सादरीकरणात अचूकता आणि कामात वेग येईल असेही कृषिमंत्री म्हणाले .

हे सर्व ठिक आहे पण यापूर्वीही१२ हजार३७३ सिमकार्ड आणि४४ नवीन संगणक यावर केलेला खर्च वायाच गेला की . कारण आता नवीन लॅपटॉप आल्यामुळे सिमकार्ड आणि संगणकाचा वापर कोण करणार ? आणि लॅपटॉप साठी नेटचा वेगळा खर्च लागेल .

मुळात एक प्रश्र्न पडतो की, आहे त्या सुविधे सह काम केले तरी चालतेच ना ? आणि ही सुविधा मिळूनही कर्मचारी काम किती प्रामाणिक करणार हे ही बघावे लागेल . या सुविधा आल्या म्हणजे शेतकऱ्यांचा किती फायदा होतो हे काळचं सांगेल .

शेतकऱ्यांच्या साठी एकादी पेन्शन सुविधा करणे फायद्याचे ठरले असते कदाचित . कारण जेव्हा शेतकऱ्याकडे माल असतो तेव्हा भाव नसतो आणि माल नसतो तेव्हा भाव वाढलेला असतो . या प्रकरणात दलाल मोठे होत असल्याचे चित्र आहे . तसेच आतातर खते आणि बियाणे कमालीची वाढली असून शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे .

त्यामुळे शेतकऱ्यांच्या साठी काय करावे असे वाटत असेल तर खते आणि बि बियाणे यांच्या किमती कमी कराव्या आणि त्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा .

## बालकांच्या किलबिलाट यशवंत विद्यालय प्रवेशोत्सव उत्साहात



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १५ जून : टागोर शिक्षण संस्थेच्या श्री डी. बी. लोहारे गुरुजी यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

नव्या शैक्षणिक प्रवासाला सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व पेन देऊन स्वागत करण्यात आले.

प्रवेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शाळेची ओळख करून देत त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रेरित करण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थी व पालकांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक शिवाजी सुर्यवंशी, परीक्षा विभाग प्रमुख सुनील धनुरे,क्रीडा प्रमुख संतोष कदम,सांस्कृतिक प्रमुख राजकुमार पाटील, मुख्य लिपिक जयप्रकाश माने,लिपिक सचिन खानापूरे आदी मान्यवरांच्या हस्ते नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तक गुलाब पुष्प व पेन देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी क्रीडा क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी जान्हवी जाधव,रोहीणी पाटील,स्मिता गुट्टे,भक्ती बिरादार सत्कार करण्यात आले.

## आ.अंबादास दानवे यांनी केली बालाजी रेड्डी यांची विचारपूस



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १५ जून : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते तथा आमदार अंबादास दानवे यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांची अहमदपूर येथे भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली.

शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांच्या गुडघ्यावर नुकतीच पुणे शहरातील संचेती हॉस्पिटल येथे शस्त्रक्रिया झाली. लातुर येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या आढावा बैठकीसाठी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे लातुरात आले होते. लातूर ते नांदेड प्रवासा दरम्यान त्यांनी सदर भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली, शिवसैनिक दोन दोन महिने निवांत आराम करु शकत नाही, तरीही काळजी करू नका लवकर बरे व्हा, काळजी घ्या, असे जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांना सांगितले.

यावेळी त्यांच्या सोबत मराठवाडा पदवीधर समन्वयक दिलीप घुगे, जिल्हा परिषद सदस्य बजरंग जाधव, उपजिल्हा प्रमुख बालाजी जाधव, भारत सांगवीकर, महानगर प्रमुख विष्णूपंत साठे, युवासेना जिल्हाप्रमुख लक्ष्मण पेटकर, दिनेश जावळे, तालुका प्रमुख अविनाश रेशमे, तालुका प्रमुख दत्ता हेंगणे, तालुका संघटक अनिकेत फुलारी, शहर प्रमुख शिवा कासले, नगरसेवक तथा क्रीडा व सांस्कृतिक मंडळ सभापती प्रतिक रेड्डी, गणेश हालसे,उपतालुका प्रमुख पवन देऊळकर, बाळासाहेब पडीले, बालाजी काळे,गणेश राठोड, तुकाराम लोकरे, माऊली देवकत्ते, सुभाष गुंडीले यांच्यासह शिवसैनिकांची उपस्थिती होती.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा
## सन्मानचिन्ह,रोख रक्कम देऊन विद्यार्थ्यांना सन्मानित



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १५ जून : चाकूर शहरातील जगत् जागृती विद्यामंदिर येथील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहेत.त्या गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेच्या आणि विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये विद्यालयातील न्हावी रुद्र सतीश ९९.८० टक्के गुण घेत शहरातून प्रथम येण्याचा मान मिळवल्याबद्दल संस्था सचिव नरेश पाटील चाकूरकर यांच्या वतीने स्वर्गीय राजेश्र्वराव पाटील चाकूरकर यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम अकरा हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि शाल ,श्रीफळ व पुष्पहार देऊन या विद्यार्थ्याचा गौरव करण्यात आला. त्याचबरोबर श्रद्धेय इंदिराताई पाटील चाकूरकर यांच्या स्मरणार्थ एक हजार रुपये रोख रक्कम व सन्मान चिन्ह तसेच मुलांमधून सर्वप्रथम आल्याबद्दल युवा उद्योजक करण पाटील चाकूरकर व यश पाटील चाकूरकर यांच्यावतीने रोख रक्कम ५००० रुपये व सन्मान चिन्ह असे राजइंद्र अवार्ड ने सन्मानित करण्यात आले.

तसेच मन्मथ शेटे यांच्या वतीने कै. चनबसआप्पा शेटे यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम दोन हजार रुपये व स्मृतिचिन्ह आणि शाल पुष्पहार देऊन या विद्यार्थ्याला गौरविण्यात आले.स्वर्गीय हैद्राबादेसर यांच्या स्मरणार्थ सौ.पुष्पा अशोक मठपती यांच्या वतीने पंधराशे रुपये रोख देऊन या विद्यार्थ्याला सन्मानित करण्यात आले.मुली मधून सर्वप्रथम आलेल्या श्रेया अंगद साळुंकेने ९७.८० टक्के घेतल्याबद्दल या विद्यार्थिनीस युवा उद्योजक करण पाटील चाकूरकर व यश पाटील चाकूरकर यांच्या वतीने रोख रक्कम तीन हजार रुपये व सन्मान चिन्ह देऊन या विद्यार्थिनीचा सन्मान करण्यात आला. शहरातून सर्व द्वितीय आलेल्या विद्यालयातील चामले संकेत एकनाथ ९७.८० टक्के या विद्यार्थ्याला स्वर्गीय गंगाधर अप्पा शेटे यांच्या स्मरणार्थ शिवप्रसाद शेटे यांच्या वतीने रोख रक्कम एक हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच स्वर्गीय मारुती मद्रेवार यांच्या स्मरणार्थ अर्जुन मद्रेवार यांच्यावतीने रोख रक्कम एक हजार रुपये व सन्मान चिन्ह देऊन या विद्यार्थ्यांस गौरविण्यात आले.

विद्यालयातून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या संस्कार शिवकुमार घाळापुरे ९६.८० टक्के घेतल्याबद्दल या विद्यार्थ्यास स्वर्गीय संग्रामप्पा हाळे यांच्या स्मरणार्थ विकास हाळे यांच्या वतीने रोख रक्कम पाचशे रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.विद्यालयातील होतकरू विद्यार्थी रितेश बालाजी चेऊलवार याने ९०.८० टक्के घेतल्याबद्दल यास अर्जुन मद्रेवार यांच्या वतीने एक हजार रुपये आणि मन्मथ शेटे यांच्या वतीने पाचशे रुपयाचे रोख पारितोषिक देऊन या विद्यार्थ्यास गौरविण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये युवा उद्योजक यश पाटील चाकूरकर यांच्या वतीने राज इंद्र अवार्ड विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आला. याचे स्वरूप प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख रक्कम पाच हजार रुपये व स्मृतिचिन्ह तसेच द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यास तीन हजार रुपये स्मृतीचिन्ह तसेच प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनींना तिन हजार रुपये या स्वरूपामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले.तसेच विद्यालयातील अन्य गुणवंतामध्ये

कैलास मानवेंद्र स्वामी ९६.४० टक्के, रुद्र जनार्दन देवकते ९६ टक्के,सुशांत विजयकुमार चेऊलवार ९५.४५ टक्के,हर्षद रमेश डावकरे ९४.७० टक्के,हाळे दिव्यांका दिलीप ९४.५० टक्के,वेदिका बालाजी माने ९४.२० टक्के,अथर्व विष्णु शिंदे ९४.२० टक्के ,भक्ती वैजनाथ चव्हाण ९३.४५ टक्के,अक्षरा प्रदीप ऊस्तुर्गे ९५.४० टक्के,श्रावणी सदाशिव माने ९३.८० टक्के,अबुजर मुजम्मिल शेख९३.२० टक्के,विजयालक्ष्मी विवेकानंद पांचाळ ९२.६० टक्के,

प्रतीक्षा गोविंद बद्दे ९२.६० टक्के,अनुराग बाळासाहेब कुलकर्णी ९२.२० टक्के,श्याम महादेव शिंदे ९१.६० टक्के,तबस्सूम दस्तगीर शेख ९१.४० टक्के, फिजा शादुल शेख ९१.२० टक्के,नाजमीन गोरेपाशा कोतवाल ९०.८० टक्के,

ओमकार लक्ष्मण नरहरे ९०.८० टक्के, प्रिया शिवराज पांचाळ ९०.४० टक्के,सुदर्शन विजयकुमार होळदांडगे ९०.४० टक्के,प्रतीक चंद्रकांत जाधव ९०.२० टक्के, गायत्री महालिंग स्वामी ९०.४० टक्के सह सर्व विद्यार्थ्यांचा आणि त्यांचे माता - पालक व पिता पालक यांचाही याप्रसंगी यथोचित सत्कार करण्यात आला.

विद्यालयातून ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेणाऱ्या २८ विद्यार्थ्यांचा व त्यांच्या माता व पिता पालकांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला.विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल जगत् जागृती शिक्षण प्रसारक मंडळ चाकूरच्या वतीने आयोजित या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सर्वोत्तमराव कुलकर्णी हे होते तर प्रमुख पाहुणे तसेच मार्गदर्शक म्हणून संस्थेचे सचिव नरेश पाटील चाकूरकर हे होते.

प्रमुख पाहुणे उपाध्यक्ष अर्जुन मद्रेवार, सहसचिव बाबुराव बिडवे ,कोषाध्यक्ष धोंडीराम तोंडारे यांच्यासह युवा उद्योजक यश पाटील चाकूरकर, संस्थेचे सदस्य शिवप्रसाद शेटे , महादेव काळोजी, राजकुमार कदम, मन्मथ शेटे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय नारागुडे, पर्यवेक्षक प्रदीप उस्तुर्गे, आदी मान्यवर उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक तथा संस्थेचे सचिव नरेश पाटील चाकूरकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संजय नारागुडे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार कदम यांनी केले. आभार राजीव पिटलावार यांनी माणले.या कार्यक्रमास विद्यार्थी पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## काशिनाथ गायकवाड यांना कृषी विभागाकडून बियाणे व खतांचे वाटप



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १५ जून : देवणी तालुक्यातील बोंबळी येथील शेतकरी काशिनाथ गायकवाड यांना संकटातून सावरण्यासाठी शासनाकडून मदतीचा हात

बोंबळी (ता. देवणी) येथील शेतकरी काशिनाथ गायकवाड यांच्यावर काही दिवसांपूर्वी मोठे संकट कोसळले होते. वीज पडून त्यांच्या शेतीतील बैलाचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे शेतीची कामे ठप्प झाली असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला होता.

दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार पशुसंवर्धन विभागाच्या वतीने शेतकऱ्याला एक बैल उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र तो बैल शेतीच्या मशागतीसाठी उपयुक्त नसल्याची माहिती मिळाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी तात्काळ दखल घेत संबंधित यंत्रणेला सूचना केल्या. त्यानुसार आज शेतकऱ्याला शेतीच्या कामासाठी उपयुक्त असा दुसरा बैल उपलब्ध करून देण्यात आला.

याचबरोबर शेतकऱ्याला आगामी खरीप हंगामासाठी मदत म्हणून कृषी विभागाच्या वतीने सोयाबीन व तूर बियाणे तसेच खतांचे वाटप करण्यात आले. शासनाच्या विविध विभागांमार्फत मिळालेल्या या मदतीमुळे काशिनाथ गायकवाड यांना पुन्हा उभारी मिळाली असून शेतीची कामे सुरळीतपणे सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य रामलिंग शेरे तालुका कृषी अधिकारी कृष्णा मुंडे, उप कृषी अधिकारी बळीरामजी जाधव, सहाय्यक कृषी अधिकारी कांबळे पि. बी. सुधीर भोसले, माऊली भोसले, माऊली शिंदे, सिद्धलिंग अप्पा स्वामी, ज्ञानेश्र्वर सगर, रितेश भोसले, काशिनाथ गायकवाड, संजय पाटिल, व्यंकट कारभारी, तानाजी कारभारी, उत्तम गायकवाड, धनाजी येचे आदिसह नागरिक उपस्थित होते

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## परंड्याचे सुपुत्र प्रा.डॉ. राशीनकर यांचा जगातील टॉप ५ टक्के शास्त्रज्ञांमध्ये समावेश

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१५ जून -**

परंडा येथील सुपुत्र व शिवाजी विद्यापीठातील आघाडीचे संशोधक गजानन शंकरराव राशीनकर यांचा जगातील टॉप ५ टक्के शास्त्रज्ञांमध्ये समावेश झाल्याने परंडा शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. याबद्दल भाजप नेते व माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी दूरध्वनीद्वारे त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

प्रा. डॉ. राशीनकर यांनी स्तनाच्या कर्करोगावरील 'हायपरथर्मिया' आणि चुंबकीय नॅनो कणांच्या निर्मितीवर केलेल्या संशोधनाला भारतीय तसेच यूके पेटंट प्राप्त झाले आहे. त्यांच्या संशोधनामुळे कर्करोग उपचार क्षेत्रात नवी दिशा मिळाली असून नॅनो-मेडिसिन क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते.



पर्यावरणपूरक रासायनिक संयुगे, कर्करोगविरोधी संयुगे आणि जैविकदृष्ट्या सक्रिय रेणूंच्या संश्लेषणावरील संशोधनासाठीही त्यांची ओळख आहे. त्यांच्या या यशामुळे परंडा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून लवकरच त्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सुजितसिंह ठाकूर यांनी सांगितले.

# 'तुतारी'च्या निनादात नवागतांचे स्वागत; बैलगाडीतून मिरवणुकीने रंगला प्रवेशोत्सव



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ जून -**

तुळजापूर येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक ३ मध्ये शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांचे तुतारी व संबळाच्या निनादात औक्षण करून, गुलाबपुष्प देत बैलगाडीतून भव्य मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले.

प्रवेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे घेऊन त्यांना फुले व पेढे देण्यात आले. तसेच इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण करण्यात आले. शाळेचे पालक शशिकांत जोशी यांनी आपल्या कन्येने एमबीबीएस पदवी प्राप्त केल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ विद्यार्थ्यांसाठी दालचा व जिलेबीची मेजवानी दिली.

या कार्यक्रमास नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते अमोल कुतवळ, नगरसेविका मंजुषाताई देशमाने, भाजप जिल्हा कोषाध्यक्ष नागेश नाईक, जिल्हा परिषद सदस्या शीतल ढाले, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा किरण सुरवसे यांच्यासह बाळासाहेब हंगरगेकर, दुर्वास भोजने, सचिन ताकमोघे, सचिन ठेले, प्रसाद इंगळे, बाळासाहेब केसकर, प्रियांका नाईकवाडी, नितीन गायकवाड, अर्जुन भोजने आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या १६ विद्यार्थ्यांचा तसेच मार्गदर्शक शिक्षक जालिंदर राऊत, अनिल राठोड आणि रणजीत नाईकवाडे यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रेरणा दिली.

प्रवेशोत्सवाचे आणखी एक आकर्षण म्हणजे शाळेत उभारण्यात आलेला आकर्षक सेल्फी पॉईंट. विद्यार्थी आणि पालकांनी सेल्फी काढून या आनंदोत्सवाच्या आठवणी जपल्या. उत्साह, आनंद आणि विद्यार्थ्यांच्या स्वागताचा अनोखा संगम असलेल्या या प्रवेशोत्सवाने शाळा परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक तुकाराम मोटे, अशोक शेंडगे यांच्यासह सहशिक्षक निर्मला कुलकर्णी, सतीश यादव, जालिंदर राऊत, वैशाली गोमारे, शरद कोळगे, पुष्पा काळे,दिगंबर थेटे, दत्ताभाऊ मेढे, शिक्षणसेवक रणजीत नाईकवाडे, अनिल राठोड, अतुल काकडे, कल्पना व्हटकर, संदीप माने यांनी परिश्रम घेतले.

## तुळजापूर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह; तांत्रिक चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ जून -**



तुळजापूर शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या सुमारे ९.९९ कोटींच्या सीसीटीव्ही प्रकल्पाबाबत नव्याने प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकल्पासाठी सुमारे ६ कोटी निधी वितरित झाल्याची माहिती समोर आली आहे. एवढ्या मोठ्या खर्चाच्या प्रकल्पात बसविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये शंका निर्माण झाल्या आहेत.

बसविण्यात येणारे कॅमेरे STQC मान्यता प्राप्त आहेत का, त्यांचे थर्ड पार्टी निरीक्षण करण्यात आले आहे का, तसेच आवश्यक गुणवत्ता तपासणी करण्यात आली आहे का, याबाबत स्पष्ट माहिती सार्वजनिक करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

निकृष्ट दर्जाचे किंवा कमी क्षमतेचे कॅमेरे बसविण्यात आल्यास गुन्ह्यांच्या तपासासाठी आवश्यक असलेले स्पष्ट चित्रीकरण उपलब्ध होणार नाही. परिणामी, नागरिकांच्या सुरक्षेसाठी राबविण्यात येणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यात अपयशी ठरू शकतो आणि कोट्यवधी रुपयांचा खर्चही वाया जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते जयकुमार पांढरे यांनी संबंधित प्रकल्पाची तात्काळ तांत्रिक चौकशी करण्याची मागणी केली आहे. चौकशीत दोषी आढळणाऱ्या संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच तुळजापूर शहरात केवळ उच्च दर्जाचे, मान्यताप्राप्त आणि तांत्रिक निकषांची पूर्तता करणारे सीसीटीव्ही कॅमेरेच बसविण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## नगरपरिषद शाळा क्र. २ मध्ये प्रवेशोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ जून -**

तुळजापूर येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ मध्ये इयत्ता पहिलीतील नवागत विद्यार्थ्यांचे तुतारी व संबळाच्या निनादात स्वागत करत शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून पायांचे ठसे घेण्यात आले तसेच त्यांना पेढे व फुले देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. पालक मेळावाही आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमास नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते अमोल कुतवळ, भाजप जिल्हा कोषाध्यक्ष नागेश नाईक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लखन झाडपिडे, केंद्रप्रमुख मोहन भोसले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

## मुस्लिम नववधूला 'कन्या सन्मान योजने'तून सोन्याची अंगठी भेट



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१५ जून -**

नगरसेविका मयुरी अमोल बिराजदार व अमोल दत्तात्रय बिराजदार यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या 'मा. बाळासाहेब ठाकरे कन्या सन्मान योजने' अंतर्गत मुस्लिम समाजातील अनिसा खाजा मैनोद्दीन आरब व इरफान खाजा मनोद्दीन शेख यांच्या विवाह सोहळ्यात नववधूस पाच ग्रॅम सोन्याची अंगठी व भरपेरावा आहेर देण्यात आला.

धर्म, जात व पंथ यापलीकडे जाऊन मानवतेच्या भावनेतून समाजसेवा करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण, २० टक्के राजकारण या विचारसरणीवर आधारित ही योजना लोहारा शहरात सामाजिक सलोखा व एकोप्याचे प्रतीक ठरत आहे. यापूर्वीही विविध समाजघटकांतील अनेक कन्यांच्या विवाहप्रसंगी या योजनेतून मदतीचा हात देण्यात आला आहे.

यावेळी माजी सरपंच शंकरआण्णा जट्टे, आयुब शेख, बाबा शेख, सुधीर घोडके, इकबाल मुल्ला, हमजा खुट्टेपड, पत्रकार नीलकंठ कांबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत सामाजिक बंधुभाव वृद्धिंगत करणाऱ्या अशा योजनांची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

## पानगाव जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव; विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१५ जून -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पानगाव येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळाप्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सुटीनंतरच्या पहिल्याच दिवशी शाळेची आकर्षक सजावट करण्यात आली होती. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन व टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शालेय साहित्य व गणवेशांचे वितरण करण्यात आले. नवीन पुस्तके आणि गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती सदस्या वृषाली राहुल पाटील होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्या अनुजाताई कोकाटे, जिल्हा परिषद सदस्य राजाभाऊ पाटील नायगाव, राहुल पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

जाधवर यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या शैक्षणिक वाटचालीची माहिती दिली, तर देवकर सर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळा पुन्हा विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजून गेली.

## कोष्टी समाज ट्रस्टतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; ४६ हजारांचे शैक्षणिक साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१५ जून -**

कोष्टी समाज ट्रस्टच्या पुढाकाराने दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी ३८ विद्यार्थ्यांना सुमारे ४६ हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य वितरित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाश बागडे होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी अभ्यासावर



लक्ष केंद्रित करावे आणि मोबाईलचा मर्यादित वापर करावा, असे आवाहन केले. या प्रसंगी महावितरणचे आदर्श गुणवंत कामगार म्हणून सन्मानित जयराज बाबर व सतीश दाते यांचाही गौरव करण्यात आला. बी.व्ही. सदानंदे तसेच कै.डॉ. श्रीकांत फलके यांच्या स्मरणार्थ शैलेश फलके यांच्या वतीने विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, रजिस्टर, पेन, कंपास आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास विविध मान्यवर, पालक, विद्यार्थी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्ट पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये प्रवेशोत्सव; नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१५ जून -**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी परंडा येथील संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या परिसराची आकर्षक सजावट करण्यात आली होती. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पवृष्टी व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमास विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. शाळेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत प्रेरणादायी संदेश दिला.

प्राचार्य संतोष भांडवलकर, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून शाळेतील शैक्षणिक सुविधा, विविध उपक्रम व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची माहिती दिली. प्रवेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध स्वागतपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी निवृत्त सुभेदार संभाजी पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी नांगरे व समाधान शिंदे यांनी केले.

उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांनी नव्या शैक्षणिक वर्षाची



आनंददायी सुरुवात केली.

## ४०३ कारवाया; ३.३८ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.१५ जून -** धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी १४ जून रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष वाहतूक तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेत मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात एकूण ४०३ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईदरम्यान नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांकडून ३ लाख ३८ हजार रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
नियमित वाचा...

## प्रभातफेरी, पुष्पवृष्टी आणि जल्लोषात रुईभर विद्यालयाचा प्रवेशोत्सव संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ जून -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन, पुष्पवृष्टी करत तसेच वाजत-गाजत स्वागत करण्यात आले. यानिमित्ताने गावातून घोषणाबाजी करत प्रभातफेरीही काढण्यात आली.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना जिलेबी व खिचडीचे वाटप करण्यात आले. तसेच डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना सुभाषदादा कोळगे म्हणाले की, शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या संस्कारांचे बीजारोपण होणे अत्यंत आवश्यक आहे. संस्कारक्षम विद्यार्थी जीवनात यशस्वी होतात. पालकांनीही मुलांच्या शिक्षणासोबत संस्कारांवर भर देऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यास हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास आण्णा कोळगे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून आई-वडिलांचे नाव उज्ज्वल करण्याचा सल्ला दिला. जीवनाचे ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे ते म्हणाले. विद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी विद्यार्थ्यांनी वेळेचे योग्य नियोजन करून सर्व विषयांचे सखोल ज्ञान आत्मसात करावे, असे सांगितले. गुरुजनांनी दिलेल्या ज्ञानाचा योग्य उपयोग करून तसेच विद्यालयातील संस्कारांचे पालन करून उज्ज्वल भविष्य घडवावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास माजी ग्राम पंचायत सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश शेटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन कांबळे यांनी मानले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी आयोजित या प्रवेशोत्सवामुळे विद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

## खुदावाडी जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात; प्रभात फेरीतून शिक्षणाचा संदेश



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१५ जून -**

ग्रामस्वच्छता अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खुदावाडी येथे नवीन शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस आणि शाळा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. चला, नव्या शैक्षणिक वर्षाचे उत्साहाने स्वागत करू या या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नवागत विद्यार्थ्यांचे शाळा परिवारात मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांसह गावातून प्रभात फेरी काढून शिक्षणाचे महत्त्व जनजागृतीच्या माध्यमातून सांगण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास माजी केंद्रप्रमुख दगडू सालेगाव यांच्यासह ग्रामस्थ, पालक, माजी विद्यार्थी, ग्राम पंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना गोड पदार्थ म्हणून शिराचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांच्या सहभागामुळे प्रवेशोत्सव आनंददायी वातावरणात पार पडला. नव्या विद्यार्थ्यांच्या आगमनाने शाळा परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नीट पेपरफुटी प्रकरणी २० जूनला आंदोलन

तभा वृत्तसेवा

लातूर दि .१५ जून : देशभरात गाजलेल्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचे तीव्र पडसाद आता लातूरमध्ये उमटणार आहेत .

लाखो विद्यार्थ्याचे भविष्य अंधारात ढकलणाऱ्या या गैरव्यवहाराचा निषेध करण्यासाठी२० जून रोजी गांधी चौकात आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे .

कॉक्रोज जनना पार्टीसह विविध राजकीय पक्ष, विद्यार्थी संघटना आणि सामाजिक संस्थांनी य आंदोलनाची हाक दिली आहे .

केंद्रीय शिक्षण मंत्री धमेंद्र प्रधान यांनी नैतिकतेच्या आधारावर तात्कळ राजीनामा द्यावा . ही आंदोलनाची मुख्य मागणी आहे .

नीट परीक्षेमुळे मानसिक आणि आर्थिक फटका बसलेल्या पीडित विद्यार्थर्यांना सरकारने प्रत्येकी१0000/ रुपये भरपाई द्यावी . पेपर फुटीच्या नैराश्यातून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुबियांना प्रत्येको२५ लाख रुपयांची मदत जाहीर करावी . देशभरातून विद्यार्थर्यांच्या तीव्र विरोध होत असताना ही शिक्षण मंत्री पदावर कायम असल्याबद्दल आयोजकांनी तीव्र संताप व्यस्त केला आहे .

हे आंदोलन२0 जून रोजी सकाळी गांधी चौक येथे सुरू होणार असून यात नागरिकांनी सहभावी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे .



## विविध वृत्त...

### उद्या शहरात रिक्षा बंद

तभा वृत्तसेवा

लातूर दि.१५ जून : शहरातील एका ऑटो रिक्षा चालकास वाहतूक पोलिसांकडून नुकतीच मारहाणीची घटना घडली असल्यामुळे शहरातील रिक्षा चालक संघटनांमध्ये संतापाची लाट उसळली आहे .

या घटनेच्य निषेध म्हणून लातूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या परिवहन विभागाच्या वतीने१७ जून . बुधवारी ऑटो रिक्षा बंद, आंदोलनाची घोषणा केली आहे.

या आंदोलना चा मोठा फटका सर्वसामान्य प्रवाशां बसण्याची शक्यता असून त्यांची गैरसोय होणार आहे.

काही दिवसांपूर्वी शहरातील मिनी मार्केट परिसरांमध्ये एका वाहतूक पोलीसाने रस्यांवरून जात असलेल्या मोटार सायकलच्या पुढे जाऊन वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला होता . त्यावेळी मोटार सायकल चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून तो दुभाजकाला धडक ला होता . याप्रकरणी वाहतूक पोलीसावर कारवाई करण्यात आली होती.

### रंजना हासुरे यांची प्रदेश प्रवक्तेपदी निवड



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : हिंगोली येथे दि. १४ जून रोजी झालेल्या जिजाऊ ब्रिगेडच्या मराठवाडा विभागाच्या आढावा बैठकीमध्ये प्रदेश सदस्य असणाऱ्या रंजनाताई हासुरे यांची जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्र राज्य प्रदेश प्रवक्ते पदी निवड करण्यात आली. याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. २०१५-१६ मध्ये जिजाऊ ब्रिगेडच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तालुका अध्यक्ष पदापासून सुरुवात झालेला त्यांचा हा प्रवास आज प्रदेश प्रवक्ते पदापर्यंत पोहोचलेला आहे. आजवर त्यांनी महाराष्ट्रासह कर्नाटक व तेलंगणा प्रदेशात देखील त्यांनी २०० हून अधिक व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी ही संघटनेने स्थान दिले तसेच त्यांच्या वक्तृत्वाची दखल घेत आता अधिकृतपणे संघटनेच्या भूमिका मांडण्याची तथा संघटनेच्या प्रचार आणि प्रसाराची व्यापक जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे.

### लातूर जिल्ह्यात पावसाचा खंड

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : लातूर जिल्हयात गेल्या कांही दिवसापासून पावसाचा खंड पडला आहे. सुरूवातीला झालेल्या पावसामुळे कांही शेतकऱ्यांनी पेरण्या सुरू केल्या आहेत. मात्र कृषि विभागाने जमिनीची चांगली ओल झाल्याशिवाय पेरणी करू नये, असे आवाहन केले आहे. गेल्या आठ दिवसापासून पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. हवामान विभागाकडून पावसाचे लवकरच आगमन होईल असे संकेत देण्यात येत आहेत. जिल्हयात अद्याप दमदार पाऊस झाला नाही. शेतकरी पावसाकडे डोळे लावून बसले आहेत. पाऊस पडल्यानंतर पेरणीला सुरूवात होणार आहे.

### जूना औसा रोडवर विजेचा लपंडाव

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : शहरातील जुना औसा रोड परिसरातील सद्गुरुनगर आणि आसपासच्या भागात गेल्या काहीं दिवसांपासून वारंवार होणाऱ्या वीज प्रवाहाच्या लपंडावामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. काही निवडक भागातच दररोज वीजपुरवठा खंडित होत असून उर्वरीत परिसरात वीज पुरवठा सुरळीत सुरु राहात असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे. रोजच रात्री अचानक वीज जाणे, तासनतास अंधारात राहावे लागणे आणि त्याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती न मिळणे यामुळे नागरिकांचा संयम संपत चालला आहे. त्यामुळे महावितरणने या बाबींची दखल घेवून या भागात वीज पुरवठा सुरळीत करवा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## काटगाव येथे 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात जिल्हाधिकारी बास्टेवाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : राज्यातील सर्व बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि शाळेचा पहिला दिवस उत्सवात रूपांतरित करणे, या उद्देशाने शासनाच्या वतीने राबविण्यात येणारा 'शाळा प्रवेशोत्सव'चा लातूर जिल्ह्यातील काटगाव येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.

लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, प्राथमिकच्या उपशिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, उपशिक्षणाधिकारी सुशील फुलारी, लातूरचे गट विकास अधिकारी श्याम गोडभरले यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असतो. याच पार्श्र्वभूमीवर काटगाव येथील शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन अत्यंत आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मोफत गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके व गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाल्याचे पाहायला मिळाले.

या प्रवेशोत्सवाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. शाळेचे पर्यावरण अधिक समृद्ध आणि हिरवेगार व्हावे तसेच विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी आवड निर्माण व्हावी, हा यामागील उद्देश होता. शाळेतील विद्यार्थ्यांनीही वृक्षारोपण करून या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविणे आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे, या अनुषंगाने राज्यभर हा प्रवेशोत्सव साजरा केला जात आहे. या अंतर्गत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचा ठसा घेऊन त्याची प्रत पालकांना देण्याची 'पहिले पाऊल' ही अभिनव संकल्पनाही राबविली जात आहे. जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात काटगाव येथील शाळेत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित बालकांच्या पायाचे ठसे घेण्यात आले.

यावेळी शाळेतील मुख्याध्यापक श्री. मांदळे, केंद्रप्रमुख वामन राठोड, शिक्षक विजय माळाळे, गोविंद गारकर आणि श्रीमती राजमाले, श्रीमती तांदळे, श्रीमती खंडागळे, श्रीमती लांडगे, श्रीमती क्षीरसागर, श्रीमती सय्यद उपस्थित होत्या.

**विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी**

आपल्या शाळेत प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देवून त्यांचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणे, त्यांच्या बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा. पालकांनीही आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देवून या अनुषंगाने शिक्षकांशी सातत्याने संवाद ठेवावा, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यावेळी म्हणाले.

## जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा निवड चाचणी स्पर्धाचे उद्घाटन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : जिल्हा बॅडमिंटन संघटनेमार्फत स्व. राजगोपाल भार्गव यांच्या स्मृतीपित्यर्थ दरवर्षीप्रमाणे यावर्षी जिल्हा आजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. त्याचा उद्घाटन समारंभ दि. १३ जुन रोजी दयानंद बॅडमिंटन संकुलात जेष्ठ चिकित्सक डॉ. पी. आर. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष बाबुराव वाघमारे, उपाध्यक्ष एन.एस. रेड्डी, उपाध्यक्ष आनंद लाहोटी, कोषाध्यक्ष मनिष राठी, सहसचिव रविंद्र शेट्टी, कार्यकारणी सदस्य कमलकिशोर अग्रवाल, आंतरराष्ट्रीय खेळाडु व प्रशिक्षक अक्षय राऊत तसेच लातूर जिल्ह्यातील बॅडमिंटन खेळाडु आणि त्यांचे पालक उपस्थित होते.

या उद्घाटन प्रसंगी डॉ. देशमुख म्हणाले, ५0 वर्षापुर्वी लातूर शहरामध्ये असलेल्या बॅडमिंटनच्या सुविधा व खेळाडुंची संख्या व आज लातूर शहरात झालेले ३५ ते ४0 बॅडमिंटन संकुल. आणि आज जगभर प्रसिध्द असलेल्या बॅडमिटन खेळाचा झालेला प्रचार व प्रसार याचे

तुलनात्मक विश्र्लेषण केले.

या प्रसंगी जिल्हा संघटनेची ५0 वर्षाची वाटचाल ही येणाऱ्या वर्षामध्ये सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणुन निरनिराळे प्रकल्प बॅडमिंटनचा विकास करण्यासाठी घेतले जाणार असल्याचे सचिव ॲड. आशिष बाजपाई यांनी प्रस्तावनेमध्ये सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आशिष सोमाणी यांनी केले.

## स्व. डॉ. नारायणराव चाटे यांचा समर्थ वारसा धनंजय चाटे चालवत आहेत : ना. बाबासाहेब पाटील



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १५ जून : चापोली येथील नवयुवक शिक्षण संस्थेने सर्व क्षेत्रात प्रगती केली असून स्व. डॉ. नारायणराव दौलतराव चाटे यांचा समर्थ वारसा प्राचार्य धनंजय चाटे चालवत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी केले.चापोली येथील संजीवनी महाविद्यालयात आयोजित माजी बांधकाम व आरोग्य सभापती दिवंगत नारायणराव चाटे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी, गुणवंत खेळाडू, यांचा सत्कार व नेत्र तपासणी शिबिर व रक्तदान शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष आ . विक्रम काळे होते.

यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, समाज कल्याण सभापती उत्तमराव माने, अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील,संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य धनंजय चाटे,डॉक्टर भालचंद्र चाटे, जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, प्रफुल्लचंद्र गुंडरे, चाकूर पंचायत समितीचे उपसभापती भुजंग शिंदे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक यशवंतराव जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेंगणे, सिद्धेश्र्वर अंकलकोटे , मधुकर मुंडे,रामचंद्र तिरुके, सचिन केंद्रे जिल्हा परिषद सदस्य माळहिप्परगा, अनिल वाडकर, देविदास माने, विष्णू तीकटे, डॉक्टर नरेंद्र हाके, प्रतीक केदार, मन्मथ शेटकर, महताब मोमीन, फारूकमिया देशमुख, रामेश्र्वर होनराव, प्रभाकर होनराव, बळीराम भोसले, नाथा मद्रेवार, विश्र्वनाथ पाटील, नारायण काचे, माधव कांबळे सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यापुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की लोकनेते स्वर्गवासी डॉक्टर नारायणराव चाटे यांचे कार्य हे अत्यंत चांगले होते . त्यांचे कार्य चालवण्याचं काम डॉक्टर धनंजय चाटे व चाटे परिवार करत आहे. यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान व नेत्र शिबिर व हेल्मेट वाटपचा कार्यक्रम अत्यंत कौतुकास्पद असून समाजाला त्याची आवश्यकता आहे असे सर्व उपक्रम धनंजय चाटे यांच्या वतीने घेण्यात येत आहेत. त्यांच्या सोबत व त्यांच्या संस्थेच्या सोबत आम्ही कायम असून एक लोकप्रतिनिधी म्हणून सर्वजण त्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही सुद्धा सहकार मंत्री नामदार पाटील यांनी या कार्यक्रमात दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर धनंजय चाटे यांनी केले. तात्यांनी संजीवनी महाविद्यालयाचा धावता आढावा सादर केला.

यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक श्रीहरी वेदपाठक, संदीप मुंडे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार संस्थेचे सचिव तथा सरपंच डॉक्टर भालचंद्र चाटे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजीवनी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक शिक्षकतेर कर्मचारी यांनी पुढाकार घेतला.

## मांजरा धरणाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांची भेट
## मनपाच्या नवीन जॅकवेल कामाची पाहणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धनेगाव येथील मांजरा धरणाला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज भेट दिली. यावेळी त्यांनी धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेतला असून, राज्य शासनाच्या आदेशानुसार धरणातील सर्व पाणी केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याच्या सक्त सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

'एल निनो'च्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्र्वभूमीवर राज्यातील सर्व प्रकल्पांमधील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश राज्य शासनाने निर्गमित केले आहेत. या अनुषंगाने पाटबंधारे विभागाने तातडीने कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले. तसेच, धरणातून अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर नियमानुसार तात्काळ कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

लातूर शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठ्यासाठी 'अमृत २.0' योजनेअंतर्गत मांजरा धरण परिसरात नवीन जॅकवेल उभारण्यात येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाच्या प्रगतीची माहिती घेतली.

या पाहणी दौऱ्यावेळी जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता अमरसिंह पाटील आणि लातूर शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांच्यासह संबंधित विभागांचे इतर अधिकारी उपस्थित होते.

## जुगार अड्डयांवर पोलिस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाची धाड



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : लातूर जिल्ह्यात काही ठिकाणी मटका-जुगार सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड येथून कारवाईसाठी पोलिस पथक पाठविले होते. सदर पथकाने निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथील जुगार अड्डयांवर धाड टाकून २ लाख ४३ हजार ७१0 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाला मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून कासार शिरसी येथे सचिन बारच्या बाजूला प्रभाकर माने यांच्या दुकानात छापा टाकला असता, सदर ठिकाणी तिर्रट नावाचा जुगार खेळताना ९ इसम मिळून आले. सदर इसमांना ताब्यात घेऊन, त्यांच्याकडून ३२ हजार ९१0 रुपयांची रोकड, ६५ हजार ८00 रुपयांचे ९ मोबाईल, १ लाख ४५ हजार रुपयांच्या ४ मोटारसायकली, असा २ लाख ४३ हजार ७१0 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांचेविरुध्द कासार शिरशी पोलीस ठाणे येथे गुरनं १३७/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर कारवाईत, पोलिस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह पोहेकॉ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ संजीव जिंकलवाड, पोकॉ गणेश धुमाळ व पोकॉ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या कामगिरीबाबत पोलिस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

## प्लास्टिकवर मनपाची कारवाई
## १0 किलो प्लास्टिक जप्त; ९ हजार दंड वसूल



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जून : महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आयुक्त श्रीमती मानसी यांचे निर्देशानुसार दि. १५ जून रोजी गंजगोलाई भागात सिंगल युज प्लास्टीकवर कार्यवाही करण्यात आली. १0 किलो प्लास्टिक जप्त करुन ९ हजार ३00 रुपयांचा दंड वसूल केला आहे.

सदर कार्यवाही दरम्यान ३ आस्थापनांवर दंडात्मक कार्यवाही करून १0 किलो प्लास्टिक जप्त करण्यात आला असून ९ हजार ३00 रूपयांची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. तसेच सार्वजनीक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या दोन नागरिकांना दंड करण्यात आला.

सदर कार्यवाही दरम्यान प्रमुख स्वच्छता निरिक्षक अक्रम शेख, स्वच्छता निरीक्षक महादेव फिस्के, प्रदीप गायकवाड, रवि शेंडगे, श्रीकांत शिंदे, निलेश शिंदे, कर्मचारी उपस्थित होते. ही मोहीम अशीच सुरू राहणार असून शहरातील व्यवसायीकांनी व नागरिकांनी प्लास्टिक कॅरीबग वापर टाळून कापडी बॅगचा वापर करावा व पर्यावरण संवर्धनास हातभार लावावा तसेच सार्वजनीक ठिकाणी कचरा टाकू नये, असे आवाहन उपायुक्त वसुधा फड यांनी केले आहे.